म. ग्रं. सं. ठाणे

विषय इतिहास

सं. क्र. २९८

REFBK-0003419

१९९७
म. ग्रं. सं. ठाणें
इतिहास
२२७

श्री

# स्वराज्यांतील
# भाट व त्यांची कर्तबगारी.

लेखक,
प. कु. ठाकूर.

REFBK-0003419

१९२७.

श्री

स्वराज्यांतील

# भाट व त्यांची कर्तबगारी.

लेखक व प्रकाशक,

**परशुराम कुशाबा ठाकूर**

सुपरवायझर. डिस्ट्रिक्ट स्कूलबोर्ड जळगांव,-[ पूर्व खानदेश. ]

मुद्रक

**नामदेव माधव नेमाडे.**

" श्रीकृष्ण " प्रिंटिंग प्रेसचे मालक. जळगांव-[ पूर्व-खानदेश. ]

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

ता. २०।८।२७

किंमत एक रुपया.

तरी ग्रंथसंग्रहालयास भेट
म्हणून पुस्तक धाडीं आहे. आपली
पत्र पोंचली. कृपा असावी. परस्पर
आश्रय देतां येत असल्यास दिल्यास
ही विनंती. ८।५।५

आ. नम्र

प. कृ. ठाकूर



नामदार रावसाहेब डी. आर्. पाटील. वकील भुसावळ.

अष्टमी ता० २०-८-२६

# अर्पण

त्रिण्य संपादन करून प्रसिद्धीस आलेले,
लोकलबोर्डचे प्रेसिडेंट, सन १९ ६ च्या
कांग्रेसचे अध्यक्ष, मुंबई लेजिस्लेटिव्ह
कौन्सिलर, शेतकऱ्याचे कैवारी,
नचा असावा' अशा मताचे
मीड व भीति न धरितां
त्याच्या विश्वासास पात्र
संगी अवर्णनीय धाडस
कुलास शोभाय-
ले, निष्काम लोकसेवा
स्वार्थावर पाणी
णारे, राजमान्य
लोकमान्य
नायक
श्रीयुत

**साहेब डोंगरसिंग रामजी पाटील**

**वकील भुसावळ.**

च्या परवानगीनें सादर अर्पण करीत आहें.

# श्रीयुत परशुराम कुशाबा ठाकूर.

इति २९७

य'स कृ. सा. न. त्रि. वि. :—

'स्वराज्यांतील भाट व त्यांची कर्तबगारी' हें आपलें हस्तलिखित पुस्तक चाळून पाहिलें. पुस्तक पुष्कळ परिश्रमपूर्वक माहिती मिळवून लिहिलेलें दिसतें. ह्यांत थेट पौराणिक काळापासून तों आजतागाईत भाटांचा इतिहास थोडक्यांत देऊन त्यांच्या सद्यःस्थितीचें व चालीरीतीचें उत्तम वर्णन केलें आहे. शिक्षण, विद्वत्ता व सद्‌गुण यांतील पूर्वीच्या व हल्लींच्या स्थितींतील अंतर दाखवून हल्लींच्या मागसलेल्या तथापि उदयोन्मुख भाट-समाजा-समोर त्यांच्या प्रतापशाली पूर्वजांचें अनुकरणीय चारित्र्य ठेवून त्या समाजाची आपण महत्त्वाची सेवाच केली आहे! एक दोन पौराणिक व बाकीच्या ऐतिहासिक काळांतील भाट नर-रत्नांची जीं त्रोटक चरित्रें आपण दिलीं आहेत, तीं भाट समाजासच काय पण अखिल भारतवासीयांस वंदनीय, अनुकरणीय व स्फूर्तिदायक होतील यांत मला मुळींच शंका वाटत नाहीं. या दृष्टीनें पहातां आपण केवळ भाट समाजाचीच नव्हें तर सर्व भारतवर्षाचीच मानार्ह कामगिरी केली आहे असें माझें मत आहे. ग्रंथाची भाषा साधी, सरळ व रसाळ असून एकंदर पुस्तक चटकदार झालें आहे. या विषयावर मराठींतील हें पहिलेंच पुस्तक अस-ल्यानें साहित्यसेवक याचें अत्यानंदानें स्वागत करितील अशी मला खात्री आहे. चंदभाटाच्या "पृथ्वीराज-रासा" या ग्रंथाबद्दल

आणि दिलेली माहिती वाचून त्या ग्रंथाबद्दल कुतूहल उत्पन्न होऊन त्याचें मराठी भाषांतर ( काव्यांत, निदान गद्यांत ) झाल्यास मराठी वाङ्मयांत एक उत्कृष्ट भर पडल्यासारखें होईल असें वाटल्यावांचून रहात नाहीं. आपल्या हातून अशीच वाङ्मयसेवा घडो अशी इच्छा प्रदर्शित करून हा अभिप्राय पुरा करतों.

आपला—हितैषी,

**शि. स. शिरके**

( ॲड. ऑ. डि. स्कू. बो. पू. खानदेश. )

# प्रस्तावना.

सुमारें चार वर्षांपूर्वी केसरींत ' ज्ञानकोश मंडळातर्फे ' अशी एक जाहिरात आली होती कीं, ' भाट व त्यांचें वाङ्मय ' ह्या विषयावर ज्ञानकोशांत घालण्याकरितां चांगली विश्वसनीय माहिती पाहिजे ती कोणीही पाठवावी. ह्या जाहिरातीवरून मी ज्ञानकोश मंडळाच्या सेक्रेटरीकडे नागपुरास पत्रव्यवहार करून निबंध लिहिण्याची परवानगी मिळविली व त्यानंतर त्यास पाहिजे तितका निबंध लिहून त्यांजकडे रवाना केला. पुढें आजपर्यंत माझ्या वाचण्यांत जे जे इतिहास, बखरी व पुराणें इत्यादि ग्रंथ आले त्यांत भाटांसंबंधानें ठिकठिकाणीं जें जें वर्णन दिसलें त्या सर्वांचीं टिप्पणें करून घेऊन ज्ञानकोशाकडे जो निबंध पाठविला त्यांतील मजकुराची व ह्या टिपणांची संगति जुळवून ह्या निबंधास हें अगदीं निराळें व नवीन स्वरूप दिलें आहे.

कोणत्याही जातीचा इतिहास त्याच जातीचा लेखक लिहील तर तो स्वजातीची व्यर्थ थोरवी गाईल आणि इतर जातीचा लेखक लिहील तर त्यांत पुष्कळसे दोष राहतील किंवा त्यांत निंदात्मक विधानें येऊं शकतील. असा हा मनुष्यस्वभावच आहे. तरीपण मी स्वतः भाट असून पुढील इतिहास जरि भाटांचा आहे तरी त्यांत भाटांची व्यर्थ किंवा फाजील थोरवी न गातां निर्विकार मनानें वस्तुस्थितीचें जसेंच्या तसेंच वर्णन केलें आहे हें बहुश्रुत वाचकांस कळून येईल. हल्लींच्या भाट समाजाच्या एकंदर परिस्थितीशीं पूर्वींच्या भाटांची तुलना करूं लागल्यास त्याच शूर मर्दांचें हे वंशज आहेत काय ! अशी शंका येऊन पुढील

इतिहास कदाचित् अतिशयोक्तिरूप भासण्याचा संभव आहे. परंतु ह्यांत वाचकांचा किंवा सांप्रतच्या भाटसमाजाचा दोष नसून तो काळाचा दोष आहे हेंही विचारी वाचक तोडूं शकतील.

ह्या इतिहास-प्रसिद्ध जातीनें विद्या, शौर्य, धैर्य, नीति, स्वामिनिष्ठा आणि स्वाभिमान इत्यादि अनेक सद्गुणाच्या योगानें राष्ट्राच्या व धर्माच्या अभ्युदयाकरितां आपला स्वतांचा आत्मयज्ञ करून इतिहासाला अलंकृत केलें आहे ! हें लिहिण्यास मला अभिमान व आनंद वाटतो ! इतकें महत्कृत्य भारतवर्षांत इतर कोणत्याही जातीनें केलें नाहीं. ज्यास हिंदी साहित्याचा पिता ह्मणतात अशा त्या आमच्या चंद्रभाटाचा एकटा रासा ग्रंथ वाचून कोण आनंदानें मान डोलविणार नाहीं ! तो ग्रंथ आज सर्व प्रकारें महाभारताच्या तुलनेस योग्य ठरला आहे ! अनेक विद्वानानीं त्याच्या परीक्षणाकरितां आपला मेंदू खर्ची घातला आहे! संजय, सूत, चंद, भूषण, मतिराम, शामलदास इत्यादि अनेक भाटांची नांवें इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं मुद्रित करण्यासारखीं आहेत ! जो ' सूत ' ऋषिमंडळीस पुराण सांगत असे तो अझूनसुद्धां आमच्या हृदयांत वास करित आहे! जो ' संजय ' बुद्धिज्ञानाचा खजिना समजला जाई, जो श्री व्यास–नारायणाच्या अपूर्व कृपेमुळें आपल्या अगाध दिव्य–ज्ञानाच्या साह्यानें भारती युद्धाची हकीकत राजवाड्यांत बसून अंध धृत--राष्ट्रास सांगत असे, त्याचें नांव ऐकून आह्मी नेहमीं आनंदानें फुगून जातों ! जोंपर्यंत भारतवर्ष जिवंत आहे तोंपर्यंत ह्या आमच्या पूज्य विभूतींची अतुलकीर्ति लेंशमात्र ही कमी होणार नाहीं ! किंवा तिचा आह्मांस व इतर कोणास ही विसर पडणार

नाहीं. असे हे आमचे शूर बलवान्, स्वाभिमानी व प्रसंगीं प्राणाची ही परवा न करणारे आमचे पूर्वज कोणीकडे व त्यांचीच आह्मी भित्री, निर्बल, दुरभिमानी व प्राण वाचविण्याकरितां यजमाना-पुढें लांगूल चालन करणारी प्रजा कोणीकडे ! ! ! कशास कांहीं मेळ ? ह्यामुळें आह्मी त्यांचेच वंशज आहोंत कां इतर कोणी आहोंत अशी शंका येऊन आमची आह्मांस लाज वाटूं लागते !

काल चक्राच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें ज्या एकाकाली आह्मी उच्च शिखरावर होतों तेच आह्मी आज त्या चक्राच्या भूमिगत स्थितीस ह्मणजे पूर्ण अवनतीस पोंचलों. चक्रनेमिक्रमच मुळीं असा आहे कीं आज जो भाग उच्च स्थानी आहे तो कालांतरानें अधोगतीला जाणार व अधःस्थित भाग कालांतरानें क्रमानें उच्च स्थली येणार. ह्याच न्यायानें आज आपली जरि अवनति आहे तरि कालांतरानें आपली उन्नती होऊन आपलें पूर्वपद आपणांस पुनः मिळविता येईल. सतत उद्योग मात्र केला पाहिजे. जीं राष्ट्रं पूर्वीं सुधारणेच्या शिखरावर होतीं तीं आज नामशेष आहेत ! व जीं अंगास रंग लावून केवळ रानटी स्थितींत दिवस काढित होती, वस्त्र नेसणें किंवा अन्न शिजवून खाणें हेहि ज्यांस माहित नव्हतें तीं राष्ट्रं आज मेरू शिखरावर चढलीं आहेत ! आपण हि उद्योग केल्यास आपणांसहि सुखाचे दिवस आल्यावाचून राहणार नाहींत.

आपण कोण आहोंत, आपली योग्यता समाजांत किती मानित होते, हल्लीं आपण कोणत्या स्थितीस पोहोंचलों, आपले पूर्वज काय करीत होते व ते कसे होते, त्यांची कीर्ति अजरामर कशी राहिली, याची आपणापैकीं पुष्कळास माहिती नाहीं. तेव्हां अशा आमच्या बांधवांस ह्या गोष्टींचें ज्ञान करून द्यावें

हा हें पुस्तक लिहिण्याचा हेतू आहे. तो अंशतः सिद्धीस गेला ह्मणजे माझ्या श्रमाचें सार्थक झाले असें मी समजेन.

ह्या पुस्तकांत पुढें एकंदर जी माहिती दिली ती साधार आहे, दंतकथावर विश्वास ठेविला नाहीं व ज्या गोष्टीस आधार सांपडला नाहीं तीहि घेतली नाहीं.

भादली—जळगांव
जि० पूर्व खानदेश
ता० १।६।२४

समाजाचा अत्यंत नम्रसेवक
**प. कृ. ठाकूर**
हेडमास्तर भादली

# आभार प्रदर्शन.

हें पुस्तक लिहितांना मला श्री. राजवाडेकृत राधामाधव-विलास चंपू; मध्ययुगीन भारत भाग १—२ श्री. रावबहादूर वैद्यकृत; श्री महाभारताचा उपसंहार; श्री. रावबहादूर वैद्यकृत; राजस्थानचा इतिहास लोक हितवादीकृत 'मराठी रियासत श्री. सरदेसाईकृत; पृथ्वीराज चव्हाण लोकहितवादीकृत; चरित्रचंद्रिका गुजराथी; मराठेशाहींतील राजनिती; ग्रामण्याचा इतिहास; चिपळूणकर मंडळीचें आदिपर्व, अनुशासनपर्व व हरिवंशपर्व; काव्य-रत्नावलि ग्रंथ १७ वा ( मासिक जळगांव ) अनंतफंदी वगैरे पुस्तकांची मदत झाली ह्मणून मी त्यांचा व तसेंच श्रीकृष्ण छापखान्याचे मालक श्री. नामदेव माधव नेमाडे ह्यांनीं प्रुफें तपासण्याचे श्रम घेतले याबद्दल त्यांचा फारच फार आभारी आहें.

जळगांव,
ता. २०।८।२७.

**प. कृ. ठाकूर.**
सुपरवायझर. डि. स्कूलबोर्ड
जळगांव. पूर्व-खानदेश.

# विषयानुक्रम.

## भाग पहिला. पृष्ठ.


१ जातिभेदाची कारणें .... .... १
२ भाट ह्मणजेच सूत पौराणिक .... ... ३
३ ब्रह्मराव शद्बाचा अर्थ .... .... ४
४ ठाकूर किंवा भाट हे जातीवाचक शद्ब नाहींत .... ६
५ सूताचे ( भाटांचे ) कर्तव्य .... .... ८
६ सूत ( भाट ) हे क्षत्रिय आहेत .... .... ९
७ सूतांचा ( भाटांचा ) संस्कार लोप ... १३
८ भाटांचें सोळुखी घराणें .... .... १४
९ रूप नगरची राजकन्या .... .... १५
१० रूप नगरची राजकन्या ( कविता ). ... १६
११ भोजन व्यवहार .... .... २२
१२ भोजन निर्बंध .... .... २२
१३ विवाह पद्धति .... .... २३
१४ सूत, वैदेह, मागध किंवा बंदी आणि वैतालिक... २३
१५ पडदा .... .... .... २५
१६ पोशाक .... .... ... २६
१७ वागणूक ... .... ... २६
१८ शिक्षण .... .... .... २७
१९ विद्वत्ता ... ... ... २८
२० सद्गुण .... ... .... २९
२१ परंपरा ... ... ... ३०
२२ भाटांचा संग्रह .... .... .... ३२

२३ भाटांचे साहित्य .... ... ... ३२
२४ सामान्य वर्णन ... .... ... ३३
२५ पोट जाती ... ... ३९

## भाग दुसरा.

उपोद्घात .... .... .... ४२
१ लोमहर्षण .... ... .... ४४
२ सूत उग्रश्रवा .... .... .... ४६
३ महाकवि चंद भाट .... .... .... ४९
४ महाकवि गंग भाट .... .... .... ५९
५ महेशदास भाट किंवा राजा बीरबल .... ६६
६ पृथ्वीराज भाट .... .... .... ७४
७ जयसिंग भाट .... .... ... ७८
८ जैतसिंग भाट .... .... .... ८२
९ जसवंतसिंग भाट .... .... .... ८६
१० दुर्गादास भाट .... .... .... ८७
११ मोरू नाना भाट ... .... .... ८९
१२ चत्रू ठाकूर .... .... .... ९१
१३ दुर्गादास ठाकूर .... .... .... ९२
१४ विश्वंभर ठाकूर .... .... .... ९५
१५ शिवदास ठाकूर .... .... .... ९५
१६ राजकवि भूषण भाट .... .... ९६
१७ मोहानलाल भाट .... .... .... १०५
१८ मतिराम भाट ... .... .... १०६
१९ कविराज शामलदास भाट [ महामहोपाध्याय ] .... १०७

# स्वराज्यांतील
# भाट आणि त्यांची कर्तबगारी.

**चातुर्वर्ण्यं मयासृष्टं गुणकर्मविभाग-शः।**

(श्रीमद्भगवद्गीता)

**जातिभेदाचीं कारणें.—**

आपल्या ह्या सनातन धर्मांत चातुर्वर्ण्य ही जीविताची चतुरंग वांटणी आहे. राष्ट्राचें जीवन यशस्वी होण्यास ही वांटणी अवश्यमेव आहे. या चतुरंग विभागणींतील कोणतेंहि एक कार्य एकच वर्ग करूं शकत नसल्यामुळें तदंग-भूत शेंकडों गोष्टी करण्याकरितां समाजाचे निरनिराळे समुदाय झाले. "ज्याच्यामध्यें बेटी-व्यवहार होतो ती जात" अशी जात शब्दाची व्याख्या केल्यास मुंबई इलाख्यांत १४५९ जाति आहेत, असें एन्थोवेनच्या ग्रंथावरून दिसून येईल. त्यांपैकीं मुख्य २५० आहेत व बाकीच्या कोणत्या ना कोणत्या तरी जातीच्या अंगभूत आहेत. बहुतेक जाती सूर्य, चंद्र, अग्नि, यदु, वाल्मीकि परशुराम, लव वगैरे पैकीं कोणांतरी आपला मूळपुरुष समजतात. हे मूळपुरुष त्या त्या जातींची व्यवस्था लावणारे अधिकारी असावेत असें वाटतें. गुणकर्मानंतर जाती उत्पन्न होण्याचें दुसरें कारण धर्म हें असावें. निरनिराळे धार्मिक पंथ उत्पन्न झाले तशी जातींची संख्याहि वाढली. वीर, कापडी, आराधी, पांगुळ, मुरळ्या, भावीण या जाती धर्म-पंथामुळें उत्पन्न झाल्या; वाळींत टाकिल्यानें पहिली जात जाते व दुसरींत शिरकाव होत नाहीं अशा लोकांची निराळी जात बनते. जबरीच्या परिवर्तनाचे लोक आचार-विचार आपल्या पूर्वीच्या जातींचाच पाळित असतात, परंतु पूर्वीच्या भाऊबंदाशीं त्यांची रोटीबेटी बंद असल्यामुळें त्यांची निराळी जात होते. तत्वाच्या फरकानेंहि निराळ्या

जाती होतात. जैन व लिंगाईत हे त्यापैकींच होत. उत्पातांच्या योगानें ही जाती वाढत असतात. परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळीं जीव घेऊन पळालेल्या लोकांच्या कांहीं निर-निराळ्या जाती झाल्या; हे लोक ज्या मूळच्या ठिकाणाहून निघाले तेथला त्यांचा संबंध तुटला व ज्या ठिकाणीं गेले तेथील जातींत त्यांचा शिरकाव होईना. अर्थात् तेथें त्यांच्या जाती निराळ्या मानण्यांत आल्या न्हावी, शिंपी, पटवेकरी, कायस्थ, ब्रह्मक्षत्रिय वगैरे अनेक लोक आपण परशुरामाच्या संहारांतून बचावलेले क्षत्रिय आहोंत, असेंच सांगतात. पोर्तुगीज लोकांनीं केलेला छळ, दुर्गादेवीचा दुष्काळ, औरंगजेबाची स्वारी, हीं सर्व उत्पाताचीं उदाहरणें असून तीं जातींची संख्या वाढ-विण्यास कारण झाल्याचे दाखले सांपडतात.

संकर हेंहि एक जाती वाढण्याचें कारण आहे; उच्च जातीचे आचार-विचार बिघडूनहिं कांहीं जाती तयार होतात. मूळ एकाच जातीचे परंतु केवळ आचार व आहार इत्यादि भेदामुळें भिन्नत्व पावलेल्या जातीहि पुष्कळ आढळून येतात.

अशा रितीनें ज्या अनेक जाती उत्पन्न झाल्या त्यांपैकीं ' भाट ' ही जात अगदीं प्राचीनकाळापासून असून रामायण–महाभारतादि महा-ग्रंथांत ह्यांचा ठिकठिकाणीं उल्लेख आलेला आढळतो. ऋग्वेद, यजुर्वेद इत्यादि आद्यग्रंथांतसुद्धां प्रसंग-विशेषीं भाटांचें ललकारणें व स्तुतिपाठ-ह्यांचे वर्णन आलेलें आहे. कोणत्याही मंगल कार्यांत भाट हे पाहिजेत. ज्या कार्यांत भाट नाहीं तें मंगल कार्य अमंगलसम वाटतें तेव्हां अशी ही पुरातन जात कधीं व कशी उत्पन्न झाली, ह्यांचे मूळचें कर्तव्य कोणतें, ह्यांचा योगक्षेम कसा चालत होता, सांप्रत कसा चालतो,

हल्लीं ह्यांचे कोणतें कर्तव्य निरुपायास्तव होऊन बसलें आहे, इत्यादि गोष्टींचा विचार ह्या पुस्तकांत केला आहे. तेव्हां माझी ही अल्पस्वल्प सेवा माझ्या प्रिय भाट-समाज-बांधवांस मान्य होवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे !

हल्लींचे भाट ह्मणजे पूर्वीचे सूत पौराणिक असें महाभारतांत श्रीमंत् व्यास महर्षींनीं सांगितलें आहे लोमहर्षण, सूत उग्रश्रवा, संजय हे सुप्रसिद्ध पुराणिक, सूत ह्मणजे भाटच होते. सूत हे क्षत्रिय असून त्यांच्या ठिकाणीं अतुल विद्वत्ता होती. व त्यांचा स्वभाव अत्यंत तेजस्वी होता. ह्यामुळें राजे लोक ह्यांस पूज्य मानून मुद्दाम आपल्या पदरीं पुराण सांगण्यास ठेवीत. हे सूत ह्मणजेच हल्लींचे भाट. ही जात ब्राह्मणांइतकीच उच्च व पूज्य आहे. हें माझें ह्मणणें कदाचित् कोणाच्या कानास कटू लागेल तर त्यांनीं कृपाकरून मध्य हिंदुस्थानांत फिरून माझ्या विधानाचा किंवा माझ्या जाति-बांधवांच्या पूज्यतेबद्दलचा अनुभव घ्यावा. तिकडे भट व भाट ह्या दोघांस सारखाच मान आहे. राजवंशाचीं चरित्रें लिहून ठेवणें, राजवंशावळि जतन करणें, त्यांच्या पूर्वजांच्या पराक्रमांचीं कृत्यें रसभरित व स्फूर्ति-दायक काव्यांतून राजे लोकांस ऐकविणें, व पुराण सांगणें हीं कामें ह्या भाट ह्मणजे सूत पौराणिकाकडे असत. महाभारत सांगणारा लोमहर्षण हा आमचा भाट होता. ह्याचा मुलगा सौति किंवा उग्रश्रवा सूत हा विलक्षण बुद्धिमान् असल्यामुळें ह्यानें व्यासाचें महाभारत वाढवून त्यांतील श्लोकसंख्या एक लक्ष केली !!! वेदाध्ययन करणें हें जसें ब्राह्मणाचें कर्तव्य तसें शास्त्रांचें व पुराणांचें अध्ययन करणें हें भाटांचें ( सूतांचें ) कर्तव्य होतें. अर्थात् ह्यांसहि ब्राह्मणांप्रमाणें वेदाधिकार होता. पूर्वी असा नियम असे कीं, ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांस निदान एक तरी वेद तोंडपाठ आलाच

पाहिजे. भागवतांतील रोमहर्षणाच्या कथेवरून हेंच स्पष्ट होतें. रोमहर्षण ह्यास कोठें लोमहर्षण असेंहि ह्मटलें आहे. ह्या नांवाचे दोन पुरूष नाहींत. रोम हर्षण असें नांव पडण्याचें कारण असें कीं, तो पुराण सांगूं लागला म्हणजे श्रोत्यांच्या आंगीं इतकें स्फुरण चढत असे कीं, प्रत्येकाच्या शरिरावर रोमांच उभे रहात ! ह्मणून तेंव्हांपासून ह्यास रोमहर्षण असें ह्मणूं लागले. ह्याचें पूर्वीचें नांव लोमहर्षण असें होतें.

**ब्रह्माव शद्बाचा अर्थ**-वास्तविक पाहिलें असतां वर्ण-व्यवस्था कडकडित होती तेव्हां क्षत्रियांस मुख्यतः भाटच पूज्य होते,हें इतिहास व पुराणें ह्यावरून दिसतें.ह्या गोष्टीस आणखी सबळ पुरावा त्यांच्या 'ब्रह्माव' ह्या आशिर्वादात्मक शद्बांत भरलेला आहे. त्यांवळीं भाट दरबारांत आला ह्मणजे क्षत्रियांनीं त्यास ' पायलगी ' किंवा ' खमा ' ह्मणावा व मग मागून भाटानें त्यांस ' ब्रह्माव ' ह्मणून आशावाद द्यावा, अशी चाल होती. ह्या ब्रह्माव शद्बाचा अर्थ असाः— त्यांत ब्रह्म+अव असे दोन शद्ब आहेत. ब्रह्म ह्मणजे परमेश्वराचें व्यापक स्वरूप आणि अव ह्यांत अव् धातु असून त्याचा अर्थ चिंतन करणें, विचार करणें, सुख देणें, किंवा जाणणें, रक्षण करणें, असा आहे. ( गीर्वाण लघु कोश पृ. ५४२ ) ह्मणजे ब्रह्माचें चिंतन कर, ब्रह्माचा विचार कर किंवा ब्रह्म तुमचें रक्षण करो, परमेश्वर तुमचें कल्याण करो, किंवा सुख देवो. असा ब्रह्माव शद्बाचा अर्थ आहे. ही उपरि निर्दिष्ट चाल अगदीं प्राचीन काळापासून छत्रपति श्री शिवाजी महाराजांच्या वेळेपर्यंत होती. पुढें छत्रपतींच्या वेळीं स्वामी श्री रामदासांनीं " रामराम " ह्मणण्याची चाल सुरूं केल्यामुळें दक्षिणेंतील क्षत्रिय मराठ्यांनीं भाटांस अगोदर " रामराम " ह्मणावें व मग भाटानें त्यास " ब्रह्माव ' ह्मणून आशीर्वाद द्यावा, असा प्रकार सुरू झाला. कालांतरानें भाटांच्या

विद्वत्ता, तेजस्विता व उपयुक्तता नाहींशीं झाल्यामुळें त्याचें वजन कमी होऊन ते मानपूजार्ह न राहतां तिरस्कारार्ह झाले ! अशा स्थितींत क्षात्रिय मराठ्यांकडून प्रथम भेटींत पहिल्यानें ‘ खमा ’ ‘ पायलगी ’ किंवा ‘ रामराम ’ ह्मणणें बंद होणें साहजिक आहे. कारण तिरस्कारार्ह मनुष्याचा आदर कोणास वाटणार आहे ? मग ही मंडळी अगोदरच यजमानास आपण होऊन ‘ अह्माव ’ ह्मणूं लागली व मग मागाहून यजमान “ रामराम ” घालूं लागले; आणि हा प्रकार आतां अखंड सुरू झाला आहे. भाटानें प्रथम अह्माव न केल्यास यजमानास घुस्सा येतो ! ह्यावरून आतां भाटांनीं असा विचार केला पाहिजे कीं, आपलें पूर्वीचें स्थान श्रेष्ठ व पूज्य असून अशिक्षितपणामुळें व अज्ञानामुळें तें आपणांस सोडून गेलें आहे, आपली अवनति झाली आहे, सर्व प्रकारें आपण अधोगतीच्या मार्गास लागलों आहोंत, हें लक्षांत ठेऊन आपलें पूर्वीचें स्थान मिळविण्याकरितां आपण आपली पुढील पिढी संघटित प्रयत्न करून सुशिक्षित केली पाहिजे. ह्यांत स्वतःचें कल्याण असून शिवाय त्यामुळें आपणास आपल्या देशभक्तांच्या देशोन्नतीच्या प्रयत्नास अल्पस्वल्प मदत करितां येईल. अशा प्रकारची मदत करणें हें आपल्या समाजाचें प्राचीन काळापासून आद्य कर्तव्य ठरलें आहे. कारण आपल्या पूर्वजांनीं पूर्वी देशाच्या उन्नतीकरितां स्वतांचा आत्मयज्ञ करून इतिहासांत ममुद करून ठेवण्यासारखी कामगिरी करून ठेविली आहे. इतकें काम भारत-वर्षांत इतर कोणत्याही जातीनें केलें नाहीं असें इतिहास सांगतो. तेव्हां ही गोष्ट लक्षांत ठेवून नीचवृत्ति व हलकट मनोविकार टाकून योग्य कर्तव्य करा ह्मणजे त्या पवित्र कार्यांत आपल्या पूर्वजांचे पवित्र आत्मे स्वर्गांतून आपणास शुभ आशीर्वाद देतील व मग आपलें कार्य सुलभ होईल.

**ठाकुर हा जातिवाचक शब्द नाहीं:—** अन्हिल पुरास ( राजपुताना ) सिद्धराज जयसिंग सोळंकी हा राजा राज्य करित असतां लोक फार आनंदांत होते. ह्यामुळें त्याच्यावर लोकांचें अत्यंत प्रेम असे. ह्या घराण्यांतील कांहीं मंडळी बाराव्या शतकांत इतर रजपूत राजांच्या आश्रयानें राहिली. ती मंडळी उत्तम पौराणिक होती. पौराणिकांच्या ठिकाणीं लोकांची पूज्यबुद्धि स्वाभविकच असते. त्या प्रांतांतील लोकांचें पूज्य दैवत द्वारकाधीश कृष्ण, ज्यास त्या भागात 'ठाकूरजी' ह्मणतात तें आहे. रजपूत राजे वरील सूत पौराणिकांस त्यांच्या अलौकिक पौराणिकगुणामुळें व पूज्यतेमुळें 'ठाकूरजी' ह्या पूज्य शब्दानेंच संबोधूं लागले व त्यामुळें इतर सामान्यजनसुद्धां प्रसंग पडेल तेव्हां त्याच शब्दाचा उपयोग करूं लागले. अशा रितीनें त्या सूत पौराणिकाचा वाचक असा 'ठाकूरजी' हा शब्द रूढ झाला. तो हल्लीं जातीचा वाचक होऊन बसला आहे. त्यावेळीं वयोवृद्ध लोक ह्यास 'ठाकूरजी' ह्मणत व लहान वयाचे लोक 'बापजी' ह्मणत. ह्या सर्व वर्णना वरून 'ठाकूर' हा शब्द कसा प्रचारांत आला हें वाचकांस कळून येईल. वास्तविक ठाकूर ही जात नसून त्या जातीच्या लोकांची सन्मान्य पदवी आहे. आणि त्यांची जात सूत ( भाट ) ही आहे. वरील वर्णनावरून ही जात पूज्य आहे असें ठरतें. राजस्थानांत कांहीं रजपूत राजांची अशी चाल असे कीं ते वृद्ध झाले ह्मणजे सर्व राज्यकारभार मुलांचे स्वाधीन करून आपण तपश्चर्येला जावें. उदेपूरचा राणा ह्याप्रमाणें तपश्चर्येला निघाला ह्मणजे त्यानें साळुंब्रयाच्या ठाकुरास पोषाख देऊन राज्याची वहिवाट सांगावी. तसेंच उदेपूर संस्थानांत ज्या सनदा वगैरे होतात, त्या प्रत्येकावर साळुंब्रयाच्या ठाकुराची कट्यार ही निशाणी होते, मग खालीं राणा सही करितो, असा साळुंब्रयाच्या ठाकुरास मान आहे.

क्षत्रियांचीं जीं ९६ कुळें आहेत, त्यांतील जाधव, भोसले, शिरके, चव्हाण, सोळुंखे, मोरे, गवळी, बागूल, वगैरे घराण्यांतील मंडळी, दक्षिणेकडे फार पूर्वी आली. कोणी मुसलमानांच्या त्रासानें आले, कोणी नवीन राज्य स्थापण्याकरितां आले, कोणी अन्य कार--णानें आले, ते हल्ली मराठे, प्रभू, गिराशे व ठाकूर ह्या नावांनीं प्रसिद्ध आहेत. शिवाजी महाराजांचें भोसले कुळ उत्तरेकडे मुसलमानी अंमल सुरू झाला तेव्हां दक्षिणेंत आले. त्यावेळीं महाराष्ट्रांत मर्दुमकी गाजविण्यास अनुकुल परिस्थिति होती. पुढें वेळोवेळीं आणखीही कांहीं क्षत्रिय घराणीं दक्षिणेंत आलीं, त्यांच्याबरोबर त्यांचे भाटही आले.

वरील वर्णनावरून ठाकूर हा जातीचा वाचक शद्ब नाहीं अशी वाचकांची खात्री होईल. कोणी भाट ह्मणून ह्या जातीस ओळखतात पण भाट हाहि जातीचा वाचक शद्ब नाहीं. भाट हा शद्ब 'भट्ट' ह्या शद्बापासून निघाला आहे. (गीर्वाण लघु कोश) व 'भट्ट' ही विद्वान अशा अर्थाची पदवी आहे, असेंहि त्याच कोशांत दिलेलें आहे. पूर्वी सूत हे अत्यंत विद्वान् होते. ह्या त्यांच्या अतुल विद्वत्तेमुळें त्यांस भट्ट ही सन्मान्य पदवी मिळत असे. तेव्हां भट्ट ही देखील जात नाहीं, असें ह्मणावयास हरकत नाहीं. भट्ट ह्मणजे पंडित असा अर्थ आहे. हल्लीं भाट किंवा ठाकूर असें ज्या जातीस ह्मणतात त्यांची खरी जात " सूत " ही आहे व सौति, लोमहर्षण, किंवा संजय हे ह्या जातींतील पूर्वज पुरुष आहेत. शार्ङ्गधर भट्ट ( वैद्यक ग्रंथ करणारा ), कमलाकर भट्ट ( निर्णय सिंधु ग्रंथ करणारा ), गागा भट्ट, इ० नांवांतील भट्ट ही पदवी आहे. तेव्हां ठाकूर हा पूज्यतादर्शक व भट्ट ह्मणजे भाट हा विद्वत्तादर्शक शद्ब आहे, जातीचा वाचक नाहीं असें ठरतें.

**सूतांचें [ह्मणजे भाटांचें] कर्तव्य**—वर्ण-व्यवस्था सुरू झाली. तेव्हां प्रत्येक वर्णाकडे कोणतें काम द्यावें ह्या विचारांत त्यावेळची परिस्थिति असतां वेदाध्ययन हें बुद्धीचें काम असल्यामुळें व ब्राह्मणवर्ग बुद्धिमान असल्यामुळें तें काम त्यांच्याकडे दिलें. पुराण-शास्त्राध्ययनाचें कामहि तितकेंच बुद्धिमत्तेचें असल्यामुळें ही सूत-भाट-मंडळी ब्राह्मणा प्रमाणेंच बुद्धिमान् असल्यामुळें हें काम ह्या भाटांकडे आलें ह्यासंबंधानें पुराणांत पुढें लिहिलेली माहिती सांपडते—

धर्म एष हि सूतस्य सद्भिर्दिष्टः सनातनः ।
देवतानां ऋषीणांच राज्ञां चामिततेजसाम् ॥
वंशाणां धारणं कार्यं स्तुतीनां च महात्मनाम् ॥ पद्म पु. १-१-२८

देव, ऋषि व मोठमोठे तेजस्वी राजे यांच्या वंशाचें व त्यांच्या स्तुतीचें धारण करणें हें सूतांचें कर्तव्य होतें. तसेंच:—

सूता ये च पुराणस्थानुच्चरंति नृपान् सदा ।
प्रेतलोकगतान् शूरान् वर्णयंतिच मागधाः ॥ ४०
वर्तमानान् नृपान् सम्येक् येतु संग्रामकारिणः ।
वर्णयंति प्रबंधैर्ये वंदिनस्ते प्रकीर्तिताः ४१

जै. भ. प. अ. ५५

**अर्थः**—"पुराणांतील फार प्राचीन काळच्या राजांच्या हकीगती सांगणें, हें सूतांचें कर्तव्य; थोड्या दिवसांपूर्वी मेलेल्या शूर राजांचें वर्णन करण्याचें काम मागधांचें; जिवंत लढव्या राजांची, उत्तम काव्यानें स्तुति करण्याचें काम बंदिजनांचें" ह्या नियमाप्रमाणें

धृतराष्ट्राच्या राजवाड्यांत संजय हा पुराण सांगत असे. अलिकडच्या इतिहासांतील सुप्रसिद्ध पुराणिक ह्मणजे चंदभाट. त्याचें पुराण ऐकिलें ह्मणजे " शूरवीर समरांगण गांठीत होते. व भित्रे शूर बनत होते. "

**भाट-[सूत] हे क्षत्रिय आहेतः**—थोरले शाहू महाराज ह्यांच्या कारकिर्दींत सवाई माधवराव पेशवे असतां ' चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ' ह्यांस ब्राह्मणासारखा वेदाधिकार आहे किंवा नाहीं? असा प्रश्न उपस्थित होऊन त्याकरितां विद्वान् मंडळींची सभा भरली. ही सभा पुष्कळ दिवस चालली होती. त्यावेळीं पुष्कळच वादविवाद झाला. त्याकरितां विद्वान् शास्त्री मंडळी दूरदूरच्या ठिकाणाहून मुद्दाम बोलाविली होती. त्या सर्वांनीं, ' गागाभट्टकृत ' गागाभट्टी उर्फ कायस्थधर्मप्रदीप ' गोविंदभट्टकृत ' गोविंद भट्टी ' कमलाकरभट्टकृत ' शूद्र कमलाकर ' व ' जातिविवेक ' आणि स्कंद पुराणांतर्गत ' रेणुका माहात्म्य ' इ० प्रमुख ग्रंथांच्या आधारानें असा निर्णय दिला कीं:—

"प्रभू आणि सूत–ज्ञाति ह्या क्षत्रिय आहेत. पूर्वीं क्षत्रिय राजांनीं देवगंधर्वांच्या मुली बलत्कारानें किंवा संतोषानें विवाहिल्या; शुक्राचार्य हे ब्राह्मण असून त्यांनीं आपली कन्या देवयानी ययाति राजास दिली होती. गंगेनें शंतनू राजास वरिलें होतें. असे विवाह सरसहा होत असून त्यांस धर्मशास्त्राचा प्रतिबंध नव्हता. 'सूतज्ञाति' ही उत्तम आहे. प्रभुज्ञाति ही उत्तमच. क्षत्रियधर्म सुटला तरि त्यांच्या वेदोक्त कर्माधिकाराचा लोप होत नाहीं. " ह्याप्रमाणें ' प्रभू ' ज्ञातीकरितां शास्त्री मंडळी

निर्णय देत असतां सूतासंबंधानें अनायासें, शके १७१२ विकृति नाम संवत्सरीं आषाढ वद्य १० रोजीं निकाल झाला आहे. ( ग्रामण्याचा इतिहास ) पृ ४८

मगध शद्वापासून मागध शद्व झाला आहे, असें पाणिनि ह्मणतो व हा मगध शद्व तद्राज्यार्थक हि आहे, असेंही तो लिहितो. ह्मणजे मगध देशात मागधांचें राज्य होतें. त्या देशांत एका काळीं जरासंध राजा होता. तसेंच विदेह देशांत वैदेह लोकांचें राज्य होतें. व तेथें एका काळीं जनकराजा राज्य कारित हाता. त्यास वैदेहि ह्मणजे सीता ह्या नांवाची एक मुलगी होती, ती दाशरथि रामास दिली होती. पाणिनि हा पराकाष्ठेचा आस्थेवाईक वैय्याकरण आहे. भाषेतील बारिक सारिक गोष्टीसुद्धा तो सांगावयाला विसरला नाहीं. असें असून ज्या अर्थी गंगा–शंतनू किंवा देवयानी-ययाति ह्याच्या मुलांस तो संकर असें सांगत नाहीं त्याअर्थी पाणिनिकालापर्यंत संकरजाति हा भेद समाजांत स्वतंत्रपणें अस्तित्वांत आलाच नव्हता, असें ह्मणावयास हरकत नाहीं. ह्मणजे अनुलोभ किंवा सवर्ण विवाहाप्रमाणें प्रतिलोभ किंवा विवर्ण विवाह देखील त्यावेळीं सर्वमान्य असून ते सर्वसाधारण प्रचालित होते. व प्रातिलोभ विवाहापासून झालेली संतति निंद्य मानिली जात नसे. पाणिनीच्या पूर्वी ऋषिकाळीं तर ब्राह्मण पतीपासून इतर दोन वर्णांच्या स्त्रीस झालेल्या संततीस पूर्ण ब्राह्मण समजत असत. ऋषिकाल व पाणिनीनंतरचा काल ह्यांत फरक हाच कीं पुढें प्रतिलोभ विवाह गौण मानूं लागले. व त्यानंतर याज्ञवल्कयस्मृतींत खालच्या वर्णाच्या स्त्रीशीं विवाह करूं नयें, असा प्रतिबंध केल्यामुळें हा मिश्र–विवाह बंद झाला.

वसिष्ठ प्रजापतीपासून ऊर व त्याच्यापासून उत्तानपाद, पुढें ध्रुव, ध्रुवास श्लिष्टी, पुढें रिपु त्याच्या पुढें चाक्षुष, पुढें मनु, त्याच्या पुढें उरु, उरू–पासून अंग व त्याला वेन, वेनाला पृथु हाच सर्व क्षत्रियांचा प्रथम पुरुष होय. या पृथूमुळें 'राजयश' गाण्यांत निपुण जे सूत-मागध ते अस्तित्वांत आले, हा जन्मतांच एक दिव्य धनुष्य, दिव्य बाण व एक कवच अशी सिद्धसामुग्री बरोबर घेऊन आला व लागलींच अंगिरसादि सर्व ऋषि व देव ह्यांसह ब्रह्मदेवानें येऊन ह्या पृथुराजाला राज्याभिषेक केला पुढें कांहीं दिवसांनीं ब्रह्मदेवानें सोमयज्ञ केला. त्या यज्ञांत सूतीच्या दिवशीं ह्मणजे ज्या दिवशीं सोमरस काढितात त्या दिवशीं सूत नांवाचा पुरूष उत्पन्न झाला व त्याच यज्ञांत पुढें मागध नांवाचा दुसरा पुरूष उत्पन्न झाला. त्यावेळीं देव आणि ऋषि ह्यांनीं ह्या दोघां पुरुषांस सांगितलें कीं, अहो बुद्धिवंतांनो ! तुह्मीं या पृथुराजाची स्तुति करित जा. आम्हीं तुह्मांला ह्या राजाची स्तुति करावयास सांगतों, त्या स्तुतीस हा राजा सर्वस्वी पात्र आहे. तेव्हां ते सूत–मागध ह्मणाले कीं आम्हीं याची स्तुति करण्यास तयार आहों, पण ह्यानें कोणतें पुण्यकर्म केलें आहे व काय पराक्रम गाजविला आहे हें आह्मांस सांगा. ह्यावर त्यांनीं ह्याचीं पुण्यकर्मे व पराक्रम सांगितल्यावर ते सूतमागध पृथुराजाची यथास्थित स्तुति करूं लागले त्यावेळेपासून कोणत्याही राजानें कांहीं स्तुत्य कृत्य केलें असतां सूतमागध येऊन राजाचे गुण गातात. व आशीर्वाद देऊन जयजयकार करितात. असो; त्या स्तुति–कुशल सूत मागधांची स्तुति ऐकून पृथुराज अतिशय खुष झाला व त्यानें त्यांच्या कामगिरीबद्दल सूताला अनूप नांवाचा देश व मागधाला मगध नांवाचा देश इनाम दिला. (महाभारत हरिवंशपर्व अ० ५) ह्या मगध देशाजवळ

अंग नांवाचा देश आहे. तो दुर्योधनानें कर्णास दिला होता. कर्णास सूतपुत्र ह्मणण्याचें कारण असें कीं:–पूर्वी ययाति नांवाचा राजा होऊन गेला. त्याला पुरू नांवाचा मुलगा होता. पुढें ह्या पुरूच्या वंशांत बृहन्मन नांवाचा एक मोठा प्रतापी राजा होऊन गेला. त्यास दोन स्त्रिया होत्या. पैकीं एकीला विजय नांवाचा पुत्र झाला, विजयाला धृति, धृतीला धृतव्रत, त्याला सत्यकर्मा व सत्यकर्माला अधिरथ नांवाचा सूतपुत्र ह्मणजे स्तुतिकरण्यांत कुशल असा पुत्र झाला. या अधिरथ सूतानें कुंतिपुत्र कर्णाचें पालन–पोषण केलें होतें. ह्मणून कर्णाला सूतपुत्र ह्मणतात. सूत ह्मणजे कोळी असाहि सूत शद्बाचा दुसरा एक अर्थ आहे व ह्या अर्थावरून पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं अधिरथ हा धृतराष्ट्राचा सारथि, कोळी जातीचा होता. पण हा त्यांचा फार मोठा गैरसमज आहे. वास्तविक अधिरथ हा कोळी नसून सूत ( ह्मणजे भाट ) होता. हें महाभारत–हरिवंशपर्व अ० ३१ ह्यांत स्पष्ट सांगितलें आहे; अधिरथ हा कोळी होता ही समजूत चुकीची आहे.

लोमहर्षण हा, भाट समाजांतील पुराण पुरुष होय. तो सुप्रसिद्ध पुराणिक होता. एकदां नैमिषारण्यांत दीर्घकाळपर्यंत ऋषि–मंडळी यज्ञ करित असतां लोमहर्षणास ब्रह्मासन दिलें होतें. तेथें दर्शनाकरितां बलराम दादा आले असतां सर्व मंडळींनीं त्यांस उत्थापन देऊन त्यांचें स्वागत केलें, पण लोमहर्षण मात्र उठला नाहीं. हा अपमान बलरामदादास सहन न होऊन त्यानें तेथेंच लोमहर्षणास ठार मारिलें. त्यावेळीं बळराम दादा म्हणाले, हा सूतपूत्र असून ह्यानें माझा अपमान केला, ह्मणून हा वध्य आहे. इ० हकीगतीवरून आणि त्याच्याहि पूर्वीच्या, पृथुराजाच्या वरलिहिलेल्या कथेवरून व अधिरथ कर्णास

दुर्योधनानें अंग देशाचें राज्य दिलें त्यावरून ही सूत मंडळी क्षत्रिय वर्गांत मोडते, हें स्पष्ट आहे. आतां कोणी अशी शंका घेतील कीं, "लोमहर्षणास मारिल्यामुळें बलरामदादास ब्रह्महत्त्येचें पातक लागलें. ह्या वरून लोमहर्षण हा ब्राह्मण होता असें ह्मणावें लागते." ह्यावर उत्तर असें कीं, तो ब्रह्मवेत्ता असल्यामुळें किंवा त्यास पूर्ण ब्रह्मज्ञान झाल्यामुळें तो ब्राह्मण झाला इतकेंच पण त्याचा जन्म सूत कुळांतच झाला होता. पूर्वी ब्राह्मणांस क्षत्रिय व क्षत्रियांस ब्राह्मण होतां येत असे. हल्लीच्याप्रमाणें पूर्वींचा समाज कृपण नव्हता. विश्वामित्र हा क्षत्रिय असून ब्राह्मण झाला अशीं उदाहरणें आपल्या पुराणांत पुष्कळ आहेत. तेव्हां ह्या सूत मंडळीचा क्षात्रिय वर्गांतच अंतर्भाव होतो हें निःसंशय आहे. सूत, मागध हे शब्द हि अमर–कोशांत क्षत्रिय वर्गांत सांपडतांत ह्यावरूनही माझ्या विधानास बळकटी येते.

**सूतांचा [भाटांचा] संस्कार लोप**—पाणिनी तीन हजार वर्षांपूर्वी होऊन गेला. कात्यायन त्याच्या नंतर सहाशें वर्षांनीं व पंतजलि आठशें वर्षांनीं होऊन गेले. पाणिनिकाळीं बौद्ध व जैन वगैरे पाखंडी लोक मुळीं प्रचारांत नव्हतेच. कात्यायन-पतंजलि काळीं ह्या सनातन धर्म–द्वेष्ट्या लोकांचा बराच सुळसुळाट झाला होता. हे लोक ब्राह्मणांचें गुरुत्व मानित नव्हते. पाणिनी काळीं सर्व समाज ब्राह्मणांचा अनुयायी होता, व त्यानंतर कात्यायन–पतंजलिकाळीं समाजांतील बराच मोठा भाग चातुर्वर्ण्य सोडून बुद्ध व जिन ह्यांचा अनुयायी बनला होता. ह्यामुळें अशा लोकांत यज्ञादि वैदिक क्रियांचा लोप होऊन ते सर्व केवळ शूद्रसम बनले! ह्या यज्ञोपवित टाकून शूद्रसम बनलेल्या क्षत्रिय—वैश्यांसंबंधानें ब्राह्मणांस साहजिकच तिरस्कार वाटूं लागला. हे लुप्तक्रिय लोक सनातन

धर्माच्या व बौद्ध-जैनादि पाखंड्यांच्या सीमाप्रदेशावर असत. प्रसंग पाहून त्यांनीं कधीं सनातन धर्माकडे झुकावें तर कधीं पाखंड्यांचा पुरस्कार करावा. अशा लोकांचा ब्राह्मणवर्ग तिरस्कार करी व शूद्रांच्या पंक्तीस बसवी. अशोकादि सम्राट् देखील बौद्ध-जैनांचा पुरस्कार करूं लागले. त्यांनीं ब्राह्मणधर्माची व त्यांच्या आचारविचारांची निंदा करण्यास प्रारंभ केला. आणि चातुर्वर्ण्यांतील आचारविचार सोडून ब्राह्मणांचें गुरुत्व झुगारून देण्याच्या हेतूनें त्यांनीं उपनयनादि क्रिया करण्याचें सोडून दिलें ! ह्याप्रमाणें बुद्ध व जैन ह्यांनी वर्णव्यवस्थेंत भयंकर क्रांति घडवून आणिली ! पुष्कळ क्षत्रिय व वैश्य ह्यांच्या क्रिया व संस्कार ह्यांचा लोप होऊन ते व त्यांच्या स्त्रियाहि शूद्रसम बनल्या ! तो प्रकार अद्यापि तसाच आहे. परंतु पुढें आद्य शंकराचार्यांनीं बौद्धधर्माचा पाडाव केल्यावर हे पाखंडमतानुयायी सर्व लोक परत हिंदुधर्मांत आले. तेव्हां ते आपलीं गोत्रें व प्रवरें वगैरे पार विसरून गेले होते. ह्यामुळें कांहीं दुराग्रही ब्राह्मणांनीं त्यांना स्वाभाविकपणेंच शूद्रांत गणलें !

शिवाय दुसरेंहि कारण असें झालें कीं, उत्तर हिंदुस्थानांतून भोसले, जाधव, शिरके वगैरे राजवंश इकडे आले तेव्हां त्यांची वस्ती या भागांतील शूद्र लोकांत झाल्यामुळें त्यांचा सर्व व्यवहार पुढें पुढें इकडच्या रहिवाशांप्रमाणें होऊं लागला. त्यांनीं आपले उपनयन वगैरे कांहीं संस्कार बंद केले. त्यांच्याबरोबर त्यांचे भाटहि आले होते. त्यांनीं हि आपल्या यजमानांप्रमाणें आपले उपनयनादि संस्कार बंद केले ! उत्तर हिंदुस्थानांत भाटांचे हल्लींसुद्धां ब्राह्मणाप्रमाणें संस्कार होत. आहेत.

**भाटांचे सोळंखी घराणें**—सोळंखी उर्फ चालुक्य वंश भारद्वाज गोत्री असून त्यांचे मूळस्थान लाहोर आहे. हे सामवेदी असून त्यांचे

पूज्य दैवत कपिलेश्वर महादेव आहे. ह्या वंशांत मूळराज सोळंखी ह्मणून एक प्रसिद्ध पुरुष होऊन गेला. त्यानें अन्हिलपुरास राज्य स्थापिलें. ह्याच्या वंशांत पुढें सिद्धराज जयसिंगाचे कारकीर्दींत लोक फार आनंदांत होते. ह्या वंशाची महंमद गजनवीनें वाताहत केल्यावर त्यांतील पुष्कळ मंडळी मध्यहिंदुस्थानांत येऊन राहिली. ते अद्यापि कोठें कोठें राज्य करित आहेत. त्यांपैकीं बांधवगड, पेठापूर रूपनगर, लुनावाडा वगैरे ठिकाणची ठाकूर मंडळी सिद्धराजाचे वंशांतील आहेत.

**रूपनगरची राजकन्या:**—ह्या ठिकाणीं रूपनगरच्या राजकन्येसंबंधानें इतिहासांतील एक गोष्ट सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं. ह्या कथेवर श्रीयुत हरि नारायण आपटे ह्यांनीं "रूपनगरची राजकन्या" ह्या नांवाची एक मोठी ऐतिहासिक सुरस कादंबरी लिहिली आहे. ह्या कादंबरींत त्यांनीं त्या राजकन्येचें नांव " चंपावती " असें दिलें आहे. ह्याच विषयावर गुजराथी भाषेंतहि " वीरबाला " ह्या नांवाचें एक सुरस नाटक आहे. त्यांत हिचें नांव " महादेवी " असें आहे. आह्मीं तिला ' वारमती ' असें तिसरेंच नांव ठेवितों. अशा प्रसिद्ध वीर स्त्रीच्या नांवासंबंधानें इतिहास मुग्ध आहे. याचें नवल वाटतें. उदेपूरचे राजघराणें सूर्यवंशी आहे. त्या घराण्यांत ह्या चंपावतीचा जन्म झाला व ती पुढें जोधपूरचा राणा जसवंतसिंग ह्यास दिली. जसवंतसिंग हा एकदा युद्धांतून पळून आला. हें शल्य त्याची मानी स्त्री चंपावती हिला मुळींच खपलें नाहीं ! तिनें योग्य शद्बांनीं पतीचा समाचार घेऊन आपण स्वतां पुरुषाचा वेष घेऊन युद्ध करण्यास गेली व जय मिळवून परत आली. ह्या आवेशयुक्त प्रसंगाचें वर्णन कवींच्या शद्बांनीं दिलें ह्मणजे वाचकांस तें ज्यास्त स्फूर्तिदायक होईल ह्मणून तें जसेंच्या तसें पुढें देत आहे:—

( काव्यरत्नावलीवरून )

# आर्या

त्या रात्रीं जसवंता घडलें इच्छा नसून जागरण ।
निद्रा न ये तयाला मिटून धरिले जरी तयें नयन ॥ १ ॥
सिंहासन भूपाचें मृदुल परांचें, असें दुरून दिसे ।
त्यावरि बसे, फसे तो, युक्त विषें झोंवतां तयास कुसें ॥ ५
होतां नवीच त्याच्या हृदयाला आज काळजी जडला ।
चिंता वैरीण तिची सान्नध पाहूनि झोंप अवघडला ॥ ७ ॥
निद्रेचीं उपकारणें हातीं जोडून हात सिद्ध तिथें ।
परि तीं निष्फल ठरलीं चिंतामग्नास सौख्यहो रुततें ॥ ८ ॥
चंद्रकरें न्हालेल्या गच्चीवर उंच मंचकीं शयनीं ।
भूपाजवळ पहुडली होती सर्वांग--सुंदरा रमणी ॥ ९ ॥
वर मंडप वेलींचा वायूची डोलवी जया लहरी ।
शय्येवरी फुलांची वृष्टि करी, गंध दशदिशा पसरी ॥ १० ॥
रजनी षण्मासाची ऱ्हस्वचि कोणासही तदा गमती ।
परि दुर्दैव! पळेंही जसवंता भासलीं युगासम तीं ॥ ११ ॥
शयनावरी तळमळे फिरवी कर मस्तकावरी डावा ।
ढाळ करून कराचा चिंतेच्या चुकवितो जणूं घावा ॥ १२ ॥
उजवा हात तयाचा स्वस्त्रीच्या आडला उशा खालीं ।
न तरी त्यानें ही तो शिर निज आच्छादिता तया कालीं ॥१३॥
परि झोंप मोड तीची विचार सहवे न त्यास हा नुसता ।
हातच काय तयानें तिजकरितां प्राण खर्चिला असता ॥ १४ ॥
प्राणप्रिय दयितेला त्या अंतरणार आज तो होता ।
त्याच विचारें त्याच्या हृदयाला पीळ चढविला मोठा ॥ १५ ॥

युक्ति करून तयानें सोडविला, हात गुंतला, अधर ।
तों नखशिखान्त दिसली निज दयितामूर्ति त्यास रम्यतर ॥१८॥
कुंतललकारमंडित भालावर घर्म बिंदु चमचमती ।
इंदुकरें रंगविले सर मोत्यांचेच गुंफिले गमती ॥ १९ ॥
श्वास सुगंधित वाहे, घर्म उठे, रंजित स्मितें गालीं ।
ताजी गुलाब-कलिका, विलसे ती, दहिंवरें जशी न्हाली ॥२०॥
पवनें पदर सरकला, प्रकट तिचा होय रम्य हृत्प्रांत ॥
दर्शन करील ज्याचें योग्याचे ही मनास विभ्रांत ॥ २१ ॥
निजला उठून बसला, हसला, रडला, पुनः पुन्हां नृपती ।
आंदोली मन पडलें करवी देहाकडून तीच कृती ॥ २४ ॥
" राज्य कशाला व्हावें ज्यासाठीं माजती जगांत रणें ।
करणें दूर प्रियजन, झुरून विरहांत शेवटीं मरणें ॥ २५
येतों गरिबां पोटीं जावें कां आज लागतें समरीं ।
वारितों उटजीं स्त्रीसह सुख, अनुभविलें नसेल जें अमरीं ॥ २६
केला खेद असा, नच जाणें युद्धास खास चुकणार ।
यास्तव केला त्यानें निघावयाचा मनांत निर्धार ॥ २७
दृढ एकदां धरावी स्वसखीला आवळून हृदयाशीं ।
एकच चुंबन घ्यावें म्हणून तो लगटला तिच्यापाशीं ॥ २८
कंठांत मिठी घालीं अधरामृत पान तो करूं लागे ।
किती वेळ असा गेला, त्याची न तथापि ती तृषा भागे ॥ २९
दुंदुभिरवें उठविली, सारी सेना जमे ध्वजा जवळी ।
परि भूप बाहुपाशीं प्रियदयितेला पुनः पुन्हां कवळी ॥ ३०
जागी झाली शयनीं सस्मित वदने परी न वीरमती ।
प्रतिदान पतिकृतीचें करावया विषयलीन वा स्वमती । ३१

लोचन धुंद जहाले विषय भरानें नव्हे प्रबल रागें ;
आली लाली भाली चढूनिया रक्तधरं न अनुरागें ॥ ३२
नव्हता अप्रिय तिजला कांत—समागम तथापि ती वेळ !
योग्य नसे प्रेमाचे ते खेळायास लाडके खेळ ॥ ३५ ॥
क्षत्रिय धर्म निघावें समरा सांडून वाढलें ताट -
अव्हेरून प्रेमें वा स्त्रीनें घातला गळां हात ॥ ३६॥
त्यास स्वपति विसरला, पित्त तिचें फार भडकलें तेणें ।
तें क्षात्रतेज उज्वळ गृहधनरतिसुख रणापुढे नेणें ॥ ३७ ॥
" गेला असाल समरीं रात्रीं समजून शांत मी निजलें ।
थिजलें पाहुनि तुह्मा उजाडता विषय सेवना सजले ॥ ३८ ॥
स्त्रीसह पडून शयनीं, अंकीं घेऊन वा मुलें तान्हीं ।
नृपपद काय मिळविलें- तुमच्या प्रियपूज्य शूर पितरांनीं ॥३९॥
मृत्युमुखांत शिरावें रगडावे बाण संगरीं दातीं ।
तलवारीचें पाणी प्यावें, ये राज्य तेधवां हातीं ॥ ४० ॥
जें आयतें मिळालें त्याचा करवे न काय सांभाळ ? ।
संसार मग कशाला ? बरवी घ्यावी करांत जपमाळ ॥ ४१ ॥
कैसे विलास सुचती ? शत्रूनीं देश वेढिला सारा ।
काय दिसे न तुह्मांस्तव रिपुंनीं उघडून ठेविली कारा ॥ ४२ ॥
रणदेवी सुयशाची अर्पण वीरास ज्या करी कंठीं ।
आह्मीं क्षत्रिय बाला मिठी तयाच्याच घालितों कंठीं ॥ ४३
जा, समरीं फडकूं द्या, स्वयशाचा अरिवरी जरीपटका ।
जन्मांत न ये कोणा ही सोन्याची पुनः पुन्हां घटका ॥ ४४
तुमच्या जरि रणगमना मी दुर्भाग्या असेन आडथळा ।
पडतें मरून चरणीं करून देतें तुह्मांस मार्ग खुला ॥ ४५ ॥

यापरि निखंदिला नृप, गेला सहकटक संगरीं तडक ।
परि मन घरींच ठेवी जरि दयिताशब्द झोंबले कडक ॥ ४६
केली समरीं त्यानें लगट; परी सर्व होय वायफळ ।
मन विरहित कायेचे कष्ट वृथा मावतील काय फळ ? ॥ ४७
बल त्याचें बहु खचलें उरलें दळ लागलें पळायाला ।
आला भूपावरही काळाचा उघड तेधवां घाला ॥ ४८
येतां मरण कशाची दिसते ! रमणी करी विचार मनीं !
मुख अपयशें मिळालें घेऊन निघे घरास वीरमणी ॥ ४९
पतिरणविन्मुखतेची दुर्वार्ता आयकून वीरभर्ता ॥
रागेंज, त्या विषयीं होय तिची तेधवां विषण्णमती ॥
कांती गजर तयाचा, जरि नाथ तिचा रणीं लढत मरता ।
परि तावद होय तिला, वार्ता जीवंत हा फिरे परता ॥ ५१
समरास पुरुष भ्याला, सत्य तयें स्वयश मळविलें धवल ।
मुख झालें तें काळें दूर बरें, अशुभ मज नको जवळ ॥५२॥
चिंतून मनीं ऐसें शीघ्र तिनें बंद करविली वेस ।
पाठविला जसवंता दूताकरवीं सखेद संदेश ॥५४॥
" नृपवंश उदेपुरचा सूर्योद्भव गाजतो जगीं ख्याती ।
ध्याती तुझास सारे नद्यश कवनीं घरोघरीं गाती ॥ ५५ ॥
वीर पराक्रमशाली किती उदेले तयांत आजवरी ।
गणती करवे कोणा ? कवण तयांचा रणांत हात धरी ॥५६
गोष्ट असो पुरुषांची समराचें सहज त्यांजला कृत्य ।
त्यासाठीं त्या घडिले दिधलें तैसेंच त्यांस सामर्थ्य ॥५७॥
परि तनु कोमल ज्यांची जातिलतेवर जसें हसे सुमन ।
सुमन प्रेमल ज्यांचें लवताप सहावया असे क्षम न ॥५८॥

शौर्य रणीं गाजविलें ऐशा सुकुमार सदय अबलांनीं ।
पुरुषां स्फुरण चढविलें, स्वकुलाची राखिली जगीं बाणी ॥५९॥
त्या वीर कुलीं वीरोत्पन्ना मी नम्र आपली दासी ।
प्रेमें विरांबेनें वाढविलें मज धरून हृदयाशीं ॥६१॥
खेळ धनुर्बाणाचें शिकवी मज वीरबंधुचा जोडी ।
साहस पराक्रमाची बाळपणीं लागली मला गोडी ॥ ६२॥
वीरपती मिळवावा, होता निर्धार हा मनीं केला ।
प्रेमें तुह्मांस वरितां तो पण सिद्धीस वाटलें गेला ॥ ६३ ॥
वीर ह्मणून जय च्या अंकीं निर्भास्त झोंप मा घ्यावी ।
वीर नव्हे, पुरुष नव्हे जो दुर्बल भीरुता रणीं दावी. ॥ ६४ ॥
अबलाच ती ह्मणावी, पुरुषाचा मात्र घेतला साज ।
ओष्ठीं कां मिरवावी ? मिशी तिची राखवे न जर लाज ॥६५॥
जन्मून वृथा जगतीं धरणीला मात्र जाहला भार ।
स्वकरीं धरून निष्फळ विटाळिली विजयपात्र तलवार ॥ ६६ ॥
अपमानाचे जीवित मरण बरें फार फार त्याहून ।
मान नव्हे प्राण तुह्मीं आला समरांत आज वाहून ॥ ६७ ॥
विगतप्राण शरीर प्रेतच कां ! आणितां घरां सांगा ॥
प्रियकर शवही अशुभचि गृहीं, स्मशानींच त्याजला जागा॥६८॥
संदेश मर्मभेदक हा, न बसे, पाठवून ती नुसती ।
क्षात्रव्रतास साजे, ऐशी सहगमन– सिद्ध होय सती ॥ ७७ ॥
कवच तनूवर घाली, चढवी, निजमस्तकीं शिरस्त्राण ।
क्षत्रिय-शील–प्रतिमा दृढहृदयाशीं धरी धनुर्बाण ॥ ७८ ॥
जें अल्प सैन्य होतें, नगरीं घेऊन संगतीं सर्व ।
धारातीर्थास निघे ती साधाया जणों महापर्व ॥८५॥

मूर्तिमती वीरश्री जयघोष करीत चालली वाटे ।
कीं चपला गगनींची स्त्रीवेषें चमकली जगीं वाट ॥ ८६
कीं प्रलय निवाराया माजविला या जगांत जो असुरीं ।
वीरमतीच्या रूपें अवतरली आदिशक्ति ही दुसरी ॥ ८७
सौंदर्य यौवनानें शोभे, खुलवी तयांत नरवेष ।
आणी विशेष शोभा देहीं जो फडकला रणावेश ॥ ८९ ॥
स्फुरती अचेतनाचे, तें वीरारूप पाहतां, बाहू ।
सेना तिचा कशी मग न ह्मणेल प्राण संगरीं वाहू ॥ ९० ॥
सिंहीण उडी घाली मत्त गजावरि धरी न भीति मनीं ।
तैसी अल्प दलासह ती खलबलसागरीं पडे रमणी ॥९१॥
नव्हते शत्रु असावध, घेरा तिजभोंवतीं दिला त्यांनीं ।
जैसा कळप वृकांचा हरिणीला एकल्या धरी रानीं ॥ ९३ ॥
करिते बद्ध तिला रिपु, अथवा समरीं तिचा बळी पडता ।
परि सांवरून धरितो, परमेश्वर पक्ष आपला पडता ॥ ९४ ॥
व्याघ्रव्यथित जहाला मर्मावर घाव लागतां उलटे ।
धांवे शरानुरोधें माराया मर्मभेदकास झटे ॥ ९५ ॥
स्त्रीसंदेशशरानें जसवंताच्या मना घरे पडले
मंदावलें असे जें वीर्य, नवें तेज तेधवां चढलें ॥ ९६ ॥
स्वस्त्री समरीं गेली घेऊन स्वशिर आज तळहातीं ।
मग काय जगीं उरलें? वाचायाचें वृथा कुणासाठीं ॥ ९७ ॥
समरपरित्यागानें धवलतरा कीर्ति जाहली काळी ।
प्रेम स्त्रीसह गेलें उदासता राजवैभवा आली ॥ ९८ ॥
उद्वेगून असा तो क्रुद्ध व्याघ्रापरी अरींत शिरे ।
वाताहत त्यास करी खड्गें उडवुनि नभीं असंख्य शिरें ॥९९॥

शौर्ये समजविली स्त्री होती तद्वीरुतेस जी विटली ।
नटली विजयश्रीनें हृदयींची तेधवां गुढी सुटली ॥ १०० ॥
अनुभव जेत जितांचे युक्तिबळें क्षात्रतेज मालवती ।
निःस्वत्व जे तयांचीं सहजच जेत्यापुढें शिरें लवती ॥१०१॥
आलें न रजपुतांचें परि यवनां सर्व हरवितां पाणी ।
कारण वीरमतीसम असती जागृत गृहीं स्त्रिया मानी ॥११२॥

( विनायक )

**भोजन व्यवहारः**—पाणिनिकालीं व तत्पूर्वीं एक विशेष गोष्ट अशी दिसून येते कीं, त्याकाळीं त्रैवर्णिकांनीं परस्परांत अन्न-व्यवहार करूं नये असें निषेधपर स्मृतिवचन कोणत्याच ग्रंथांत नाहीं; तर उलट अशा भोजनास संमतिदर्शक अशींच वचनें आढळतात. हल्लीं सुद्धां क्षत्रियमराठासमाजाचा भाटाशीं परस्परांत अन्नव्यवहार होत आहे इतकेंच नाहीं तर ते भाटांस फार सत्कार–पूर्वक भोजन घालितात ! पंक्तींत पहिल्यानंबरचें पान भाटाचें; इतरजनांस पाट नसले तर हरकत नाहीं पण भाटास पाट अवश्य देतात ! ही चाल क्षत्रियमराठा-समाजांत हल्लीं दिसून येते ! शूद्राशीं मात्र कोणीही अन्नव्यवहार करूं नये अशी धर्मशास्त्राची आज्ञा आहे. त्यांस वसिष्टस्मृतींत ' वृषल ' असें निंद्य नांव दिलें आहे ! अर्थात् शूद्राशीं अन्नव्यवहार करणें धर्म-बाह्य आहे.

**भोजननिर्बंध**–पुढील गोष्टींत मात्र आमचे भाट हे भोजननि-र्बंध अत्यंत कडक रितीनें पाळीत असत. पति आणि पुत्र नसलेली स्त्री ह्याचें अन्न आयुष्य हरण करितें. व्याजावर उपजीविका करणाऱ्यांचें अन्न विष्टा आहे ! वेश्येचें व स्त्रीजित मनुष्याचें अन्न वर्ज्य असे.

तसेंच सुतार, सोनार, रजक, व्यभिचारिणी, वैद्य, रंगारी, स्त्रियांच्या जिवावर चरितार्थ चालविणारे, ज्येष्ठ बंधूपूर्वी लग्न करणारे ह्यांचे अन्न वर्ज्य असे. दहा दिवस होण्यापूर्वी अशौच्य अगर वृद्धि असलेल्या लोकांचा कोणताही पदार्थ भक्षण करूं नयें. देव, ऋषि व गृहांतील देवता यांचें पूजन करून नंतर गृहस्थाश्रमी माणसानें भोजन करावें. ह्याप्रमाणें भोजनाचे कडक निर्बंध भाटांस पाळावे लागत.

**विवाहपद्धतिः**—प्राचीन काळीं विवाहनिर्बंध विशेष कडक नसल्यामुळें ब्राह्मण क्षत्रिय व वैश्य ह्या तीन वर्णांत परस्पर लग्नसंबंध होत असत. गंगा ही ब्राह्मण असून तिनें शंतनूस व देवयानीनें ययातीस वरिलें होतें. ह्याच्या उलट रेणुका क्षत्रियकन्या असून तिनें जमदग्नीस व जरत्कारी ह्या क्षत्रियकन्येनें जरत्कारू ब्राह्मणास वरिलें होतें; तसेंच विश्वामित्राची बहीण सत्यवती हिनें ऋचीक नांवाच्या ब्राह्मणास वरिलें, ह्याच्यापासून जमदग्नि झाला. अशीं अनेक उदाहरणें पुराणांत आहेत. असल्या विवाहास धर्मशास्त्राचा प्रतिबंध नव्हता, व अशा विवाहापासून झालेली संतति कोणत्याही प्रकारें कमीप्रतीची समजली जात नसे तसेंच त्याकाळीं क्षत्रियांस ब्राह्मण व ब्राह्मणास क्षत्रिय होतां येई. अशा प्रकारची त्यावेळीं समाजाचीं उदारमतें होतीं. विवर्ण विवाहापासून झालेल्या संततीसंबंधानें महाभारत—अनुशासनपर्व अध्याय ४८ मध्यें सविस्तर माहिती दिली आहे.

**सूत**—हे स्तुतिपाठक आहेत, ह्यांसच हल्लीं भाट ह्मणतात. ह्यांस उपनयन संस्काराचा अधिकार आहे, असा अनुशासनपर्व अ० ४८ मध्यें स्पष्ट उल्लेख केला आहे. पुराण सांगणें, राजवंशांचीं चारित्रें

म्हणजे इतिहास लिहून ठेवणें, राजवंशावलि संभाळणें, राजांचे व त्यांच्या पूर्वजांचे स्तुतिपाठ शौर्योत्पादक काव्यांत गाऊन स्फुरण चढविणें हीं यांचीं कामें सांगितलीं आहेत.

**वैदेह**—ह्यांनीं अंतःपुरांतील स्त्रियांचें रक्षण करणें असा ह्याचा धंदा लिहिला आहे.

**मागध**—ह्यांसच बंदी म्हणतात. ह्यांचें काम दरबारांतील इतर जनांची स्तुति करणें असें सांगितलें आहे.

**वैतालिक**—सकाळीं राजाला झोंपेंतून उठविणें हें यांचें काम आहे. राजा निजला असेल त्या ठिकाणच्या जवळपास उभे राहून सामान्य आवाजानें त्याचें प्रशंसापर काव्य म्हणत रहावें म्हणजे राजाला जाग येऊन तो निजून उठे, असें ह्याचें वर्णन आहे.

ह्याप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तिन्ही वर्णांचे परस्परांत लग्नसंबंध होत. व अशा प्रतिलोभ विवाहापासून उत्पन्न झालेली प्रजा यास्क, शाकटायन, पाणिनि वगैरे सूत्रकारांनीं यत्किंचित्‌हि निंद्य मानिलेली नाहीं, असें मागें सप्रमाण दाखविलें आहे पुनर्विवाहाची मात्र स्त्रियांना बंदी होती. दुर्दैवानें तसा प्रसंग आल्यास त्या अग्निकाष्टें भक्षण करीत ! किंवा केशवपन करीत ! पांडवांची आई कुंती हिनें एकदां असें म्हटलें आहे कीं:—

पतिपूर्वी स्त्रीस मरण हें लग्नाहून काय होऊन ।
न रहावेंचि सतीनें क्षणभरिहि विरूपकाय होऊन।। म. भा. आदिपर्व।।

ह्यावरून विशेष कारणामुळें पतिनिधनानंतर अग्निप्रवेश न करितां जिवंत राहाण्याचा प्रसंग आला तर त्यांस विरूपकाय करून

ठेवीत असत. ह्मणजे त्यावेळीं केशवपनाचीही चाल होती; परंतु कोणत्याही कारणांनीं पुनर्विवाह होत नसत. उपभुक्ता स्त्री विवाहास योग्य नाहीं. अशा स्त्रीशीं विवाह करणारा मनुष्य नरकांत जातो, अशी धर्मशास्त्राची आज्ञा असल्यामुळें व आमचा सूत ( भाट ) समाज अत्यंत धर्मनिष्ठ व वळणदार असल्यामुळें ह्या समाजांत पुनर्विवाहास बंदी होती. विवाहास योग्य स्त्री ह्मणजे अनुपक्मुता असावी, असा नियम आहे. परंतु कालांतरानें अनेक आपत्ति, व अडचणी आल्यामुळें (ह्मणजे बाल–वैधव्यासारखे हृदयविदारक प्रसंग नेहमीं डोळयापुढें आल्यामुळें ) हा पुनर्विवाहाची चाल अलिकडेच समाजभर रूढ झाली आहे.

**सूत [भाट] स्त्रियांचा पडदा**–ही चाल हिंदु लोकांत कांहीं कांहीं जातींत आहे व ती, मुसलमान राज्यकर्त्यांच्या निकट साहचर्यानें त्यांनीं मुसलमानी अमलापासून सुरू केली असा पुष्कळ लोकांचा समज आहे पण तो चुकीचा आहे. कारण लग्नसमारंभादि प्रसंगीं यज्ञाचे वेळीं किंवा संकट समयीं स्त्रियांनीं पडदा टाकून उघडपणें वापरावें. असें रामानें सीताशुद्धीच्या वेळीं सांगितल्याचें रामायणांत वर्णन आलेलें आहे, तसेंच महाभारताच्या शल्यपर्वांत भारतीय युद्धाच्या शेवटीं कौरवस्त्रियांचें " ज्या स्त्रिया सूर्यानेंही कधीं पाहिल्या नाहींत, त्या आज उघड्या होऊन पळूं लागल्या " असें वर्णन दिलें आहे. शिवाय भारतीययुद्ध संपून सर्व कौरव स्त्रिया गंगेवर तिलांजलि देण्यास निघाल्या, त्यावेळींसुद्धां "ज्या स्त्रिया सूर्यासहि दिसणें शक्य नव्हत्या त्या आज उघड्या अनेक लोकांच्या नजरेस पडत आहेत." असें स्त्रीपर्वांत वर्णन आहे. ह्यावरून पडद्याची चाल आम्ही मुसलमानांपासून उचलली नाहीं, तर आमच्यांत प्राचीन काळापासून ही चाल आहे असें ठरतें. त्यावेळीं सनाथ

स्त्रियांस हा पडदा विशेष कडक असे, अनाथ स्त्रियांस तो सौम्य असे. हीच परंपरागत रीति भाटसमाजांत प्रचलित आहे

**सूत (भाट) स्त्रियांचा पोषाख**-पूर्वी भाट स्त्रियांना दोन वस्त्रें होतीं. एक उत्तरीय व दुसरें अंतरीय. अंतरीय वस्त्र नेसून तेंच खांद्यावर घेण्याचा परिपाठ होता. व उत्तरीय वस्त्र डोक्यावर घ्यावयाचें होते. ही चाल उत्तर हिंदुस्तानांत अद्यापि दृष्टीस पडते. दक्षिण हिंदुस्तानांत अंतरीय वस्त्रच लांब केलें असल्यामुळें उत्तरीय वस्त्र घेण्याची जरूर पडत नाहीं. अंतरीय वस्त्र नेसून कासोटाही घालण्याची चाल होती. कुमारी मुली मात्र कासोटा घालीत नसत. उत्तरीय वस्त्र रंगीबेरंगी असे. विधवा नेहमीं पांढरीं वस्त्रें वापरीत. कंचुकीही घालण्याची चाल होती. पुरूष सोन्या रुप्याच्या कलाबतूनें मिश्रित केलेले कपडे वापरीत व दाढी ठेवीत असत.

**सूत [ भाट ] ह्यांची वागणूक**:-हे लोक अत्यंत शुद्ध व सदाचरणी असून सत्य व स्पष्टवक्ते होते. हे रोज प्रातःस्नान करीत. ह्यांची स्वयंपाक करण्याचीं भांडीं फार स्वच्छ असत. मातीचीं भांडीं रोज फेंकून देऊन नवीं घेत. स्नान केल्यावर ते कोणास शिवत नसत. मलमूत्र-विसर्जन केल्यावर ते आंघोळ करीत. रोज स्वच्छ धुतलेलें वस्त्र नेसत. संध्यावंदन करणें हें कधींच चुकत नसे. शिवाय दुसऱ्यानें वापरलेलें वस्त्र व जोडे ह्यांचा उपयोग करीत नसत. नीच कुलोत्पन्न पुरुषाबरोबर गमन करीत नसत. पौर्णिमा, अमावस्या, चतुर्दशी व अष्टमी ह्यादिवशीं ब्रह्मचर्य पाळीत. मार्गक्रमणानंतर, विद्येचा पाठ घेतांना, आणि भोजनाच्या अगोदर पादप्रक्षालन करीत. निजून उठल्यावर आईबाप व

गुरू ह्यांस वंदन करीत, उत्तरेस व पश्चिमेस मस्तक करून निजत नसत. पायानें आसन घेऊन त्यावर बसत नसत. पूर्वेस तोंड करून भोजन करीत. दुसऱ्याचें स्नानोदक घेऊन स्नान करीत नसत. भस्मावर, गोठ्यांत किंवा उभ्यानें लघुशंका करीत नसत. दोन्ही हातांनीं मस्तक खाजवित नसत. सूर्य, अग्नि, देव, ब्राह्मण व गाय ह्यांच्याकडे तोंड करून लघुशंका व दीर्घशंका करीत नसत. रात्रीं स्नान करित नसत. ह्याप्रमाणें वागण्याचे कडकडित नियम आबालवृद्ध भाट पाळीत असत.

**शिक्षण**—मुलांचें आठव्या वर्षी उपनयन झाल्यावर त्यास विद्याभ्यासासाठीं गुरूकडे पाठवीत. ब्राह्मण क्षत्रिय, व वैश्य अशा तिन्ही वर्णांचीं मुलें एकत्र विद्याभ्यास करीत. ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांस एक वेद तरी उत्तम आलाच पाहिजे अशी त्यावेळीं समजूत होती. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्यांपैकीं एकहि पुरुष त्यावेळीं निरक्षर नसे. हें अध्यापनकार्य ब्राह्मणच करीत. त्यावेळीं स्त्रियांनाहि शिक्षण देण्याची वहिवाट होती; हें शिक्षण उच्चदर्जाचें होतें. कारण त्यावेळच्या स्त्रियांचें शील अतिशय श्रेष्ठ असे. चंदभाटाची बायको प्रभावती ही चांगली शिकलेली असून सुशील होती, असें वर्णन चंदाच्या चरित्रांत आहे. स्त्रियास हें शिक्षण कोठें देत, हें समजण्यास साधन नाहीं. परंतु त्यांच्या करितां हल्लींच्या प्रमाणें स्वतंत्र "मुलींच्या शाळा" नसत हें मात्र खास. बहुतकरून तें त्यास घरच्याघरींच पित्यापासून, भावापासून किंवा एकाद्या वृद्ध सन्मान्य गृहस्थाकडून मिळत असे. साधारण लिहिणें, पोथ्यापुस्तकें वाचणें, व त्यावर विचार करणें, एवढेंच त्यास शिक्षण मिळत असे. प्रौढ वयांत लग्नें होत अस-

त्यामुळें हें शिक्षण त्यांस पितृगृहींच मिळे, ह्या ह्मणण्यास बळकटी येतें. अशा प्रकारें शिक्षण मिळून त्यांचें शील उत्तम बनल्यामुळें त्यांच्या पातिव्रत्याविषयीं कोणाच्याही मनावर आदराचा ठसा उमटेल. द्रौपदी, सीता सावित्री, दमयंती इत्यादि पतिव्रता स्त्रियांच्या चरित्रांशीं समतोल अशा आमच्या पूर्वींच्या पन्ना वगैरे भाट स्त्रियांचीं सुंदर चरित्रें आमच्या दृष्टीसमोर असल्यामुळें " शील " हा आमच्या स्त्रियांचा एक अवर्णनीय, सुंदर व बहुमोल असा अलंकार होऊन राहिला आहे. ही गोष्ट भाटसमाजास भूषणास्पद आहे.

**भाटांची विद्वत्ता**—वैदिक वाङ्मय रक्षण करण्याचें श्रेय जसें ब्राह्मणांस आहे, तसें इतिहास आणि पुराणें जतन करण्याचें श्रेय भाटांकडे आहे. इतिहास आणि पुराणें ह्यांत थोडा फरक आहे. इतिहास ह्मणजे प्रत्यक्ष झालेल्या गोष्टी व पुराण ह्मणजे जुन्या दंतकथा व राजवंश ह्यांचा समावेश ज्यांत आहे तें. वेदांचे पठन करणें ब्राह्मणांचें काम होतें व इतिहास आणि पुराणें पठन करण्याचें काम भाटांचें असे. भाटांचा हा धंदाच होता असें महाभारतांत सांगितलें आह. महाभारत हें पुराण लोमहर्षण नांवाच्या भाटाचा मुलगा सौति ह्यानें शौनकास सांगितलें आहे. रामायण व महाभारत ह्यांस इतिहास व पुराणही ह्मणतां येईल. " अष्टादश पुराणानां कर्ता सत्यवतीसुतः । " असें जरी वचन आहे तरी अठरा पुराणांचा ज्यांत समावेश झालेला आहे असा एकच पुराणसमूह पूर्वी असून त्याचें लोमहर्षणानें अठरा निरनिराळे भाग करून त्यास " अठरा पुराणें " असें ह्मटलें आहे. असें राव ब० वैद्य ह्मणतात. ( म. भा. उपसं. पृ. ६४६ ) लोमहर्षण, यजुर्वेदाचा कर्ता याज्ञवल्क्य व त्याचा

मामा वैशंपायन हे समकालीन होते. ह्याप्रमाणें भाटांची विद्वत्ता विशेष असल्यामुळें त्यांस राजे लोक आपल्या पदरीं पुराण सांगण्यास ठेवीत असत. पांडवाजवळ संजय, शौनकादिक ऋषी जवळ सौति इ० भाट मंडळी प्रसिद्ध आहेत. प्रत्येक भाटानें पूर्वीं स्वतः वेदाध्ययन करून व घरीं अग्निहोत्र ठेवून, होमहवन करावें, आणि यथाशक्ति दानधर्म करावा, अशी त्यांची रोजची दिनचर्या असे ह्यावरून असें ह्मणण्यास हरकत नाहीं कीं भाटांची जात नसती तर आज पुराणें व इतिहास हे उपलब्ध राहिले नसते ! एवढें ह्या भाट-समाजानें महत्कृत्य केलें आहे !

**भाटांचे ( सूतांचें ) सद्गुणः**—रूपनगर हें सोळंखी घराण्यांतील ठाकुराचें संस्थान आहे त्या घराण्यांतील एका राजकन्येच्या पराक्रमाचे मागें वर्णन आलें आहे. तें वाचकांस स्फूर्तिदायक झाल्या—शिवाय राहाणार नाहीं. वरील पद्यांत वर्णिल्याप्रमाणें पूर्वीं एका कालीं प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं मग ती व्यक्ति पुरुष असो किंवा स्त्री असो राष्ट्राभिमान मूर्तिमंत वास करित होता ! जो कोणी एखादा पुरुष कर्तव्यभ्रष्ट होईल त्यास आमचे भाट चांगले तिखट अंजन घालून ताळ्यावर आणीत अशी उदाहरणें रजपुतांच्या इतिहासांत पुष्कळच आहेत ! अशावेळीं ते कोणास राग येईल किंवा काय ह्याची परवा करित नसत, इतकी त्यांच्या ठिकाणी स्वामिभक्ति प्रखर होती. असे अनेक सद्गुण भाटांच्या आंगीं निसर्गतः असतात. ते कर्तव्यदक्ष, कारस्थानी शीलवान, स्पष्ट व सत्यवक्ते, पोषकाचे हित इच्छिणारे, मर्यादेनें वागणारे, धर्म व कर्म ह्यांनी युक्त, विश्वासू, वैदिक मार्गानें चालणारे, शूर, सौजन्यसंपन्न, सहिष्णु, जिवास जीव देणारे, देशकाल जाणणारे, कार्याकार्य ओळखणारे, न्यायान्याय सांगणारे, इंद्रियदमन करणारे, निर्लोभ

निर्भीड, निष्कपटी इत्यादि अनेक सद्गुण भाटांच्या ठिकाणीं असल्या-मुळें दरबारांतील मंत्री, अमात्य न्यायाधीश, सेनापति वगैरे मोठमोठ्या सन्मान्य अधिकारांवर हे भाटच असत. धृतराष्ट्राच्या वेळीं त्याचा मुख्य न्यायाधीश ( चीफ जस्टीस ) एक भाट होता असें महाभारतांत असून अमात्य व न्यायाधीश ह्या जागांवर एक पोक्त, अनुभवी व विद्वान, असा सूत [ भाट ] नेमावा असें भीष्माचार्यांनीं धर्मास सांगितलें आहे. ह्यावरून भाटांची विद्वता व योग्यता पूर्वीं किती असे हें वाचकांस कळून येईल.

भीष्माचार्य शरपंजरीं पडले असतां धर्मराजानें त्यांस अनेक राजकीय, सामाजिक धार्मिक वगैरे प्रश्न विचारले त्यांत एक प्रश्न "राजा-नें अमात्याच्या जागीं व वादविवाद-निर्णय करण्यास कोण मनुष्य पसंत करावा? " असा होता. त्याचें उत्तर भीष्माचार्यांनें असें दिलें आहे कीं, कोणताही विषय श्रवण करण्याची इच्छा, त्या विषयाचें श्रवण, आकलन धारण, तर्क, निषेध, शास्त्रज्ञान व ब्रह्मज्ञान ह्या आठ गुणांनीं युक्त अस-लेला असा 'सूत' ज्ञातींतील प्रौढ, निर्मत्सर, व पन्नास वर्षे वयाचा एक पौराणिक तूं 'अमात्य' कर. श्रुतिस्मृतिज्ञानसंपन्न, विनयशील, समदृष्टि, निर्लोभी, हे गूण त्याच्या ठिकाणीं असावे. असें शांतिपर्व अध्याय ८५ पृष्ट १७२ मध्यें सांगितलें आहे.

**भाटांची परंपराः**—फार प्राचीन काळापासून भाटांचें अस्तित्व पुराणादि ग्रंथावरून दिसून येतें. कृतयुगांत चंडी राजाजवळ वेलंग व वळास ह्या नांवाचे भाट होते. शेषाजवळ भीमसिंह हा भाट होता. त्रेतायुगांत बळीच्या दरबारीं पिंगल नांवाचा भाट होता. त्यास आचार्य ही बहुमानाची पदवी होती, त्यानें छंदःशास्त्रावर उत्कृष्ट ग्रंथ केला

आहे. रामचंद्राजवळ रामपाल भारोट ह्या नांवाचा भाट होता. रामकथामृत-भाग १-बालकांड पृ. ११ मध्यें दशरथाची राज्यव्यवस्था दिली आहे. " दशरथाची राजधानी अयोध्या होती.....सर्व प्रकारचे कारागीर तेथें राहूं लागले होते. त्याचप्रमाणें स्तुतिपाठक व वंशावलि वर्णन करणारे भाट ह्यांची तेथें गर्दी उडाली होती; " असें वर्णन आहे. तसेंच त्याच ग्रंथांत अयोध्या कांड पृ. १३७ मध्यें रामचंद्रास यौवराज्याचा अभिषेक चालला असतां मिरवणुकीच्या वेळीं " रामचंद्र उत्तम रथांत बसले होते, लक्ष्मण त्यावर चौरी हालवित त्याच्या जवळ उभा होता, .... वाजंत्र्याचे शद्ब, भाटांचे स्तुतिपाठ, व शूरांचे सिंहनाद त्याच्या भोवतीं चालले होते. " असें वर्णन आलें आहे. पांडवाजवळ संजय, नैमिषारण्यांत शौनकादिक ऋषीजवळ सूत उग्रश्रवा हे भाट होते. विक्रमाजवळ वेतालभाट, हा विक्रमाच्या सभेंतील नउ रत्नापैकीं होता, पृथ्वीराज चव्हाण ह्याचे पदरीं चंदभाट होता, उदेपूरचा महाराणा प्रतापसिंह याचे पदरीं पृथ्वीराज भाट होता, उमराव राण्याच्या पदरीं जयसिंग भाट होता, मेवाडचा राणा राजसिंग ह्याचे पदरीं जैतसिंग व जसवंतसिंग हे भाट होते, मारवाडच्या अजितसिंहाच्या पदरीं राजा बीरबल व गंग हे भाट होते, बीरबल हा अकबराच्या नऊरत्नदरबारांतील एक रत्न होतें. औरंगजेबाच्या पदरीं चिंतामणि वगैरे भाट होते; शहाजी राजे भोसले ह्यांच्या दरबारांत मोरू नाना चत्रू ठाकूर, वगैरे पांच भाट होते; छत्रपति श्रीशिवाजी महाराजांच्या पदरीं भूषण भाट होता; संभाजीजवळ मोहोनदास व मतिराम हे भाट होते; ह्यावरून भाटांची परंपरा किती प्राचीन आहे हें दिसून येईल.

**भाटांचा संग्रह**:– "रामचंद्रपंत अमात्य बावडेकर यांचे आज्ञापत्र किंवा मराठे–शाहींतील राजनीति" ह्या पुस्तकांत पुढील प्रमाणें उल्लेख आहे.

"कवीश्वरामुळें कीर्ति प्रसरते. त्यांनीं केलेले श्लोक सुभाषित–कवित्वामुळें शाश्वत राहतात. याकरितां कवीश्वर, गुणी, शास्त्रज्ञ, प्रामाणिक, निर्व्यसनी असें पाहून त्यांचा आपल्या सामर्थ्यानुरूप संग्रह करावा. त्यांचें यथायोग्य बहुमानपुरःसर चालवून ते संतोषरूप राहून स्वउद्योगांत तत्पर रहात तें करावें........तसेच भाट हे मजलसींत स्वारीं मध्यें पूर्वी जाहले राजे यांनीं संरक्षिले आहेत याकरितां थोडे बहुत गुणीजन पाहून त्यांचाही संग्रह करावा," ह्याप्रमाणे अमात्यांच्या आज्ञापत्रांत भाटांचा नामनिर्देश आहे. ह्यावरून त्यांचा स्वारीच्या वेळीं चांगला उपयोग होत असला पाहिजे असें सिद्ध होतें. ह्मणून पूर्वीपासून राजे लोक भाटांचा संग्रह करित आले आहेत.

**भाटांचें साहित्यः**–पूर्वीच्या विद्वान भाटांनीं महाभारतासारखे मोठे मोठे चित्तवेधक स्फूर्तिदायक व रसभरित काव्यग्रंथ लिहून ठेविले [ पुढें सौतीचें चारित्र पहा. ] भाटांचा योगक्षेम त्यांच्यावर सुप्रसन्न राहून राजेलोक उत्तम प्रकारें चालवित असल्यामुळें त्यांनीं आपला सर्व वेळ राजवंशाचीं चरित्रें लिहिण्यांत घालविला आहे. अशा प्रकारच्या कामगिरीवर खुष होऊन राजे लोकांनीं त्यांस वेळोवेळीं इनामें किंवा वर्षासनें करून दिलीं आहेत ! प्रपंच–पोषणाची काळजी नसली ह्मणजे विद्वान् लोक ग्रंथलेखनाचेच काम करितात. त्याप्रमाणें भाटांनीं हि अनेक ग्रंथ केले आहेत. भाटांच्या ह्या काव्य-ग्रंथाची हल्लीं इतिहास-संशोधनास व लेखनास फार चांगली मदत झाली आहे. चंद

भाटानें "पृथ्वी राजरासा" हें पृथ्वीराज चव्हाण ह्या दिल्लीच्या राजाचें चरित्र काव्यांत लिहून ठेविलें आहे. ह्या काव्याची विस्तृत हकीकत पुढें चंदभाटाच्या चरित्रांत येईलच. हा एकटा 'रास्त' रजपुतांच्या ग्रंथ धामधुमीचा यथास्थित इतिहास समजून देण्यास समर्थ आहे. अशी ह्याची योग्यता आहे. हल्लींचें इतिहास-संशोधक-मंडळ भाटांच्या ह्या अनेक ग्रंथांचा, संशोधन कार्यास उपयोग करून घेतील तर पुष्कळ नवीन माहिती मिळूं शकेल, ह्यांत संशय नाहीं. कर्नल टॉड साहेबांना 'राजस्थानचा इतिहास' 'आणि रासमाला' व फार्बस साहेबांनीं 'गुजराथ प्रांताचा इतिहास' लिहिला, त्यावेळों ह्या उभय साहेबांस हे भाट लोकांचे पद्य-ग्रंथ विशेष उपयोगीं पडलें भाटांनींहि त्यास पुष्कळ नवी नवी माहिती सांगितली. ह्या साहेबांनी भाटांशीं स्नेह संपादन करून, त्यास द्रव्य देऊन, त्यांचे मानमरातब कायम ठेवून व त्यांच्या मागण्या कबूल करून त्यांच्या हस्तलिखित चोपड्या मिळविल्या, व त्यावरून त्यांनीं आपले इतिहासलेखन पूर्ण केलें. त्यावेळीं ह्या उभय साहेबांस भाटांची फार मदत झाली. ह्याकामाकरितां त्यांनीं चांगला नामांकित व विद्वान् असा एकेक भाट आपल्या पदरीं ठेविला होता. फार्बस साहेब आपल्या इतिहासाच्या प्रस्तावनेंत ह्मणतो कीं, "मी राजस्तानांतले पुष्कळ भाट पाहिले, परंतु त्या सर्वांत मी पदरीं ठेविलेला भाट फार विद्वान्, हुषार व ज्ञाता आहे."

**सामान्य वर्णन**—वरील सर्व वर्णनावरून असें दिसतें कीं भाट हे फार प्राचीन काळापासून आहेत. व त्यांचे कर्तव्य पुराण सांगण्याचें व राजांच्या व ऋषींच्या वंशावळि ठेवण्याचें आहे. पुढें कालांतरानें जो भाट ज्या राजांच्या वंशावळि ठेवी, त्यांच्याच आश्रयानें

राहून त्यानें त्यांची स्तुति पद्यांत गावी आणि हरएक प्रसगीं शौर्य, धैर्य औदार्य इत्यादि सद्गुणांकडे त्या राजांची प्रवृत्ति व्हावी ह्मणून त्यांच्या पूर्वजांचे गुणानुवाद काव्यांत गाऊन त्यास प्रोत्साहन द्यावें हाच त्यांचा स्तुत्य उद्योग ठरला. ह्या त्यांच्या उद्योगामुळें राजांच्या ठिकाणीं त्या त्या गुणांचा प्रादुर्भावही होत असे. भाट हे अशा प्रकारचे कर्तबगार असल्यामुळें राजे लोक त्या काळीं भाटांस मनापासून खुष ठेवित असत. त्यांची इतराजी होईल असें कृत्य करण्यास ते फार भीत असत. राजांकडून भाटांचा अपमान झाल्यास ते भाट त्या राजाच्या अपकीर्तीचा प्रसार करण्यास भीत नसत व प्रसंगविशेषीं त्रागा करून स्वतांचा प्राणहि देण्यास तयार असत. मग त्या राजानें ह्या पूर्वी त्यास कितीहि चांगल्या रीतीनें वागविलेलें असलें तरी त्याचा त्यास विसर पडे. ह्यावरून त्यांच्या ठिकाणीं कृतज्ञता कमी होती असें ह्मणावयास हरकत नाहीं. “न गणशि मज जातों तुच्छ मानूनि तूतें ॥” अशा स्पष्ट शद्बांनीं वैभवानें धुंद झालेल्या राजाची कान उघडणी करण्यास आमचे भाट कधीं भीत नसत. पांडवांजवळ संजय नांवाचा भाट होता. स्पष्ट वक्तेपणाबद्दल त्याची फार प्रसिद्धि आहे. भारतीययुद्धांत भीष्माचार्य शरपंजरीं पडले तेव्हां धृतराष्ट्रानें त्या युद्धाचा उत्तररंग कसा होईल, असा संजयास प्रश्न विचारिला:—

जो देव ह्मणत होता अनुदिन सुहृदंबुजव्रजा विकसें ।
त्या अद्भुत भीष्मदिवाकरपतनीं वाटलें तुह्मांसि कसें ॥ २७ ॥

ह्यावर:—

संजय ह्मणे नरेशा तेव्हां ऐसेंचि वाटलें कांहीं ।
कीं भीष्में धरिली ती धरिलीच तुझ्याहि वाट लेंकांहीं ॥ २८ ॥

॥ भीष्मपर्व ॥

तेव्हां त्यानें दिलेलें उत्तर वरील अठ्ठाविसाव्या आर्येत आहे. शिवाय आणखी पुढें संजयानें त्यास असें स्पष्ट ह्मटलें आहे कीं-- " अन्याय करणाऱ्याला आपले अन्याय दिसत नाहींत. तद्वत् तुमचें पाप तुह्मांस दिसत नाहीं. तुझ्या मुलांच्या पापाचरणामुळेंच भीष्माचार्यास अशी स्थिति प्राप्त झाली आहे. इ०. "

संजयाच्या स्पष्टवक्तेपणाचें आणखी उदाहरण पहा: — भारत-संग्रामांत धृतराष्ट्राचे सर्व पुत्र मरण पावले त्यामुळें तो शोक करित असतां योग्य शब्दांनीं त्याचें समाधान करून तो शोक आवरत नाहीं असें पाहून संजय धृतराष्ट्रास ह्मणाला " धृतराष्ट्रा, तुझे पुत्र मरण पावले हें एका अर्थीं चांगलेंच झालें असें मला वाटतें. कारण ते दुरात्मे क्रोध, लोभ ईर्ष्या मत्सर इत्यादि दुष्ट मनोविकारांनीं क्षुब्ध होऊन नित्य दुराचरण करण्यांत तत्पर असत. ह्यास्तव त्यांच्या मृत्यूनें ह्या भूतलावरील कंटकच नाहींतसे केले, असें मी समजतों. राजा, अशा त्या कुलांगाराबद्दल तूं शोक करित बसावें हें अत्यंत अनुचित होय ! शिवाय राजा, हा जो घोर अनर्थ ओढवला तो केवळ तुझ्या पुत्रांच्या दुर्वर्तनामुळेंच घडला असें नाहीं; तर ह्याच्या मुळाशीं तूं सुद्धां आहेस. कारण युधिष्ठिरादिक पांडवांविषयीं तुझ्याहि मनांत द्वेष होताच, व त्यामुळेंच हा सर्व अनर्थ घडला, ह्यांत संदेह नाहीं. राजा, विष देणें, आग लावणें, इत्यादि दुष्ट कृत्यांना जर तूं अनुमोदन दिलें नसतेस, तर खचित आज तुला असा पुत्रशोक करण्याचा प्रसंग आला नसता. ह्यास्तव ज्या गोष्टी तुझ्या कडूनच झाल्या आहेत असें ह्मटलें तरी चालेल त्याविषयीं दुःख करित बसण्यांत अर्थ नाहीं. तुझे पुत्र अशा रितीनें मरणार हें आधींच ठरलें होतें; व त्याप्रमाणें तें घडून आलें. ह्यांत विशेष असें कांहींच नाहीं. ब्रह्मदेवानें जें भालपटलीं लिहिलें

असेल तें, मनुष्य कितीही ज्ञानी असला तरि त्याच्यानें टाळितां येईल अशी कल्पना करणें हा केवळ भ्रम होय. जन्म, मरण, सुख, दुःख इत्यादि सर्व गोष्टी काल–शक्तीनें घडून येतात." ह्यापेक्षां स्पष्ट वक्तेपणाचें दुसरें उदाहरण सांपडेल काय ? ह्याप्रमाणें सत्य आणि स्पष्ट बोलण्यांत आमचे भाट कधीं कोणास भीत नसत, किंवा दुसऱ्याच्या रागालोभाची परवा करित नसत. सर्व भाटवर्गाचा हा अंगस्वभाव त्यांच्या ठिकाणीं मोठा दुर्गुण मानिल्यास ह्या दुर्गुणास पार मागें टाकणारा त्यांच्या ठिकाणीं एक मोठा सद्गुणही होता. तो हा कीं मोठमोठ्या युद्धांत भाटांनीं आपल्या यजमानांजवळ राहून त्यांस क्षात्रधर्मोचित स्फुरण चढविण्याकरितां त्यांच्या पूर्वजांचीं शौर्योत्पादक कृत्यें रसभरित काव्यांत ऐकवून त्यास शौर्य गाजविण्यास व कुलाभिमान उत्पन्न करण्यास भाट हेच कारण होत असत. असत. युद्धाच्या वेळीं उभय पक्षाकडील भाटांच्या प्राणास धोका नसे. अशाप्रकारच्या अनेक प्रसंगीं ह्याची स्वामिनिष्ठा सर्व श्रेष्ठ ठरलेली आहे. राजस्थानच्या इतिहासांत पन्ना दाईचें स्वामिनिष्ठेचें सर्व श्रेष्ठ उदाहरण आहे. भाऊबंदकीच्या कलहांत कोणत्याहि कारणानीं पक्षांध न होतां भाट हे न्यायाचें व नीतीचेंच वर्तन ठेवित असत. ह्मणून त्यांचा असंतोष होईल असलें कृत्य करण्यास यजमान कधीं धजत नसत. हल्लींसुद्धां राजपुताना, काठेवाड, गुजराथ, या प्रांतांत भाटांची वस्ती फार आहे. त्यांतील कांहीं आश्रित आहेत व कांहीं संस्थानिक आहेत. जे आश्रित भाट आहेत त्यांस त्यांच्या आश्रय--दात्यांकडून इनामें, देणग्या, मानमरातब वैगरे पूर्व परंपरेप्रमाणें अद्यापिहि मिळतातच. दक्षिणेंत मात्र भाटांची दुर्दशा उडाली. यजमानांस पडता काळ आल्यामुळें त्यांच्या आश्रितांची दुर्दशा होणें स्वाभाविक आहे. विश्वासूपणा व प्रामाणिकपणा हे गुण

देखील ह्यांच्या ठिकाणीं प्रामुख्यानें वसतात. ह्मणून राजांच्या मुली व सुना ह्यांच्या बरोबर पाठराखणीस व सोबतीला देण्यास योग्य अशीं मणसें भाट हेच आहेत अशी राजेलोकांची समजूत यथार्थ होती. यामुळें भाटांस अंत:पुरांत जाण्यासही मनाई नसे. पुराणकालीं तर ह्यांच्याकडे अंत:पुररक्षणाचेंच कार्य होतें, हें पूर्वी सांगितलें आहे. हल्लीं बरोबरीचे राजे आपले वकील एकमेकांच्या दरबारीं ठेवितात, तशी चाल पूर्वींहि होतीच. हे वकिलीचें काम भाट करित असत. शिवाय कोणत्याहि दरबारांत जाण्यास भाटांस प्रतिबंध होत नसे. त्याचप्रमाणें उभय राज्यांच्या सरहद्दी ठरविण्याचें काम भाटांचें असे. शिवाय हल्लीं वर्तमानपत्रें जें वार्ताप्रसारकाचें काम करितात तें, पूर्वी भाट करित असत; न्यायाधिशाचें व पुरोहिताचे कामहि भाटांकडे असे. द्रुपदराजाकडून पांडवांच्या तर्फे कौरवांकडे शिष्टाई करण्यास पहिल्यानें जो पुरोहित गेला होता तो सूत ( भाट ) होता, हें उद्योग पर्वांत सांगितलें आहे. ह्याप्रमाणें पूर्वी भाटांची योग्यता व विद्वत्ता असाधारण होती. रजपूत राजे, भाटांस अद्याप ही गुरुस्थानीं समजतात. विजयादशमीच्या वगैरे दरबारांत त्यांच्याकडून पहिला विडा भाटांस मिळतो. स्वारी शिकारीस जाण्याच्या वेळीं राजाच्या सजविलेल्या घोड्याबरोबर सूतांचा ( भाटांचा ) ही घोडा सजवून हुजरे लोक उभे असतात! भाटांची मुख्य व आवडतीं शस्त्रें भाला व कट्यार हीं आहेत. भाट हा लहान मुलगा असो किंवा वयस्क पुरुष असो, त्याच्या हातांत भाला व कमरेस कट्यार हीं असावयाचींच. क्षत्रियांचीं जीं ९६ कुळें आहेत त्या प्रत्येकास वंशावळ, कुलगोत्र, प्रवरें व आचार्य हीं असतात. परंतु अज्ञानामुळें त्यांची आतां त्यांस माहिती राहिली नाहीं. त्यांस कोणी कुलगोत्र विचारल्यास ते " आमच्या भाटांस विचारा " असें उत्तर देतात.

दक्षिणेंत भाटांचे मुख्य वस्तीचें असें एकादें ठिकाण नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत ह्यांची वस्ती फार आहे. त्यांत कोणी इनामदार आहेत, कांहीं जहागीरदार आहेत व कोणी मांडलिक राजे आहेत. दक्षिणेंत ह्यांची वस्ती फार कमी आहे. कारण हे मूळचे उत्तर हिंदुस्थानांतील. यजमानाबरोबर कांहीं लोक दक्षिणेंत आले. पूर्वी भाटांस राजेलोकांकडून मोठमोठ्या देणग्या मिळत असल्यामुळें त्यावेळीं त्यास प्रापंचिक काळजी मुळींच नसे. शारीरश्रम तर मुळींच करावे लागत नसत. सांप्रत तशा प्रकारच्या देणग्या वगैरे मिळावयाचें नष्ट झाल्यामुळें भाटही आपल्या कर्तव्यापासून भ्रष्ट झाले. ज्या भाटांकडें इंग्रजसरकारनें, पूर्वीच्या राजांनीं दिलेलीं इनामें अंशत: कायम ठेविलीं आहेत असल्या इनाम जमिनींचा उपभोग ते भाट वंशपरंपरा घेत आले आहेत. पूर्वी राजे लोक भाटांस कांहीं उत्पन्न तोडून देत अशी वहिवाट होती. कालगतीनें यजमानांची मालमत्ता इंग्रज सरकारनें खालसा केली परंतु त्यांच्या आश्रित लोकांची मात्र सर्वत्र मालमत्ता खालसा न करितां थोडीफार कायम ठेविली. पुढें "गार्डन सेटलमेंट" होऊन त्यांत ह्या इनामांचा उपभोग घेण्याची मर्यादा कायम करण्यांत आली. या मर्यादेनंतर ही इनाम जमीन 'इनाम न राहतां तिला भर आकार पडूं लागेल. हल्लीं या नियमांप्रमाणें कोठेंकोठें इनाम जमिनी दृष्टोत्पत्तीस येतात व खालसा इनामांस भरपूर आकार पडूं लागल्याचेंहि दिसून येतें! मात्र अद्यापि पुष्कळ इनाम कायम आहेत.

शिक्षणाचे बाबतींत हा समाज उतरत उतरत मध्यम स्थितीस येऊन पोंचला आहे! व पुढें काळजी न घेतल्यास आणखी हि खालींच जाईल अशी भीति वाटते. देशांतील प्रत्येक समाज शिक्षणाभि-

वृद्धीकरितां धडपडत असतां याच समाजानें महानिद्रेंत घोरत पडावें हें कालमानाप्रमाणें योग्य नाहीं. ही गोष्ट समाज-धुरीणांच्या लक्षांत आल्यामुळें सुमारें दोन वर्षांपूर्वी त्यांनीं एक शिक्षकसंघ स्थापन करून त्यास आतां "ज्ञातिपंचायतीचें" स्वरूप दिलें. भाटसमाजांत शिक्षण-प्रसार करणें, त्या करितां द्रव्यनिधि जमविणें आणि परस्परांत ऐक्यभाव वृद्धिंगत करून समाजानें आपलें पूर्वीचें स्थान मिळविणें हे ह्या संघाचे मुख्य उद्देश आहेत. ह्या पंचाइतीकडे समाज–सुधारणा ह्या वांचून इतर कोणताहि विषय नसतो. राजकीय बाबीचा तर ह्या समाजास अद्याप स्पर्शहि झाला नाहीं ! पंचायतीचे निकाल लिहून ठेवण्याची वहिवाट नाहीं. ती सुरू करून समाजाचें रेकार्ड ठेविल्यास ह्या पंचायतीस व्यवस्थितपणा येईल.

**भाटांच्या पोट जातीः**— भाटांच्या ब्रह्मभाट, भारोट, चारण, वहिवंचे, कंकाळी भाट, मारवाडी भाट, परदेशी भाट, अशा पोट जाति आहेत. पैकीं दक्षिणेकडे बहुतकरून ब्रह्मभाट ह्यांचीच वस्ती फार आहे. इतर पोटजाती अगदीं थोड्या आहेत. ह्या पोट जातींचा परस्पर अन्न व्यवहार होत नाहीं. क्षत्रियमराठासमाज पूर्वीपासून भाटांचा आश्रयदाता असल्यामुळें त्यांचा व भाटांचा मात्र परस्पर अन्नव्यवहार होतो.

चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत भाटांची क्षत्रियांत गणना झाली आहे. हें आरंभीं दिलेल्या पुराव्यावरून व समाजरचनेवरून दिसून येईल. या संबंधानें आणखीं ज्यास्त लिहिण्याची जरूरी नाहीं. निरवधिकालाच्या दुर्विलासामुळें जाधव, भोसले, शिरके इत्यादि जे क्षत्रिय राजे इकडे आले ते अद्यापि सुद्धां भाटांस विशेष मान देतात. व भाट हे आमची कीर्ति

वाढविणारे आहेत. असें मोठ्या आदरानें ह्मणतात. भोजनप्रसंगीं पहिल्या नंबरचा मान भाटांस मिळून त्यांस बसावयास पाट देतात पहिल्यानें गंध लावावयाचें तें भाटांस लावितात, यजमानांच्या मुली सुस्थळीं देणें. किंवा मुलांस सोयरिक करणें हीं अत्यंत महत्वाचीं कामें भाटच करीत असत. त्यांनीं योजिलेलें स्थळ उभय पक्षांसही पसत पडावयाचेंच. अशा प्रकारें ह्यास मान मिळून उदरनिर्वाहाचें कामीं अत्यंत निष्काळजी असलेला हा समाज, अत्यंत मानमूढ बनल्यामुळें ह्यांनीं स्वतांकरितां किंवा आपल्या पुढील पिढी–करितां स्थायिक मालमत्ता फारशी करून ठेविली नाहीं. आतां ते पूर्वीचे स्वर्गानंदाचे दिवस गेल्यामुळें पुष्कळांस पश्चात्तप करण्याची वेळ आली आहे! पण काय उपयोग !!! तेव्हां आतां ह्या समाजांतील पुढाऱ्यांनीं भाविपिढीच्या उन्नतीकरितां तिच्या शिक्षणाची विशेष काळजी घेतली पाहिजे. ह्मणजे ही पिढी तरि स्वावलंबी बनून आनंदानें प्रपंच करूं लागेल.

जगांत जे आर्थिक झगडे सुरू आहेत त्यांच्याशीं टक्कर देऊन आपला मुक्काम गांठण्याकरितां आपण आपली भावि पिढी ह्मणजे मुलें आपल्या ताब्यांत घेतली पाहिजेत. कारण आज जीं मुलें आहेत तींच पुढें प्रौढ स्त्रीपुरुषें होतील. त्या अर्थी आपण त्यांस असें वळण लाविलें पाहिजे कीं, त्याच्या योगानें तीं आपल्या जीविताचा अत्युत्तम उपयोग करून घेऊन आपली, आपल्या समाजाची व आपल्या राष्ट्राची अत्युत्तम सेवा करण्यास समर्थ होतील जीवितार्थ संग्राम जेथें माजला आहे तेथें पुढील पिढ्या दुसऱ्याशीं झगडतांना टिकाव धरून राहिल्या पाहिजेत व अशा प्रकारचें शिक्षण घेण्यास हा समाज सर्वस्वी लायक आहे अशी मला खात्री आहे, कारण आह्मी अत्यंत स्पष्टवक्ते, शूर, बुद्धिवान, मुत्सद्दी, निस्पृह व स्वामिनिष्ठ अशा

पूर्वजांचे वंशज असल्यामुळें हे गुण आमच्यामध्यें ईश्वरानें आनुवंशिकच ठेवलेले आहेत. आमच्या शूर पूर्वजांनीं पूर्वी इतिहासांत नमूद करून ठेवण्यासारख्या आदरणीय व स्पृहणीय गोष्टी करून ठेविल्या आहेत. तेव्हां त्या शूर पूर्वजांचे वंशज ह्या दृष्टीनें आपण आपल्या सत्कृत्यांनीं पुढील काळाकरितां मागील काळापेक्षां भव्य इमारत तयार करून ठेवणें अवश्य व वाजवी आहे. हें पवित्र कार्य आपण मनापासून करूं लागलों तर आपल्या त्या पवित्र पूर्वजांचे आत्मेहि स्वर्गांतून आपली साथ करून आपणांस शुभ आशीर्वाद देतील व त्यामुळें आपणांस आपल्या निर्मळ व उद्दिष्ट कार्यांत खात्रीनें यश येईल.

इतर समाजाच्या चळवळी व त्यांनीं आजपर्यंत केलेलें कार्य ह्यांचा विचार केला असतां आपणांकडून त्यांच्या बरोबरीचें कार्य होण्यास फार प्रयास पडतील हें मनांत आलें ह्मणजे छाती दडपून जाते; तरी आपण सर्वांनीं आजपर्यंत जी विश्रांति घेतली ती लक्षांत आणून व जें शैथिल्य दाखविलें तें भरून काढून, इतर समाजांच्या पुढें जरि नाहीं, तरि निदान त्यांच्या इतका पल्ला गांठून तेथें आपण आपली गाडी नऊन सोडिली पाहिजे. असा विचार करून अत्यंत जोरानें व मनापासून समाज–सुधारणेचें मूळ जें शिक्षण त्याच्या प्रसाराकरितां सहकारितेनें प्रयत्न करणें जरूर आहे.

ॐ. शांतिः शांतिः शांतिः

# भाग दुसरा.

## उपोद्घात्—

" कवाचा व्यापार चालू नसता तर सृष्टीचा व्यवहार चालण्याचें काम मोठें बिकट झालें असतें, " असें श्रीसमर्थ ह्मणतात. स्वातंत्र्याची धामधूम कवींच्या उत्कर्षास व कवितेच्या अभिवृद्धीस विशेष उत्तजक व पोषक असते. भाट कवि हे अशा धामधुमीच्या व स्वातंत्र्याच्याच काळांत होऊन गेले. त्यामुळें ह्यांच्या काव्यांत जी एक प्रकारची मोहिनी आहे किंवा जें एक प्रकारचें प्रखरतर तेज आहे ते खरोखर वाखाणण्यासारखें आहे. आह्मांस स्वाभिमान, कर्तव्यनिष्टा, करारीपणा, दीर्घोद्योग, स्वार्थत्याग इत्यादि ज्या अनेक अमोलिक सद्-गुणांची जरूर आहे, ते आंगीं येण्यास भाटांच्या काव्यग्रंथांचें वाचन श्रवण, व मनन हें एक मोठें साधन होईल. सूत, संजय वगैरे पौरा-णिकभाट, चंद आदि करून रजपुतांच्या वेळचे भाट, गग वगैरे बाद-शाही अमलांतले भाट व मोरूनाना, चत्रुठाकूर, भूषण वगैरे मराठ-शाहींतील भाट हे अशा स्वातंत्र्याच्या धामधुमीच्या काळांतच उद-यास आले. ह्यांच्या वाणींतील अलौकिक तेज जर राष्ट्रास दिसू लागेल तर हल्लीं आमच्या लोकांत ज्या न्यूनता आहेत व ज्या घालविण्याचे पुढाऱ्यांचे अटोकाट प्रयत्न सुरू आहेत त्यांची फलसिद्धि झाल्यावांचून राहणार नाहीं! ज्या कालीं मोठाल्या लढाया, राज्यक्रांति, धर्मक्रांति वगैरे लौकिक महत्वाच्या गोष्टी घडून येऊन सर्व राष्ट्र अगदीं खवळून जातें त्याचवेळीं खरा राष्ट्रीय महाकवीचा जन्म होतो. शांततेच्या कालीं

कवि जन्मास येत नाहीं तो स्वतंत्रतेंत जन्म घेतो, स्वतंत्रतेचा उपभोग घेतो. व स्वतंत्रतेंतच लय पावतो. त्याचा अवतार हा स्वातंत्र्य स्थापण्या करितां असतो व तें स्थापून ते परमपदीं लय पावतात. अशी वस्तुस्थिति आहे. हल्लीं जें कवि आहेत. ते खरे ' कवि ' नाहींत. राष्ट्रास व धर्मास पडतां काळ आला ह्मणजे त्याचें पुनरुत्थापन कविच करितात. ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम व रामदास यांचा मुसलमानांच्या धामधुमीच्या काळांत जन्म झाला. त्यांच्या पवित्र वाणीनें महाराष्ट्रभूमि पवित्र झाल्यामुळें श्रीशिवाजी महाराजांस तींत स्वराज्याचा वृक्ष पेरितां आला !!! ह्या साधुसंतांनीं आपल्या काव्यांत जागजागीं त्या वेळच्या परवशते संबंधानें दुःखोद्गार काढिले आहेत. " धर्म रक्षावयासाठीं । करणें आटी आह्मांसीं " असें मवाळांत मवाळ असणारे श्रीतुकाराम महाराज अट्टाहास करून सांगतात ह्यांतील बीज हेंच होय.

नवीन शोध करण्याची आमच्या लोकांस फारशी गोडी नसल्यामुळें असले भाटांचे काव्यग्रंथ अद्यापि पुष्कळच ' मूक नायक ' बनले !!! नाहीं ह्मणावयास ' लोक–हितावादी ' ह्यांनीं ते मराठींत आणण्याचा थोडासा प्रयत्न केला आहे ! तसा प्रयत्न हल्लींचे इतिहास संशोधक–मंडळ करील तर प्रचलित इतिहासावर बराच प्रकाश पडून त्याचें मला वाटतें, रासायनिक रूपांतर खचित होईल ! प्रयत्न मात्र झाला पाहिजे. आमच्या भाट कवींस रजपुतांच्या धामधुमीचा, त्यांच्या रीतिरिवाजांचा, स्वभावांचा वगैरे प्रत्यक्ष अनुभव ते त्यांच्या पदरीं रहात, ह्यामुळें असल्यानें त्यांनीं त्या काळाची सर्व हकीगत काव्यांत यथास्थित लिहून ठेविली आहे अशा प्रसिद्ध भाट कवींची जेवढी माहिती मिळणें

शक्य आहे तेवढी सर्व मिळवून ती यापुढें दिली आहे. तीवरून आमच्या भाटांची स्वराज्यास कशी मदत झाली, हें वाचकांस कळून येईल. पुढें प्रसिद्ध भाटांची जी माहिती दिली आहे ती फार अपूर्ण आहे. पुष्कळांचा जन्मकाल, आईबाप, राहण्याचें ठिकाण, शिक्षण व निधनकाल वगैरे माहिती मिळाली नाहीं. ती उत्तरहिंदुस्थानांत रजपूत राजांशीं पत्रव्यवहार करून मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. अशी सविस्तर माहिती मिळे-पर्यंत तूर्त त्यांच्या अंगच्या कर्तबगारीच्या माहितीवरूनच त्यांच्या संबंधानें आदर करणें व मनाचें समाधान करून घेणें भाग आहे !

दुसरें असें कीं, हल्लीं प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याचा प्रचार बराच सुरू झाला आहे. त्या चरित्रांपासून अशा अनेक गोष्टी वाच-कांस शिकण्यासारख्या असतात कीं, ज्यांचा प्रत्येकास सर्व आयुष्यभर उपयोग होईल, अनेक महत्वाचीं कामें करण्यास उत्साह येईल, चरित्र नायकाच्या काळचे रीतिरिवाज कळून येतील, त्यांच्या आपत्प्रसंगाचें किंवा सुखदुःखांचें स्मरण पुढील पिढीस स्फूर्तिदायक होईल, प्रापंचिक अडचणींतून निभावून जाण्यास तें युक्तिदर्शक होईल एकंदरींत स्वतःची सर्व प्रकारची भरभराट होण्यास अशीं महापुरुषांचीं चरित्रें फार उप-योगीं पडतात. ह्मणून भाट समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें पुढें लिहिलेल्या प्रसिद्ध पुरुषांच्या चरित्रांचें काळजीपूर्वक मनन करून त्याप्रमाणे वर्त-नक्रम ठेविल्यास त्यांचे ऐहिक व पारलौकिक कल्याण झाल्यावांचून राहणार नाहीं.

( १ ) लोमहर्षण.

हा सूत पौराणिक कृष्णावतारांत होऊन गेला. हा इतिहास व पुराणें सांगण्यांत फार कुशल होता. हा पुराण सांगूं लागला ह्मणजे

श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे रहात ह्मणून ह्यास रोमहर्षण असें हि ह्मणत. एकदां नैमिषारण्यांत ऋषि मंडळींनीं दीर्घकाळपर्यंत यज्ञ आरंभिला असतां या यज्ञांत बळराम दादा आले तेव्हां ऋषिमंडळींनीं उत्थापन देऊन, त्यांचा योग्य सत्कार करून त्यास नमस्कार केला व त्यांची पूजा केली. त्या ठिकाणीं लोमहर्षण हाहि होता. ह्यानें बलराम-दादास उठून नमस्कारहि केला नाहीं व त्याची पूजाहि केली नाहीं. हें बलरामानें पाहिल्यावर त्यास राग आला व तो ह्मणाला अरे, हा सूत पौराणिक असून ह्यानें माझा अपमान केला तेव्हां हा वधाला योग्य आहे. मृत्यु लोकांत पातकी लोकांस शिक्षा करण्या करितांच माझा अवतार आहे. असें बोलून हातांत असलेल्या शस्त्रानें त्यानें लोमहर्षणास तेथेंच ठार केलें ! तो दिवस आषाढ शुद्ध पौर्णिमा हा होता. रोमहर्षणास मारिलेलें पाहून सर्व ऋषि खिन्न झाले व ह्मणाले, हे प्रभो तुह्मी फार अधर्म केला ! कारण आम्ही याला यज्ञ पूर्ण होई-पर्यंत ब्रह्मासन दिलें असून तुह्मी मारिलें; अर्थात् तुह्मांस ब्रह्महत्येचें पातक लागलें आहे. त्याअर्थी आता तुम्हांस प्रायश्चित्त घ्यावें लागेल. दादा म्हणाले ठीक आहे, ब्रह्महत्येचे प्रायश्चित्त सांगा, मी घेण्यास तयार आहें. ऋषिजनांनीं त्यास प्रायश्चित सांगितल्यावर दादा ह्मणाले कीं हा अतिशय विद्वान् सूत पौराणिक जगांतून नाहींसा झाला हें फार वाईट झालें. तरि पण आत्मा हा पुत्ररूपानें उत्पन्न होतो, असें ह्मणतात. ह्मणून सूत उग्रश्रवा हा त्याचा पुत्र, बापाप्रमाणेंच विद्वान् व बलवान् होऊन उत्तम पुराणवक्ता होईल, असा मी त्यास आशीर्वाद देतों. ह्याप्रमाणें आशीर्वाद देऊन ब्रह्महत्तेच्या प्रायाश्चित्ताकरितां बलरामदादा बारा वर्षें पर्यंत भरतखंडाच्या प्रदक्षिणेकरितां निघून गेले. अशी कथा भागवताच्या दशमस्कंधांत आहे.

## [ २ ] सौति उग्रश्रवा सूत.

पूर्वी कृष्णावतारांत लोमहर्षण नांवाचा एक महाविद्यांत पुराणिक होऊन गेला. तो पुराण सांगण्यांत फार कुशल होता. त्याचें पुराण श्रवण करितांना श्रोत्यांची मनोवृत्ति अगदीं तल्लीन होत असे. त्याला सौति उग्रश्रवा नामक पुत्र होता; तोहि बापाप्रमाणेंच पुराण सांगण्यांत निपुण असे. त्याचें ज्ञान मोठें अगाध होतें. व्याख्यानास अलंकृत करणाऱ्या सर्व गुणांचें तो केवळ निधानच होता. सर्व उपनिषदांचें रहस्य त्यास पूर्ण अवगत होतें.

एकदां नैमिषारण्यांत शौनक ऋषीनें द्वादशवार्षिक सत्र आरंभिलें असतां तेथें मोठमोठे उग्र तपश्चर्या करणारे ब्रम्हर्षि प्राप्त झाले. ते एके दिवशीं नित्यनैमित्तिक कर्मे आटोपून स्वस्थपणें ब्रम्हाचा विचार करित असतां सूतपुत्र उग्रश्रवा पुराणिक तेथें आला. त्या तपोनिधीस पाहून उग्रश्रव्याला फार आनंद झाला. व अत्यंत लीनतेनें हात जोडून उभा राहिला. त्यास पाहून सर्व ऋषि त्याच्या भोंवतीं जमा झाले. व त्याचें योग्य आगत स्वागत करून त्यास बसण्यास आसन दिलें पुढें एका ऋषीनें त्यास प्रश्न केला कीं, हे सूतपुत्रा ! आज तुझें येणें कोठून झालें ? त्यावर सौति म्हणाला, मुनिश्रेष्ठ हो ! मी परिक्षित राजाचा पुत्र जनमेजय ह्याच्या सर्प-सत्रास गेलों होतों. तेथें त्या राजेंद्रास वैशंपायनांनीं महाभारतांतील अनेक हृदयंगम व पुण्यकारक कथा निवेदन केल्या, त्या मी श्रवण केल्या. त्या नंतर अनेक तीर्थे व क्षेत्रें पर्यटन करून ह्या स्यमंत पंचक नामक परम पावन प्रदेशास आलों. तेथेंच पूर्वी कौरवपांडवांचें घोर युद्ध झालें. तेथून मी आपलें दर्शन घेण्याकरितां येथें आलों

आहे. तेव्हां महाराज ! आतां परमपावन पुराणकथा, दानमोक्षादिकांचे नियम, थोर थोर विभूतींच्या सुरस कथा, अर्थ प्राप्तीचे मार्ग अथवा महान् महान् राजर्षींचीं चरित्रें ह्यापैकीं काय निरूपण करूं तें कृपाकरून सांगा. तेव्हां ऋषि म्हणाले भारत नांवाचें जें पुराण व्यासांनी रचिलें, देवांनीं व ब्रह्मर्षींनीं तें ऐकून ज्याची वाहवा केली, जें चतुर्विधश्रुतींच्या अर्थाचें भांडार, अशाऱ्या भारतसंहितेचें श्रवण करावें अशी आमची नांषा आहे. ह्याप्रमाणें आज्ञा झाल्यावर त्या ऋषी मंडळीपुढें सौतीनें महाभारत सांगितलें.

श्रीमान् वेदव्यासानें ' जय ' नांवाचा ग्रंथ लिहिला. तो वैशंपायनानें वाढवून त्यास ' भारत ' असें नांव दिलें व हा भारत ग्रंथ सौतीनें आणखी वाढवून त्यास व्यवस्थित स्वरूप देऊन त्याचें ' महाभारत ' असें नांव ठेविलें. हा सौति सामान्य पौराणिक नव्हता. वैशंपायनाच्या भारतांत चोवीस हजार श्लोक होते, ते ह्यानें वाढवून एक लक्ष केले ! ! ! हा ग्रंथ त्यानें सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं लिहिला. त्या वेळीं हिंदुस्थानांत जैन व बौद्ध असे नवीन धर्म उत्पन्न होऊन अशोकादि सम्राटांनीं त्यांस पाठबळ दिल्यामुळें ते जोरानें वाढूं लागले होते; वेदावरची पूज्य बुद्धि कमी होऊन ब्राह्मणांवरची श्रद्धा कमी होत चालली होती; लोकांस ज्या विभूति पूज्य वाटत होत्या त्या आमच्या आहेत असें भासविण्याचा बुद्धजैनांचा उपक्रम चालला होता; सामान्यजन पाखंड्यांकडे झुकूं लागले होते; चातुर्वर्ण्य संस्था व आश्रम व्यवस्था मोडूं लागून सर्वत्र घोटाळा माजला होता त्यावेळीं सनातन धर्माची स्थिति हे पाखंड्यांचे हल्ले सहन करण्यास किंवा त्यांचा प्रतिकार करण्यास समर्थ नव्हती !

अशी परिस्थिति असतांना भारताला महाभारताचें प्रचंड स्वरुप देऊन, सनातन धर्मातील निरनिराळ्या मताचा परस्पर विरोध मोडून त्यांचा मेळ घालून, योग्य कथा योग्य ठिकाणीं लिहून, सनातन धर्माचें उदात्त स्वरूप लोकांच्या मनावर आपल्या प्रासादिक वाणीनें ठसवून त्यांच्यांत शक्ति आणण्याची विलक्षण कामगिरी सौतीनें केली !!! तसेंच सनातन धर्मातील प्रसिद्ध पुरुष हे " आमचे आहेत. " असें प्रतिपादन करण्याचा बौद्धजैनांचा प्रयत्न चालला असतां त्यांच्या कथा भारतांत घालून त्यांच्या संबंधानें सनातन धर्माचा आदर वाढविला. ही महत्त्वाची कामगिरी सौतीनें केली !!! सनातन धर्मातील लोकांस नीति व ज्ञान ह्यांचा दिव्य उपदेश केला !!! एकंदरींत श्रीशंकराचार्या-प्रमाणें सनातन धर्माची पुनःस्थापना करण्याची अत्यंत महत्त्वाची कामगिरी करून ह्यानें सर्व हिंदुलोकांस आपले ऋणी करून ठेविलें आहे !!!

सत्यनारायणाच्या पोथींत, किंवा इतर पुराणग्रंथांत "सूतउवाच" ह्मणून लिहिलें असतें तो सूत हाच होय. ह्याचें दुसरें नांव उग्रश्रवा असें आहे. हा लोमहर्षणाचा पुत्र हा सुमारें दोनहजार वर्षांपूर्वी बौद्ध व जैन ह्यांच्या ऐन तारुण्याच्या भरांत होऊन गेला. ह्याच्या संबंधानें आह्मांस ' तो आमचा आहे ह्मणून ' आदर वाटणें साहजिक आहे

एकंदरींत आह्मीं प्रथम म्हटलें आहे कीं:—"आमच्या पूर्वजांनीं इतिहासांत नमुद करून ठेवण्या सारखी कामगिरी केली आहे, त्यांनीं देशाकरितां व धर्माकरितां स्वतःचा आत्मयज्ञ करून भारतवर्षास ऋणी करून ठेविलें. त्यांनीं पौराणिक काळीं वाङ्मय सेवा व ऐतिहासिक काळीं देशसेवा केली. अशा भाटांची नांवें इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं

मुद्रित करून ठेवण्यासारखीं आहेत. इतकी महत्त्वाची कामगिरी भारत वर्षांत इतर कोणत्याही जातीनें केली नाहीं " ह्या ह्मणण्याची सत्यता वाचकांस कळून येईल. आणि ह्मणूनच "हम् ब्रह्मभाटके बच्चे। हम् धर्मशिराई सच्चे ॥ असें एका भाटकवीनें म्हटलेलें सर्वस्वी खरें आहे.

## [ ३ ] महाकवि चंद भाट

( चरित्र चंद्रिका ह्या गुजराथी पुस्तकावरून )

हा महाकवि अजमीर येथील राहणारा, प्रसिद्ध रणशूर योद्धा विशालदेव ह्याच्या वंशांत ह्याचा जन्म झाला. हा जातीचा ब्रह्मभाट होता. पृथ्वीराज व गुजराथचा भीमदेव ह्यांच्या मधील युद्धाचे वेळीं भीमदेवानें 'भाट' ह्या एकेरी नांवानें ह्यास संबोधिलें आहे. अजमीर येथील चव्हाण राजांचा हाच भाट होता. ह्याची, वीररसाचें वर्णन करण्याची शैली अप्रतिम होती. त्याचप्रमाणें हा मोठा धैर्यवान, उत्साही, चतुर, दीर्घदृष्टी, देवीभक्त, उत्तमवक्ता व नीतिशास्त्रज्ञ होता. इ. स. ११६७ मध्यें हा पृथ्वीराजाच्या आश्रयास आला. आपल्या अंगच्या अत्यंत हुषारीमुळें त्याला मंत्री, कवीश्वर व पौराणिक अशा पदव्या मिळाल्यानंतर तो पृथ्वीराजाचा परम मित्र बनला. ह्याची कविता वीर रसानें परिपूर्ण आहे. हा पृथ्वीराजानें केलेल्या प्रत्येक युद्धांत सामील होऊन, शूर रजपूत वीरांना 'महाभारत' ऐकवून व त्यांतील वीरांच्या वीररसोत्पादक गोष्टी सांगून उत्तेजन देत असे. ह्याचें पुराण श्रवण केलें ह्मणजे नामर्दांना हिंमत येत होती, भित्रे शूर बनत होते व शूर वीर समरांगण गांठित होते! त्याला 'प्रभावती' ह्या नांवाची एक सुरूप, सद्गुणी व सुशील अशी भार्या होती. ती थोर कुळांत जन्मली असून

तिचा बाप फार सज्जन होता. चंदानें आपल्या इच्छेनें तिच्याशीं लग्न लाविलें होतें. ती अत्यंत प्रेमळ व नाजुक शरिराची होती, तथापि जातीनें शूर होती. चंदकवीला तिच्यामुळें फार आनंद होत असे

पृथ्वीराजानें जेव्हां भिमदेवावर स्वारी केली, तेव्हां पहिला हल्ला चंदानें चढविला होता ह्यावरून हें सिद्ध होतें कीं तो जसा कवि होता तसा शूर वीर हि होता. दुर्गादेवी त्याला प्रसन्न असल्यामुळें तो कोणत्याहि वेळीं कोणासहि भ्याला नाहीं. पृथ्वीराजानें ज्यावेळीं भीमदेवावर स्वारी केली त्यावेळीं चंदभाटानें आपल्या बरोबर जाळें, शिडी, कुदळी, दिवा, अंकुश व त्रिशूल अशा सहा वस्तु बरोबर घेऊन तो गुजराथच्या राजधानींत शिरला व राजवाड्यांत भीमदेवासमोर जाऊन उभा राहिला. हा चमत्कार पाहण्यासाठीं तेथे त्यावेळीं पुष्कळ लोक जमले होते. तेव्हां चंदभाटानें भीमदेवास स्पष्ट व निर्भयपणानें सांगितले कीं, " सांभर राजे येऊन दाखल झाले आहेत. तुह्मास तुमचा जीव वांचविणें असेल तर त्यांना शरण जा " भीमदेवानें विचारिलें, तूं ह्या वस्तू कशासाठीं आणिल्या आहेत ? त्यावर चंद-कवीनें निर्भयतेनें उत्तर दिलें कीं, " तुह्मी पाण्यांत पळून गेला तर ह्या जाळ्यानें तुह्मांस पकडीन, आकाशांत पळून गेलां तर ह्या शिडीनें धरून आणीन, पाताळांत जाल तर ह्या कुदळीनें खणून काढीन, अंधारांत लपाल तर ह्या दिव्यानें पाहून काढीन, अंकुशानें पकडीन, त्रिशुलानें ठार करीन, जिकडे जिकडे सूर्योदय होतो तिकडे तिकडे पृथ्वीराजा तुमचा पाठलाग करील हें पक्कें समजा. " हें कठोर भाषण ऐकून भीमदेव रागानें ह्मणाला " अरे भाटा ! तूं बडबड करूं नकोस, मी भीमदेव भिवविणारांचा कीस पाडित असतो; युद्धांत सर्व

२०७८

लोकांस माझें भय वाटतें; ह्मणून तूं उर्मटपणानें न बोलतां मी काय सांगतो याचा विचार कर." चंद ह्मणाला, "उंदीर कदाचित् मांजरावर जय मिळवील, गिधाडें पवित्र हंसाच्या मस्तकावर नाचतील, हरिण कदाचित् सिंहाची बरोबरी करूं शकेल, बेडूकही सर्पास जिंकूं शकेल, ह्या सर्व गोष्टी दैवाच्या इच्छेनें कदाचित् होउं शकतील, पण नेहमींच मात्र होणार नाहींत हें तूं पक्कें समज. पर्वतावर वृद्धिंगत झालेल्या वणव्याची दिव्याशीं कशी तुलना होऊं शकेल?" भीमदेव ह्मणाला, "भाटाचा मुलगा शद्बानें लढतो, उद्दाम मनुष्य शिवी गाळीनें लढतो, पण सोमेश्वराबरोबर होणारा हा कलह मृत्यूशीं सामना करण्यासारखा आहे हें लक्षांत ठेव. जा, आणि तुझ्या सांभर राजाला सांग कीं, जो भित्रा असेल तो तुला भिईल" हें भाषण ऐकून चंद स्तब्ध राहिला, त्याचे डोळे क्रोधानें लालभडक झाले; तो तेथून निघाल्यावर पृथ्वीराजाकडे येऊन ह्मणतो, "भोळा भीमदेव ह्मणाला, पृथ्वीराजाचें हें कृत्य निजलेल्या सर्पाला बेडकानं जागें करण्यासारखें आहे; तुझ्यावर कुशल प्रधान कैमाष किंवा वीरश्रेष्ट चामुंडराय किंवा कर्ण ह्यास पाठवावयास पाहिजे. अरे, सांभराचा राजा स्वतां कां आला नाहीं? तुला कां पाठविलें? मी पुष्कळ जय मिळविले आहेत. पृथ्वीराजाने जिंकलेल्या क्षुद्र राजासारखें तूं मला समजूं नकोस, सांभर राजासारख्या हजारों राजांची कत्तल करण्यास मी समर्थ आहे. ह्याप्रमाणें कठोर शब्दांनीं आपली भीमदेवानें अमर्यादा केली आहे." चंदाचें हें भाषण ऐकून पृथ्वीराजाचा क्रोधाग्नि अत्यंत प्रदीप्त झाला. व त्या आवेशांत त्याने भीमदेवावर हल्ला करून त्याचा पराभव केला. त्या लढाईत भीमदेव पृथ्वीराजाचें हातीं सांपडला. तेव्हां त्यास चंदभाट ह्मणाला, "आयुष्य

स्वप्नवत् आहे, राज्यवैभव अशाश्वत आहे, व दिसणाऱ्या सर्व वस्तूंचा नाश हा व्हावयाचाच. ''

चंदभाटानें " पृथ्वीराज रासा " ह्या नांवाचा एक फार मोठा ग्रंथ केला आहे; त्यांत त्यानें पृथ्वीराजाचें चरित्र पद्यांत गाइलें आहे. हा ग्रंथ चारणी भाषेंत आहे. हा महाभारताएवढा मोठा आहे. ह्याचीं एकोणसत्तर पर्वें आहेत. त्यांत एक लक्ष श्लोक आहेत. त्यांत पुढील विषयाचें वर्णन निस्पृहपणानें व यथातथ्य केलें आहे. " पृथ्वीराजाच्या वेळीं निरनिराळ्या राजघराण्यांतील आपसांतील वैमनस्यें, पैशाच्या लोभानें मुसलमानांस बातमी पोंचविणाऱ्या राष्ट्रद्रोही लोकांचा सुळसुळाट रजपूत सैन्याची अव्यवस्थित रचना, रजपुतांचा कडवा व निश्चयी स्वभाव, त्यांचा स्त्रियासंबंधीं आदर, शत्रूकडील बातमी काढण्यांत राजानें केलेली हयगय, आपसांतील वैमनस्याबद्दल सूड उगवण्याकरितां जयचंद वगैरे कांहीं राजांचे मुसलमानांस असणारें पाठबळ, पृथ्वीराजाची स्त्री लंपटता, कनोजच्या फौजेंत मुसलमानांचा भरणा, पृथ्वीराजाच्या दिनचर्येची नक्की बातमी जयचंदाकडून महंमद घोरीस समजणें, जातिद्वेषामुळें एकट्या रजपुतांवरच पडलेल्या युद्धाचा सर्व भार, इतर लोकांच्या ठिकाणीं स्वदेशरक्षणाची असलेली अनास्था, शेतकरी व कामकरी ह्यांच्या मदतीचा पूर्ण अभाव, वैश्य व शूद्र ह्यांची क्षत्रियांपासून अलिप्त रहाण्याची प्रवृत्ति, " देशाचें कांहीं का होईना आपला बचाव झाला कि पुरें, " अशा प्रकारच्या ब्राह्मणांच्या समजुती, परशत्रूच्या आगमनानें शूद्रांस झालेला आनंद इ० " विषयांचे सुरस, मार्मिक, विस्तृत व हृदयभेदक वर्णन फार उत्तम तऱ्हेनें व पद्धतशीर असें ह्या रासा ग्रंथांत केलें आहे. ह्या एकाच ग्रंथावरून रजपूत लोकांचा त्या काळचा बराच इतिहास कळून येईल.

आमच्या न देशाच्या दुर्दैवामुळें ह्याचें अद्याप अन्य भाषेत भाषांतर झालें नाहीं! आमच्या घरांत अद्यापिहां पुष्कळ बहुमोल व नामांकित रत्नें लोपलेलीं आह्मांस दिसून तीं कोंदणांत बसविलीं जात नाहींत व एकाद्या ‘ तरवार बहादुरांस ’ असल्या ग्रंथास आश्रय देऊन त्याचा जीर्णोद्धार करण्याची बुद्धि होत नाहीं, ह्याचें वाईट वाटतें! ह्याचें उलट इंग्लिश भाषेतील नाटकें, कादंबऱ्या वगैरे किरकोळ व निरुपयोगी पुस्तकांचीं भाषांतरें होऊन तीं भराभर छापिलीं जातात व त्यांस आश्रयही भरपूर मिळतां ह्याचें सखेदाश्चर्य वाटतें!!! अलिकडे तर नाटक कंपन्या-सुद्धां “ राजे, महाराजे, ह्यांच्या खास आश्रयाखालीं ” निघाल्या आहेत. जोंपर्यंत आमच्या धनिक लोकांची ही दूषित अभिरुचि शुद्ध होत नाहीं तोंपर्यंत असले ग्रंथ प्रसिद्ध होण्याची आशा करणें व्यर्थ होय! या पुढें कोणी उदार महात्मा हा सारा ग्रंथ भाषांतर करून प्रसिद्ध करील तर आमच्या ग्रंथ–भांडारांत एका अमोलिक ग्रंथाची भर पडेल ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. हा ग्रंथ पूर्ण करून पृथ्वीराजाकडे नेत असतां वाटेंत चंद भाटांस बातमी समजली कीं, महमद घोरीनें पृथ्वीराजास पकडून नेलें! तेव्हां तो तसाच थेट गिजनीस गेला व तेथें पृथ्वीराजाकडून महमद घोरीचा खून करविला ती हकिगत अशी:—

पृथ्वीराजास घोरीनें तुरुंगांत ठेविल्यावर थोड्याच दिवसांत त्याचे दोन्हीं डोळे काढिलें, व पायांत एका मणाच्या बिड्या घातल्या! हें पाहून चंदास फार वाईट वाटलें. “ पृथ्वीराजा हा केवळ शद्बवेधानें बाण मारणारा आहे, त्याचें तें कौशल्य

पहावें " अशी चंदानें महमद घोरीजवळ विनंति करून हें कौतुक पाहण्याचा एक दिवस ठरविला. त्या दिवशीं दरबारांतील सर्व सरदार मंडळी एकत्र झाली होती. दरबारांत घोरीचें सिंहासन उंच ठिकाणीं असून इतर मानकरी मंडळी त्याच्या उजव्या व डाव्या बाजूस बसली होती व त्याच्या खालच्या बाजूस तवे टांगण्याची व्यवस्था केली होती. घोरी त्या तव्यांच्या सुमारानेंच वर बसला होता. ह्याप्रमाणें सर्व सिद्धता झाल्यावर घोरीनें पृथ्वीराज व चंदभाट ह्या दोघांस दरबारांत आणिलें. तव्यांचा आवाज केल्यावर अमुक नंबरच्या तव्यास नेम मारावयाचा असा हुकूम झाला. पृथ्वीराजानेंहि धनुष्य सज्ज केलें. तेव्हां त्या आवेशांत घोरी शाबास ! शाबास ! असें उद्गारला. ह्या शद्बावर लक्ष ठेवून घोरीचें तें सिंहासन किती उंचीवर आहे हें आपल्या भाषेत एका कवितेंत चंदानें पृथ्वी राजास सांगितलें. ती कविता अशी:—

॥ दोहा ॥ चार अंस चोविस गज अंगुल अष्ट प्रमाण ।
एतेपर सुलतान है मत चूके चव्हाण ॥
इहीं बाण चव्हाण राम रावण उत्थप्यो ।
इहीं बाण चव्हाण कर्णशिर अर्जुन कप्यै ॥
इहीं बाण चव्हाण शंकर त्रिपुरासुर संध्यो ।
इहीं बाण चव्हाण भ्रमर लछमन कर वेध्यो ॥
सो हि बाण आज कर चढ्यो चंदब्रीद सचोचवे ।
चव्हाण राज संभर धनी मत चूके मोटे तवे ॥१॥

( चंद )

ह्याप्रमाणें चंदानें पृथ्वीराजास सुचविल्यावर त्यानें तावडतोब अचुक बाण सोडिला तो घोरीस मर्मी लागल्यामुळें तो मूर्छित होऊन पडला व तत्काल प्राणास मुकला ! त्या गर्दींत पृथ्वीराज व चंद ह्यांनींहि तरवारीनें एकमेकांचा तेथेंच शिरच्छेद केला, अशी हकीगत आहे.

चंदभाटास देवी प्रसन्न होती. तिच्या प्रसादानें त्यास पुढील गोष्टी समजत असें ह्मणतात. ह्याची सर्व कविता चारणी भाषेंत आहे. मोगल लोकांसंबंधीं चंदाचें मत असें आहे.

मुगल भले खुरासान भूरे भारे गात ।
जिन देखी नर थरथरे दो दो ढुंभी खात ॥ १

अर्थ—खुरासानचे भले उंच धिप्पाड मोंगल लोकांस पाहून इतर माणसें भीतीनें थरथर कांपतात.

क्षत्रियांसंबंधीं त्यानें पुढील उद्गार काढिले आहेत:—

राजा ! घर जात जुं मरे, करे सुरग को भोग ।
दुनियामें जस विस्तरे, हसे न दुरजन लोग ॥
जा धरती कूं खायके मरे न जाते कोय ।
अंत:काल नरक ही परे जुगमें अपजस होय ॥ १

अर्थ—रणांगणीं क्षत्रियांनीं प्राण दिले असतां स्वर्गसुखप्राप्ती होते, जगांत कीर्ति होते, व दुष्ट लोकांस हंसावयास सांपडत नाहीं. या मृत्यु लोकांत मरण कोणास चुकलें आहे ? अशा प्रकारें जगून अपकीर्ति व शेवटीं नरकवास मात्र प्राप्त होतो !

पृथ्वीराजानें संयोगिता पणांत जिंकिल्यावर तो तिच्याशीं विलास करण्यांत सदैव निमग्न असतां, त्याचें राज्य-कारभाराकडे साहजिक बरेंच दुर्लक्ष होऊं लागले ही बातमी महमद घोरीस समजल्यावर त्यानें ह्याजवर स्वारी करण्याची तयारी केली. हें चंदास समजलें तेव्हां त्यानें पृथ्वीराजाकडे एक पत्र पाठविलें, त्यांत त्यानें ह्मटलें कीं:—

तुं पर गोरी रत्तिय । अरु ता घर घोरी तक्किय ॥

अर्थः—तूं तर गोरी ( स्त्री ) बरोबर रतिविलासांत निमग्न आहेस आणि तुझ्या घरांत ( गोरी ) महमद शिरण्याची तयारी करित आहे.

ह्याप्रमाण चंदभाटाच्या काव्याचा मासला वाचकांना दाखविला. त्याचें काव्य चारणी भाषेंत असल्यामुळें आपणांस जरि तें दुर्लभ व क्लिष्ट वाटतें, तरिपण त्यांतील भारदस्त कल्पना पाहून मनास आश्चर्य वाटून आनंद होतो, हें मात्र खास ! निरनिराळ्या रसांची अनेक पक्वान्नें खाण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं मूळ सारा ग्रंथ समजून घ्यावा, ह्मणजे त्यांची आकंठ तृप्ति होईल ! एखाद्या सार्वभौम राजाच्या जवाहीरखान्यांतून उत्तम उत्तम रत्नें निवडावयास सांगितलें असतां सर्व भांडारांतील रत्नें उत्तमच असल्यामुळें निवड करणारास जशी त्याची निवड करितां येणार नाहीं तद्वत् अवस्था आमची रासा ग्रंथा संबंधानें होते. ह्मणून ज्या कोणास असल्या बहुमोल रत्नांचा अनुभव घ्यावयाचा असेल त्यांनीं मूळ ग्रंथच वाचिलेला चांगला ! ह्या कवीनें आपली

वाणी, आपली बुद्धि, आपलें चातुर्य, फार काय आपला प्राण ही पृथ्वीराजाच्या सेवेंत अर्पण केला आहे. तेव्हां अशा प्रकारचे गुणवान्, बुद्धिवान्, कर्तृत्ववान्, व शीलवान् लोक ज्या प्रभूंच्या पदरीं असतात तेच प्रभु खरोखर धन्य व भाग्यवान् होत ! ! !

ह्या कवीनें ' पृथ्वीराज—रासा ' ह्या नांवाचा एक ग्रंथ केला असें मागें सांगितलें आहे. ह्याची श्लोकसंख्या एक लक्ष आहे. ह्या ग्रंथावरून रजपुतांचा इतिहास यथास्थित कळून येईल. ह्मणून अलिकडे त्या ग्रंथाकडे पुष्कळ विद्वान् संशोधकांचें थोडेंसें लक्ष जाऊं लागलें ही आनंदाची गोष्ट आहे ! हा ग्रंथ सन १८८१ सालीं सर व्हिन्सेंट स्मिथ ह्यांनीं छापून प्रसिद्ध केला. त्यानंतर, सन १८८७ सालीं बंगालच्या रायल एशियाटिक सोसायटीच्या जर्नलच्या पांचव्या भागांत ह्या ग्रंथावर कविराज शामलदास ( ह्यांचें चरित्र पुढें दिलेलें आहे. ) ह्यांनीं एक विद्वत्ताप्रचुर असा निबंध लिहिला, नंतर बनारस येथें सन १९११ सालीं नागरी प्रचारिणी ग्रंथ--मालेकडून त्या ग्रंथाची एक नवीन आवृत्ति निघाली तीच हल्लीं उपलब्ध आहे.

ह्या ग्रंथाचें महत्त्वाच्या बऱ्याच बाबतींत महाभारताशीं पुष्कळ साम्य आहे. हें मूळ काव्य चंदभाटानें रचून पुढें त्यांत त्याच्या मुलानें भर घातली व त्यानंतर सोळाव्या किंवा सतराव्या शतकांत कोणी अज्ञात कवीनें त्याची आणखी वाढ केली. महा-भारताचाहि प्रकार असाच आहे. मूळ भारत व्यासानें लिहिलें, त्यांत वैशंपायनानें आणखी भर घातली व त्यानंतर त्याची सौतीनें आणखी वाढ केली. असें रावबहादूर वैद्यांचें मत आहे. भारत हें

प्रथम वैशंपायनानें जनमेजयास सांगितलें. तसें रासाकाव्य चंदानें आपल्या पत्नीस सांगितलें, भारत क्षत्रियांस प्रिय आणि रासा रजपुतांस अत्यंत प्रिय; भारतांत कौरव पांडवांचा रणसंग्राम वर्णिला आहे तर रासेंत पृथ्वीराजाच्या प्रभुत्वाखालीं मुसलमानांबरोबर झालेला एक भयंकर रणसंग्रामच वर्णिला आहे. भारताची श्लोकसंख्या एक लक्ष आहे; रासेची ही श्लोकसंख्या एक लक्ष आहे. भारताप्रमाणें ह्यांत ही अनेक कथा व उपकथा ह्यांचा संग्रह केला आहे; तसेंच हृदयंगम वर्णनेंहि भारताप्रमाणें ह्यांतहि पुष्कळ आहेत; सृष्टिरचना, सृष्टि-सौंदर्य, ऋतुवर्णनें, राजसत्ता, रीतिरिवाज, विद्या, कला कुशलता, इत्यादि अनेक गोष्टींचें मार्मिक वर्णन भारताप्रमाणें रासेंतहि केलेलें आहे. ह्या सर्व गोष्टींवरून रासा काव्याला " महाकाव्य " ह्मणवून घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे, असें अनेक विद्वानांचें मत आहे ! व ह्मणूनच मी हि सदर ग्रंथाच्या कर्त्यास अर्वाचीन " सूत--सौति " असें ह्मणतों !

ह्याच कवीनें ' वंशभास्कर ' नांवाचा दुसरा एक ग्रंथ लिहिला. त्यांत त्यानें पृथ्वीराजापर्यंत त्याच्या पूर्वजांचीं चरित्रें वर्णिलीं आहेत. ह्याच्याच वंशांत पुढें ' शारंगधर ' नांवाचा कवि होऊन गेला त्यानें ' हम्मीर रासा ' व ' हम्मीर काव्य ' हे दोन ग्रंथ हिंदी भाषेंत लिहिले आहेत.

मराठींत ज्याप्रमाणें—

सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।
ओवी ज्ञानेशाची, किंवा आर्या मयूरपंताची ॥ १ ॥

हा श्लोक प्रसिद्ध आहे; त्याप्रमाणें हिंदी भाषेंत ' छप्पा ' चंद कवीचा व ' चौपाई ' तुळसीदासाची अशी प्रसिद्धि आहे. कर्नल टॉड साहेबांनीं मेवाडचा इतिहास लिहिला त्यांत त्यानें चंदभाटाची व त्याच्या काव्याची फार शिफारस केली आहे.

---

## ( ४ ) महाकवि गंगभाट

( चरित्र-चंद्रिका ह्या गुजराथी ग्रंथावरून )

हा प्रख्यात महाकवि एकनोर जिल्ह्यांत इटावा येथें रहात असे. हा जातीचा भाट होता. हा अकबरापाशीं सन १५६१ मध्यें आला. ह्याच्या कवित्व गुणावर खुष होऊन अकबरानें त्यास आपल्या पदरीं ठेविलें. त्यावेळीं अकबराच्या दरबारांत हिंदु राजांचे जुने रीतीरिवाज चालू असत. हा इतका स्पष्टवक्ता होता कीं पाहिजे त्या व्यक्तीविषयीं आपल्या काव्यांत हा स्पष्ट मत प्रति--पादन करित असे. त्यांची इतराजी होईल अशी भीति त्याच्या मनाला शिवत नसे. हा मोठा धैर्यवान्, धार्मिक व विद्वान् होता. सरस्वती ह्यास प्रसन्न होती. ह्याची विद्वत्ता व काव्य--चातुर्य पाहून दरबारांतील सर्व सभासद चकित होत असत. हाच अकबराचा प्रसिद्ध राजकवि होता. बादशहा ह्याजवर नेहेमीं प्रसन्न असे. ह्यानें ' उडणारा भुंगा ' ह्या विषयावर एक ' छप्पा ' रचिला त्यांत ह्याचें इतकें चातुर्य व इतके कल्पनातरंग दिसून आले कीं, बादशहानें खुष होऊन त्यास एक लक्ष होन बक्षीस

दिले. अशाच रीतीनें जहांगीर, खांन खानान, मानसिंह इत्यादि बादशाही दरबारांतील सन्मान्य सभासद त्याला पुष्कळ वेळां मोठमोठीं इनामें देऊन त्याचा सत्कार करीत.

एके वेळीं रात्रीं बादशहा अंत:पुरांत बसला असतां राणी बादशहाच्या समोर आली. त्यावेळीं तिच्या केसांची एक लट तिच्या स्तनावर पडली होती. तिला पाहून " शंभुके पूजन नागन आयी " असें बादशहा बोलला. दुसऱ्या दिवशीं दरबारांत आल्यावर त्यानें बीरबलास ह्या वाक्याचा खुलासा विचारला. जवळच गंगभाट होता, त्यास बीरबलानें उत्तर देण्यास सांगितलें. त्यावर गंगकवीनें एक ' कवीत ' रचून त्यास उत्तर दिलें तें असें:—

## कवीत

श्रीपतके मनरंजन कारण, राधिकने शिनगार बनायो ।
हेमर भूखन अंबर कानन, कंठबिंष मुक्ताफल छायो ॥
शीस छुटी लट आनपरी, अरु वाही लयी कुचसो लपटाई ।
गंगे कहे सुन शाह अकबर, शंभुके पूजन नागन आयी ॥१

हें ऐकून बादशहा फार खूष झाला.

एवढी माहिती चरित्र–चंद्रिका ह्या गुजराथी पुस्तकांत दिलेली आहे. अनंतफंदी कवीच्या चरित्राच्या प्रस्तावनेंत आणि इकडच्या प्रांतांतील बहुतेक लोकांच्या तोंडीं पुढीलप्रमाणें माहिती आहे.:—

गंगभाटानें आपल्या काव्य--गुणामुळें बादशाही दरबारांत श्रेष्ठ स्थान व मान मिळविला ! ह्यानें अकबराच्या बापाची व आजाची ह्मणजे हुमायून व बाबर ह्यांची कारकीर्द पाहिली होती. त्यांनीं केलेल्या लढाया व त्यांचीं कारस्थानें, ह्यांची ह्या कवीस पूर्ण माहिती होती. त्याचें काव्य हिंदी वाङमयांत अद्यापि उच्च स्थानीं आहे. सरस कविता व निस्पृह स्वभाव ह्यामुळें दरबारांत त्यास विशेष मान मिळू लागला व त्याची कीर्ति देशभर पसरत चालली. अकबरानें कांहीं विशेष चिरस्मरणीय कृत्य केलें नाहीं किंवा एकादि मोठी लढाई जिंकिली नाहीं, सर्वत्र स्मशान-शांतता असतां आपल्या पूर्व--वयांत ह्या वृद्ध कवीस अकबरानें " आम्हांवर कांहीं कविता करून ह्मणा. " असें सांगितलें तेव्हां कवीनें त्यास स्पष्ट उत्तर दिलें कीं, " तुमच्या कारकीर्दींत अद्यापि कविता करण्यासारखी गोष्ट घडली नाहीं, आमचें काम काय ? कविता करण्या हेंच! " हें ऐकून बादशहानें त्यास पुनः आग्रहानें सांगितलें कीं " आज-पासून तीन दिवसांच्या आंत कविता करून ती दरबारांत ह्मणून दाखविली पाहिजे. " कवि घरीं गेल्यावर निरवानिरव करूं लागले. घरांत कवीची बायको व नंदलाल ह्या नांवाचा एक लहान मुलगा होता. बायकोनें असें करण्याचें कारण विचारिलें असतां कवीनें दरबारांत झालेली सर्व हकीगत तिला सांगितली. व ह्मटलें कीं, "खरें काव्य प्रसिद्ध करणें हें कवीचें काम, आणि तसें केल्यास बादशहाला राग येऊन तो माझा घात करील, या साठीं तीन दिवसांच्या पुढें वाचण्याचा भरंवसा नाही, ह्मणून मी ही निरवानिरव करित आहें.

नेमलेल्या दिवशीं कवि दरबारांत जाऊन थडकले. त्यांस पाहून बादशहानें " कांहीं कविता केली काय ? " ह्मणून विचारतां पूर्वीचेंच उत्तर आतांहि दिलें. तेव्हां बादशहास राग येऊन त्यानें हुकूम दिला कीं, " कविता न केली तर तुमचें शिर उडवूं. " हें ऐकतांच गंग कवीसही राग आला व तो ह्मणाला कीं:—

कभी न गांडू रण चढे कभी न बाजे बंब ।
सकल सभाकू आशिस है विदा होत कवि गंग ॥१॥

हें ऐकून बादशहाचा क्रोध अनावर होऊन त्यानें कवीस हत्तीच्या पायीं देऊन मारावें असा हुकूम केला ! हा हुकूम ऐकून दरबारांतील सर्व मंडळींस फार वाईट वाटलें, परंतु काय उपयोग ? हुकुमाप्रमाणें कवीस हत्तीच्या पायीं देऊन मारविलेंच. ! ! !

पुढें कांहीं दिवसांनीं गंग भाटाची योग्यता बादशहाचे लक्षांत येऊन त्यास कृतकर्माचा पश्चात्ताप झाला ! परंतु काय उपयोग ? झाली गोष्ट ती झाली ! दरबारी मंडळी कवीचा निस्पृहपणा नेहेमीं वर्णन करीत कांहीं काळानें गंग भाटाचा मुलगा नंदलाल हा मोठा झाला. बापाची योग्यता त्यानें लोकांच्या तोंडून पुष्कळ वेळां ऐकिली होती. तेव्हां " शहरांत ज्याची लोक स्तुति करितात व ज्याच्यावाचून बादशाही दरबार शून्य दिसतो ह्मणून ह्मणतात तो माझा बाप कोणता ? तो कोठें गेला ? त्याची काय अवस्था झाली ? " असा पूस तपास करण्याच्या हेतूनें तो आईजवळ गेला व विचारूं लागला. आईनें डोळ्यांत पाणी आणून कवीची योग्यता

व बादशहाचा मूर्खपणा पुत्रास सांगितला. "बीज तसा अंकुर" ह्या न्यायानें आईनें सांगितलेली हकीगत ऐकल्याबरोबर "मी आतां बादशहाकडे जाऊन त्याची कानउघाडणी करितों." असें ह्मणून निघाला. आईनें त्यास आवरिलें, ती ह्मणाली "बाळा तूं जाऊं नको, बादशहाला तूं कांहीं बोललास तर तो तुलाही मारील. ती वेळ रात्रीची होती. तरि तो तसाच थेट राजवाड्यापर्यंत गेला. बादशहा दरवाजा लावून आंत निजला होता. त्याच दरवाज्याची कडी धरून तो दरवाजा ठोठावूं लागला. तें ऐकून आंतून बादशहानें कोण ? ह्मणून विचारिलें ? तेव्हां नंदलाल ह्मणाला—

अकबर बे अकब्बर, तूं है अंधा नर ।
तेरे एक हातमे घोडा, और एक हातमे खर ॥
होजा मेरी जोरू, अगर होजा मेरा बर ।
हमने कहना था सो कहे दिया, तुनें करना होय सो कर ॥ १

मी गंगभाटाचा मुलगा नंदलाल आहे. हें बादशहानें ऐकून त्यानें मोठ्या कौतुकानें त्यास दुसऱ्या दिवशीं दरबारांत येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें दरबारांत जाऊन मुजरा केल्यावर बादशहानें त्यास मोठ्या प्रेमानें व कौतुकानें बसण्यास जागा दिली. "कांहीं कविता करण्यास शिकलास काय ? ह्मणून विचारलें असतां त्यास नंदलालनें पुढील कबीत ह्मणून दाखविलें:—

कारळ को खेदत कहां । कपटी को हेत कहा ।
रांगके रुपय्या कू कहां जातुराये । काटकी तलवार बांधे—
कोण जंग जीत पावे । पथ्थरके मूरतको कबलो समजाइये ।
गुलामके गुलाम तिलामके तिलाम । कवि गंग ऐसे गुणीकू
क्या गरिंदसे तुराइये ॥ १ ॥

अर्थ—कडू कारल्याच्या शेतांत, लबाडाच्या हेतूंत, व वेश्येच्या विश्वासांत खरेंपणा नाहीं; कातड्याच्या रुपयांत अर्थ नाहीं; लांकडाची तलवार घेऊन कोणी जय मिळविला ? दगडाच्या मूर्तीची कोणी समजूत करील काय ? तूं गुलामांचा गुलाम व हलकटांतला हलकट आहेस ह्मणून गंगकवी सारख्या गुणवान् पुरुषाला तूं हत्तीच्या पायीं देऊन मारविलेंस !

ह्या प्रमाणें नंदलालानें बादशहाची कठोर शद्बांनीं कान-उघाडणी केल्यावर बादशहा प्रसन्न झाला ! त्यानें त्याचें मोठें कौ--तुक केलें ! व संतोष मानून नंदलाल ह्यास मोठी देणगी देऊन त्यास गंगकवीप्रमाणें नित्य दरबारांत येण्याविषयीं आज्ञा केली. थोड्याच दिवसांत नंदलालानें चांगला लौकिक मिळविला. ह्या प्रमाणें आमच्या कविवर्यांची माहिती दोन ठिकाणीं दोन प्रकारची मिळते ! ह्यांत सत्यासत्य निर्णय करणें वाचकांवरच सोंपवितों. आतां त्याच्या उपलब्ध काव्यापैकीं नमुन्याकारितां थोड्याशा कविता ह्या खालीं देत आहें.

( १ )

गंगतरंग प्रवाह चले । तो कूपको नीर पियो न पियो ॥
ज्याके हृदय रघुनाथ बसे । तो औरका नाम लियो न लियो ॥
कर्म संजोग सुपात्र मिले । तो कुडात्रकू दान दियो न दियो ॥
कवि गंग कहे सुनशाह अकब्बर । मूरख मित्र कियो न कियो ॥१॥

( २ )

ताराकि ज्योतमे चंद्र छुपे नही। सुरज छुपे नही बादल छायो ॥
रण चढयो रजपूत छुपे नही। दाता छुपे नही मंगल आये ॥
चंचल नारको नयन छुपे नही । प्रीत छुपे नही पीठ दिखायो ।
कवि गंग कहे सुन शाह अकब्बर। कर्म छुपे नही बभूत लगायो॥२।

( ३ )

बालसे ख्याल, बडेसे विरोध, अगोचर नारसे ना हसिये ॥
अन्नसे लाज, अंजनसे जोर, अजानत वीरमे ना घुसिये ॥
बैलको नाथ, घोडेको लगाम, हत्तीको अंकुशसे कसिये ॥
कवि गंग कहे सुन शाह अकब्बर, क्रूरसे दूर सदा वसिये ॥३॥

( ४ )

जट्ट कहा जाने भट्ट को भेद, कुंभार कहा जाने भेद गिताको ।
मूढ कहा जाने गूढके बातमे, भिल्ल कहा जाने पाप लगाको ।
प्रीतकी रीत अतीत कहां जाने, हैस कहा जाने खेत सगाको ।
कवि गंग कहे सुन शाह अकब्बर, गद्रा क्या जाने वीर गंगाको॥४॥

( ५ )

पाव दिये चलने फिरनेकू, हात दियो हरि कृत्य करायो ।
कान दियो हरि नामको जस, नयन दियो तिन मार्ग दिखायो ।
वासनको काज नाक दियो, मुख दियो हरि गुन गावनकू ।
गंग कहे प्रभु ठीक कियो, पर पेट दियो पत खोवनकू ॥५॥

## ५ महेषदास ( राजा बीरबल )

( बीरबल विलास ह्या पुस्तकावरून )

बीरबल हा मारवाडांतील **मकरणी जातीचा ब्राह्मण** होता. ह्यानें अकबरास संगमरवरी दगडाची खाण दाखवून दिली. असें लोक ह्मणतात. कोणी ह्मणतात कीं हा अजमीर जवळच्या एका खेड्यांतील राहणारा होता. ह्याचे आईबाप फार गरीब असून ते लांकडाच्या मोळ्या विकून उदरनिर्वाह करीत. व ह्या स्थितींतून हा अकबराचा मांडलिक झाला. बुंदेलखंडातील लोक ह्मणतात कीं, हा आपल्या देशांतील राहाणारा असून **सनाढ्य जातीचा ब्राह्मण** होता. कोणी ह्मणतात कीं तो काशीकडे **ब्रह्मभट्ट** नांवाची जात आहे. त्या जातीचा होता. कोणी ह्मणतात कीं हा भाट होता. कोणी ह्मणतात कीं गोदावरीच्या कांठीं शूरवीर नामक एका ब्राह्मणाच्या घरीं ह्याचा जन्म झाला. "दरबार अकबरींत" लिहिलें आहे कीं ह्याचें मूळचें नांव महेशदास असून हा जातीचा **ब्राह्मण** होता; व "तवारीख बदायुनींत" लिहिलें आहे कीं, हा जातीचा **ब्राह्मण भाट** होता, ह्याचें मूळचें नांव ब्रह्मदास, हा काल्पीचा राहणारा, लोकांची स्तुति करावी व मिळेल त्यावर निर्वाह करावा. अशा प्रकारें ह्या प्रसिद्ध पुरुषाच्या नांव गांवासंबंधानें बराच मत भेद आहे तरिपण अलिकडच्या माहितीवरून असें निश्चयानें सांगतां येतें कीं, हा जातीचा ब्रह्मभाट असून अत्यंत गरीब घराण्यांत ह्याचा जन्म इ० स० १५४२ ह्या वर्षी काल्पी येथें झाला. विद्याभ्यास करण्याकरितां हा काशीस राहिला. संस्कृत, अरबी, फारशी व हिंदी ह्या भाषांत त्यानें चांगलें प्राविण्य

मिळविलें. ह्याचा स्वभाव अत्यंत विनोदी असून हा हजर जबाबी होता. हा उत्तम कविता करित असे. त्याची कविता रसभरित असून वाचकांस चटक लागणारी असे. ह्याची कविता अकबर बादशहानें ऐकिली तेव्हां तो अत्यंत संतुष्ट होऊन ह्यास त्यानें ' कबिराय ' अशी पदवी दिली. त्यानंतर त्यास राजा अशी पदवी देऊन आपल्या सरदार मंडळींत त्यास दाखल करून घेतलें. नंतर थोड्या दिवसांनी त्यास ' राजा बीरबल ' असा किताब दिला. अकबराबरोबर हा नेहमीं लढाईस जात असे, व कधीं कधीं अकबर ह्यास स्वतंत्ररितीनें एकाद्या राज्यावर युद्धास पाठवीत असे. नागरकोटच्या जयचंद्रावर ह्यानें स्वारी करून जय मिळविल्यावर तें राज्य अकबरानें खालसा करून बीरबलास दिलें ह्यावेळीं बीर–बलानें बरेंच बुद्धिबल खर्चिल्यामुळें बादशहानें पुढें त्यास 'बुद्धिवान मंत्री " असा किताब दिला.

अकबरानें गुजराथवर स्वारी केली त्यावेळीं बीरबल हा बादशहाबरोबर होता. डोंगरपूरच्या राजकन्येचें बादशाही कुटुंबांत लग्न जमवून तें संस्थान सुरक्षित ठेवण्याचें कामीं बीरबलानें बरीच खटपट केली. पंजाबच्या उत्तर हद्दीकडे डोंगराळ प्रदेशांतील पठाण लोक बादशाही प्रदेशास फार त्रास देत, लुटालूट करीत, त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां बादशहानें बीरबलास पाठविलें त्या युद्धांत तो पठाणाच्या हातून इ० स० १५८६ च्या फेब्रुवारींत मारिला गेला.

हें वर्तमान बादशहास समजल्यावर त्यास इतकें दुःख झालें कीं गादीवर बसल्यापासून ह्या वेळेपर्यंत इतकें मोठें दुःख

त्यास झालें नाहीं. असें " इकबाल नामे जहांगिरींत " ह्मटलें आहे.

बीरबलाचा वर्ण काळा असून मस्तक रुंद व तोंडावर देवीचे वण होते व नेहेमी टोपी घालित असे. असें " अकबर नाम्यांत " लिहिलें आहे.

ह्याचा स्वभाव अत्यंत सरळ असून भाषण इतकें मधुर असे कीं, तो कोणाल्लाही सहज आपलासा करून घेत असे ह्यानें बादशाही दरबारांत श्रेष्ट स्थान मिळवून लोकावर अनेक वेळां उपकार केला. व उत्तम उत्तम कृत्यें करून आपलें नांव अमर करून ठविलें. **ह्यानें ब्राह्मणांस कुळकर्णीपणा देवविला, गोहिंसा बंद करविली, व हिंदु मुसलमानांत एकी घडवून आणिली.** ह्याची स्मरणशक्ति अपूर्व होती, हा विनोदी व हजर जबाबी असून बादशहाच्या मनांतील इंगित तेव्हांच ओळखत असे.

जो मनुष्य बाल्यावस्थेंत दरिद्री असतो तो श्रीमंत झाल्यावर फार कृपण बनतो, असा सामान्य नियम आहे. पण त्या नियमास बीरबल हा अपवाद होता. अनेक याचक याच्या दातृत्वाची प्रशंसा करितात. एक त्यावेळचा मुसलमान इतिहास लेखक असें ह्मणतो कीं, त्यावेळीं बीरबलासारखा दाता सबंध हिंदुस्थानांत नव्हता. तो दरमहा अगर दरसाल लाखो रुपये व जडजवाहीर इत्यादि इनाम मिळवित होता व तितकें सर्व तो प्रसंगविशेषीं धर्म करीत होता. दूरदूरचे राजेरजवाडे त्यास प्रसन्न ठेवण्याकरितां नेहेमी त्याजकडे नजराणे पाठवित असत. बाद–

शहाच्या अंतःपुरांतही जाण्यास ह्यास प्रतिबंध नव्हता. ह्यानें शेवटीं " दीने इलाही " ह्या धर्मपंथाची दीक्षा घेतली. कधीं कधीं विनोदानें तो मुसलमानांस निंदात्मक बोलून जाई ह्यामुळें ते ह्याचा द्वेष करित असत. परंतु बादशहाच्या असीमकृपेमुळें त्याचा परिणाम ह्यास मुळींच भोगावा लागला नाहीं. बादशहाला सुद्धां तो कधीं कधीं अपमानकारक शद्ब उच्चारित असे. ह्याच्या प्रेमाचा अंकुर बादशहाच्या मनोभूमींत इतका पूर्णपणें रुजला होता कीं, ह्याच्या मृत्यूमुळें बादशहाला पुष्कळ दिवस भोजनहि गोड वाटेना

बीरबलाच्या संततीचा नक्की शोध लागत नाहीं ' अकबर-नामा ' ग्रंथांत लाला व हरिहरराय अशीं दोन मुलें ह्यांस होती अशी माहिती सापडते पैकीं लाला जहांगिरजवळ व हरिहरराय दानियलकडे रहात असे. बीरबलाच्या मरणानंतर बादशहानें हरिहरराय यास विचारलें कीं बीरबलाबरोबर त्याच्या किती स्त्रिया सती गेल्या ? त्यानें उत्तर दिलें कीं पृथ्वीनाथ ! वीरता, उदारता व बुद्धि ह्या तीन स्त्रिया सती गेल्या व चौथी कीर्ति जिवंत आहे, ह्या उत्तरानें बादशहा फार खुष झाला.

बीरबलावर परमेश्वराची अशी कृपा होती कीं दरबारांत ह्याचा कोणी कधीं पराजय केला नाहीं. हा अगदीं कंगाल स्थितींत असतांना अकबरानें ह्यास मित्र ह्मटलें त्याप्रमाणें त्यानें ह्याच्याशीं खऱ्या मित्रत्वाचेंच नातें ठेविलें. ही गोष्ट अकबरासारख्या बादशहास भूषणावह आहे.

मुसलमानी रियासत पृ० ५६५ मध्यें बीरबलाची ह्याप्रमाणें माहिती सांपडते:—

हा भाट कवि काल्पीचा राहणारा, हा गरीब पण बुद्धिवान होता, अकबराकडे आल्यावर त्याच्या कवनांनीं बादशहा त्यावर फार खुप होऊन चांगलें प्रेम करूं लागला. अकबरास त्याचीं हिंदी कवनें फार आवडत. ह्याची भाषा चांगली भारदस्त आहे. ह्याच्या काव्य-गुणामुळें बादशहानें ह्यास "कविराय" असा किताब दिला. इ० स० १५७४ त नागरकोटच्या जयचंदास अकबरानें कैद करून आणिल्यावर त्याचें सर्व राज्य ह्या कवीस देऊन शिवाय "राजा बिरबल" असा किताब दिला. गुजराथच्या स्वारीत बिरबल हा अकबराबरोबर होता. अनेक रजपूत राजांकडे अकबर ह्यास वकील ह्मणून पाठवी. रजपूत राजांस समजुतीच्या गोष्टी सांगून शरण आणणें, त्यांच्या कुटुंबांतील मुलींचीं बादशाही कुटुंबांत लग्न जुळविणें, इत्यादि अनेक महत्त्वांचीं व नाजुक कामें अकबर ह्यास सांगत असे हा साधुवृत्तीनें राहून कालक्रमणा करी. हा फार समयसूचक, विनोदी, निस्पृह आणि स्पष्टवक्ता होता. हिंदुधर्मांतील अनेक उत्तमोत्तम तत्त्वें ह्यानें अक--अकबराच्या मनावर ठसविली होतीं. ह्यामुळें दरबारांतील मुसलमान सरदार ह्याचा द्वेष करीत. ह्याचें भाषण गमतीचें व बोधपर असे. अकबराच्या नवरत्नदरबारांत हा होता. अफगाण लोकांवरील स्वारींत हा १५८६ च्या फेब्रुवारींत मारिला गेला.

बीरबल व बादशहा ह्यांच्या ज्या गोष्टी सांगण्यांत येतात त्यांपैकीं पुष्कळ गोष्टी वेडगळ व पोरकट अशा दिसतात. तथापि

त्या खरोखर मनोरंजक व बोधप्रद आहेत. अशा कांहीं गोष्टी पुढें दिल्या आहेत.

गोष्ट १—एकदां बादशहानें बीरबलास विचारिलें " खरें व खोटें ह्यांत अंतर किती ? " बीरबलानें उत्तर केलें " चार बोटांचें " " तें कसें ? " ह्मणून बादशहानें प्रश्न विचारतांच बीरबल ह्मणाला, " जें आपण प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहातों तें खरें. व जें कानांनीं ऐकितों तें खोटें. डोळे व कान ह्यांच्या मध्ये फक्त चार बोटांचें अंतर आहे. तेव्हां खरें व खोटें ह्यांच्या मध्यें चार बोटांचें अंतर आहे किंवा नाहीं ह्याचा खाविंदांनींच विचार करावा ! "

गोष्ट २—एकदां बादशहा व बीरबल आंबे खात बसले होते. त्यावेळीं बादशहानें बीरबलाची थट्टा करण्याच्या हेतूनें असें केलें कीं, आपण जे आंबे खाल्ले, त्या सर्वांच्या साली व कोया ( बाठा ) बीरबलापुढें टाकिल्या, आंबे खाऊन झाल्यावर बादशहा बीरबलास ह्मणतो, " बीरबल, तुह्मी आंबे किती खाल्ले ? तुमच्या-पुढें हा सालींचा व कोयांचा केवढा ढीग पडला आहे ! अबब ! " ह्या बोलण्याचा रोंख लक्षांत घेऊन बीरबलानें लागलींच उत्तर दिलें कीं, " खाविंद, माफ करा ! मीं पुष्कळ आंबे खाल्ले खरे, पण त्यांच्या साली व कोया तरि शिल्लक ठेविल्या आहेत ! परंतु खाविंदांनीं माझ्या इतके आंबे तर खाल्लेच, पण साली व कोया देखील गट्ट करून टाकिल्यासें दिसतें ! "

गोष्ट ३—एकदां पावसाळ्यांत नदीला पूर आला होता व त्या नदींत खडक असल्यामुळें त्या पाण्याचा मोठा आवाज होत होता. तो आवाज अकबरानें ऐकिल्यावर बीरबलास विचारिलें " बीरबल, ही नदी इतका आक्रोश कां करितें ? " ह्यावर बीरबलानें लागलीच उत्तर दिलें, " खाविंद, ! ही माहेर सोडून सासरीं जात असल्यामुळें एवढा आक्रोश करित आहे ! " हें भाषण ऐकून बादशाहास फार समाधान वाटलें !

गोष्ट ४—एकदां अबूल फजल यानें बादशहाचे समक्ष बीरबलास ह्मटलें कीं, " तुह्मांस बादशहानें आजपासून कुत्रीं व गाढवें ह्यावर अधिकारी नेमिलें आहे. " ह्यावर बीरबल ह्मणाला " वा ! मग तुह्मांलाहि माझ्या आज्ञेंत रहावें लागेल. " हें ऐकून बादशहा हसून उठला व अबूल फजल लज्जित झाला.

गोष्ट ५—एकदां बीरबलानें बादशहास विचारिलें कीं, " सूर्य पश्चिमेस कां मावळतो ? बादशहा ह्मणाला " हा प्रश्न एखाद्या मूर्खास विचारावा. " बीरबल ह्मणाला " ह्मणून तर आपणांस विचारिलें. " हें ऐकून बादशहा हंसून उठला.

गोष्ट ६—एकदां बादशहा बीरबलास ह्मणाला " तुह्मी गाईस माता ह्मणता मग बैल हा तुमचा बाप झाला. तो पहा, तो विष्टा खातो, ह्यावर बीरबल ह्मणाला, महाराज, खरें आहे, त्यानें आमचा धर्म सोडून तो मुसलमान झाला आहे. " हें ऐकून बादशहा स्तब्ध झाला.

आतां ह्याच्या कवितेचा नमुना पुढें दिला आहे:—

दोहा

उद्यमसे लक्ष्मी मिले । मिले द्रव्यसे मान ॥
दुर्लभ पारस जगतमे । मिलनो मित्र सुजान ॥

दोहा

सुत नहिं अबला कर सके, यश नहि सिंधु–समाय ।
धर्म न पावक मे जलं, नाम काल नहि खाय ॥ २ ॥

---

एक समय पियने मुखसे मुख खोलके आप तमोल खिलायो ।
चंद्रमुखी मुख नायके आपनो ज्यों कर जोडके शीस नमायो ॥
लाल उरोज गहे करसे उपगी छतियां जियरा हुलसायो ।
मुसकातहि पीक गिरी मुखसों मनचंद्रकों चीर कुसूम चुवायो ॥ ३ ॥

---

सूर्य छिपे अदली बदलीमे, चंद्र छिपे अमावस आये ।
पानीकी बुंद पतंग छिपे है और मीन छिपे इच्छा जल पाये ॥
भोर भये पर चोर छिपे है मार छिपे फागम ऋतु आये ।
सौ घूंघटकी ओट कसै पर चंचल नैन छिपे न छिपायो ॥ ४ ॥

कबीत

पैसे बीन बाप कहे पूत तो कपूत भयो—
पैसे बिन भाई कहे बंधु दु:ख दाई है ॥

पैसे बीन जोरू कहे नकटेसे काम पड्यो—

पैसे बीन सास कहे किसीका जवाई है ॥

पैसे बीन यार दोस्तार कोहि ना भयो—

पैसे बीन दुनियामें मुंह कूं छिपाईये ॥ ५ ॥

---

..म झरोके बैठके सबका मुजरा लेन ।

जाकी जैसी चाकरी ताको तैसा देन ॥ ६ ॥

ह्याप्रमाणें ह्याच्या कविता आहेत.

---

## ६ पृथ्वीराज भाट

हा उदेपूरचा महाराणा प्रतापसिंह ह्याचे पदरीं होता. ह्याजवर प्रतापसिंहाचे अत्यंत प्रेम असे. राण्याजवळील अनेक निरनिराळया संकटाच्या वेळीं सुद्धां प्रतापानें त्यास दूर केलें नाहीं व त्यानेंहि प्रतापास सोडिलें नाहीं. एकदां प्रतापसिंहाच्या मुलां-बाळांस गवताचें बीं दळून त्याच्या भाकरी खाण्याचा प्रसंग आला. प्रतापाच्या मनाला उद्विग्नता वाटून तो अकबरास शरण जाण्याचा विचार करित असतां पृथ्वीराज भाटानें त्यास परावृत्त करणारें जें भाषण केलें तें त्या सर्व रजपुतांस केवळ अमृत संजीवनी-मात्रे-प्रमाणें अत्यंत उपयुक्त व स्फुरणदायक झालें. तें भाषण असें:—

" प्रतापसिंह महाराज! आह्मां हिंदूंच्या सर्व आशा आपल्यासारख्या पराक्रमशाली हिंदु राजांवर अवलंबून आहेत. जरि पुष्कळ रजपूत राजांकडून त्या आशांची निराशा झाली तरी आपल्याकडून ही आमची तशीच निराशा होऊन आपणही अकबरास शरण जावें ही गोष्ट आपणांस, आपल्या स्वर्गीय पितरांस व आपल्या एकंदर घराण्यास बट्टा लावणारी व दुःखास्पद आहे! पुष्कळ रजपुतांनीं आपली लज्जा व आपल्या स्त्रियांचें पातिव्रत्य हीं सर्व अकबरास विकलीं आहेत. परंतु उदेसिंगाचे पुत्र जे आपण, त्या तुह्मी मात्र ती रजपुतांची लाज व स्त्रियांचा पवित्रपणा हीं आपल्या कुळांत रक्षण केलीं आहेत, तीं तशीच अबाधितपणें पुढें ही राखा! महाराज! काय सांगूं? येथें जे नौरोजाचे व खुषरोजाचे उरूस भरतात त्यांत कोणत्या खऱ्या रजपुताच्या बायकोची अब्रु कायम राहिली आहे? तेव्हां त्यांच्याप्रमाणें चितोडच्या सुप्रसिद्ध व परम अभिमानी ' सिसोदिया ' घराण्याची ही अब्रु त्या उरुसांत विकावयास नेऊं नका! महाराज! सर्व जगाची दृष्टि तुमच्याकडे आहे! जें काय शौर्य गाजवावयाचें व हिंदूंच्या अब्रूचें रक्षण व्हावयाचें असेल तें प्रतापसिंहाकडून होईल असें आज सर्व जगास वाटत आहे, त्यांची निराशा करूं नका. तुमच्या कुळांतील आजपर्यंत बेइज्जत झाली नाहीं ती यापुढें हि होऊं देऊं नका! तुमच्या जयशाली तरवारीची तुमच्यावर पूर्ण कृपा आहे, तिच्या मदतीनें तुह्मी रजपुतांचे ब्रीद राखा! महाराज! हा मोगल बादशहा, हा मदांध मोगल बादशहा रजपुतांची अब्रु व त्यांच्या स्त्रियांचें पातिव्रत्य लुटीत आहे!

तो केव्हां तरी ईश्वराच्या अवकृपनें खालीं येईलच व माझी खात्री अशी आहे कीं हें मंगलकार्य खात्रीनें आपल्याकडूनच होईल ! तुमच्या अभिमानास ईश्वराची पूर्ण मदत मिळेल. "

असें पृथ्वीराज भाटाचें भाषण ऐकल्याबरोबर प्रतापसिंहास दहाहजार मनुष्याचें सामर्थ्य आल्यासारखें वाटलें ! ! ! लागलीच तो अकबराशीं लढाई देण्याच्या उद्योगास लागला. थोड्याच वेळांत त्यास हजारों रजपूत येऊन मिळाले ! व त्यामुळें बादशहास शरण जाण्याचे त्याचे विचार बदलून त्याला अत्यंत उत्साह वाटू लागला. ह्याप्रमाणें चांगली तयारी करून युद्धास तोंड लागलें, तों पहिल्याच चकमकींत ह्या भाटास गोळी लागून तो मारिला गेला! तेव्हां प्रतापास अत्यंत वाईट वाटून तो ह्मणाला—" हजारों योद्धांच्या तरवारींत जें सामर्थ्य नसेल तें ह्या भाटाच्या वाणींत आहे ! हाय ! ! हाय ! ! ! तो मला आज सोडून चालला ! ! !

पृथ्वीराज भाट हा अत्यंत स्पष्ट बोलणारा होता, ह्याचें आणखी एक प्रसिद्ध उदाहरण इतिहासांत आहे. नवरोज व खुष–रोज हे उरूस रात्रीं भरत. त्यांत दुकानदार स्त्रिया व गिऱ्हाईक हि स्त्रियाच असत. ह्या उरूसांत चांगले चित्तवेधक पदार्थ विक्रीस येत व ते रजपूत वगैरे बायका विकत घेत. ह्यांत अकबर हा स्त्रीवेषानें जाऊन जी स्त्री सुंदर दिसेल तिच्यावर बलात्कार करून तिला सुवर्णमौक्तिकांचे दागिने व जडजवाहीर देऊन वाटेस लावी ! असा प्रसंग एकदां पृथ्वीराज भाटाच्या बायकोवरहि आला असतां तिनें तें सर्व कपट ओळखून लागलीच आपल्या कमरेची

कट्यार काढून अकबराच्या छातीवर अशी धरली कीं त्यास हाल चाल करितां येईना! अकबर स्वतः स्त्रीवेषांत व निःशस्त्र असल्यामुळें अशा चोरीच्या व नीच कृत्यांत कोणास ओरडून हाक मारण्याची सोय नसल्यामुळें त्याच्या मदतीस त्यावेळीं कोणी धावून येईल असा संभव नव्हताच. ओरडूं ह्मणतो तर त्याचीच जगभर फजीती व्हावयाची. तेव्हां तिनें त्यावेळीं "मी असलें नीच कृत्य पुन्हां करणार नाहीं." अशी त्याजकडून शपथ घेववून त्यास सोडून दिलें व आपणहि सुखरूप घरीं गेली. ह्याच्या पूर्वी पृथ्वीराज भाटाच्या वडील भावाची बायको त्याच्या हातीं सांपडून तिच्यावर त्यानें बलात्कार करून तिला जडजवाहीर व दागिने देऊन सोडून दिलें होतें! (त्याच्या भावाचें नांव रायसिंग असें होतें.) ह्याप्रमाणें बहुतेक स्त्रिया हें महादान घेऊन घरीं जात! पृथ्वीराज व रायसिंग ह्या दोन्हीं भावांच्या स्त्रिया आपआपल्या घरीं पोंचल्यावर "त्या सुखरूप परत आल्याबद्दल" प्रथम रायसिंगानें पृथ्वीराजास पत्र लिहिलें; त्यावर पृथ्वीराजानें उत्तर दिलें कीं, "तुझी बायको तुझ्या घरीं सुखरूप पोहोंचली व ती ही तोरड्यांच्या व कमरपट्ट्यांच्या घागऱ्या छुमछुम वाजवीत व सोन्याच्या आणि जडावाच्या दागिन्यानीं सभोंवारचा प्रदेश लखलखीत करीत आनंदानें घरीं आली खरी, पण बंधो! तुझ्या मिशा कोठें आहेत रे!!! ह्या पत्रानें त्याच्याहि हृदयांत उजेड पडला खरा, पण बिचारा रायसिंग अकबरापुढें काय करणार!!!

पृथ्वीराज भाटाची कवित्वाविषयींसुद्धां फार ख्याति आहे. ह्याच्या कविता व गीतें मेवाडांतील प्रत्येक मनुष्याच्या तोंडी आहेत.

हा सुप्रसिद्ध भाट मेला तरीपण त्याच्या कवितेंतील वीररस अद्याप जीवंत आहे ! त्यानें प्रतापसिंहाच्या खऱ्या देशाभिमानाचें आपल्या कवितेंत जें वर्णन केलें आहे तें इतकें रसभरित व यथार्थ आहे कीं, त्यावेळीं प्रतापसिंहाशीं बेइमान होऊन अकबरास फितूर झालेले रजपूत राजे व प्रतापाचे शत्रु मोगल लोक हे देखील तीं गीतें व त्या कविता मोठ्या प्रेमानें व उत्सहानें ह्मणत असत ! हल्लीं सुद्धां त्या कविता ह्मणत असतां मेवाडांतील रजपूत लोक सद्गदित-पणें अश्रुपात करितात ! या विषयीं कर्नल टॉड साहेब लिहितो कीं, " मी इतिहास शोधार्थ फिरत असतां माझ्या बरोबर असलेले भाट हीं पृथ्वीराज भाटांची गीतें व कविता ह्मणून दाखवित असतां त्यांच्या डोळ्यांतून गहिंवर येऊन टिपें निघालेलीं मी पाहिलीं आहेत ! " ( ह्याची कविता आह्मांस अद्यापि मिळाली नाहीं. मिळाल्यावर प्रसिद्ध करूं. )

———×———

## ७ जयसिंग भाट.

प्रतापसिंहास उमराव ह्मणून एक मुलगा होता. प्रतापसिंह हळदीघाटच्या लढाईनंतर लौकरच वारला. त्याच्या मागें त्याचा उमराव ह्या नांवाचा मुलगा त्याच्या गादीवर बसला. त्याचा आश्रित साळुंब्रयाचा ठाकूर जयसिंग ह्या नांवाचा भाट होता. ह्या जय-सिंगाला प्रतापसिंहाचा स्वभाव, शौर्य, धैर्य, अभिमान इत्यादि अनेक सद्गुणांची माहिती होती. ह्याचें उमराव राण्याशीं प्रतापसिंहा-

नंतर कसें आचरण होतें हें समजण्याकरितां आपण पुन्हा एकदां प्रतापसिंहाच्या अंतकाळापर्यंत मागें जाऊं. प्रतापसिंह हळदी घांटच्या लढाईनंतर अजारी पडला, अशा स्थितींत "माझ्या मागें माझें व्रत माझीं मुलें चालवितील किंवा नाहीं? माझ्या इच्छा अद्यापि पूर्ण झाल्या नाहींत त्या माझ्या मागें शेवटास जातील कीं तशाच पडून राहतील?" अशा विवंचनेंत त्याचें दुखणें वाढलें. त्या वेळच्या ह्या शूर--धीर--गंभीर पुरुषाच्या प्रायोपविष्ट अवस्थेचें ह्या भाटानें फार हृदयद्रावक वर्णन केलें आहे. अंतकाळच्या वेदनांनीं विव्हल होत असतां हा जयसिंग पुढें होऊन राण्यास ह्मणाला, "महाराज! आपले प्राण शांततेनें कां जात नाहींत? आपल्या जिवास कोणते क्लेश होतात?" त्यावर प्रतापसिंहानें आपल्याजवळ असलेल्या सर्व सरदारांस ह्मटलें कीं, "माझा देश माझ्या मागें परकीयांच्या हातांत जाऊं नये, अशाबद्दल माझी कोणी खात्री केली तर माझा जीव सुखानें जाईल! या उदेपुरांत ज्या झोंपड्या आहेत, तेथें मोठमोठे राजवाडे बांधून त्यांत विलास सुखें भोगीत तुह्मी स्वस्थ चैनीनें पडाल; बादशहाच्या चरणीं आपलीं मस्तकें घांसून त्याचा प्रसाद ह्मणून मोठ्या संपत्ति व अधिकार मिळवून अभिमान--शून्यतेनें रहाल; आणि अशा ऐष--आरामांत मेवाडचें फार दिवसांचें स्वातंत्र्य घालवून, ज्या आपल्या लक्षावधि पूर्वजांनीं व शूर वीरांनीं मेवाडकारितां आपल्या रक्ताचा सडा घालून रणदेवतेस आपल्या प्राणांच्या आहुति दिल्या; ज्या चितोडाकारितां बाप्पारावळापासून आजपर्यंत हजारों रजपूत लढून त्यांनीं तें आपल्या ताब्यांत ठेविलें; ज्या चितोडाकारितां तीन वेळां 'जोहार' होऊन रजपूत स्त्रियांनीं आपल्या पतीस व मुलांस उत्तेजन

देण्याकरितां आपल्या जीविताची होळी करून घेतली; आणि हजारों आत्महत्त्या, वध व रक्तपात होऊन जी चितोडभूमि रजपूत राजवंशाची ऋणी आहे; त्या पूज्य चितोड नगराचा ताबा परकीयांच्या हातीं असावा ह्यापरतें लांछनावह व लज्जास्पद दुसरें काय असणार ? आपलें रजपुतांचें नांव चिरकाल टिकेल असें वागा." ह्यावर सर्वांनीं सांगितलें कीं, "आम्ही बाप्पारावळाच्या वंशांतले असूं, तर आपल्या इच्छेप्रमाणें चितोडगड घेतल्यावांचून उदेपूरची झोंपडी मोडून तेथें राजवाडे बांधणार नाहीं, चांदी सोन्याच्या ताटांत जेवणार नाहीं, व गवतावर निजूं " हे शद्ब ऐकल्यवर प्रतापसिंहानें सर्वांकडे डोळे उघडून आनंदानें पाहिलें व लागलींच प्राण सोडला ! ही गोष्ट इ. स १५९७ त घडली.

प्रतापसिंहानंतर त्याचा मुलगा उमराव हा गादीवर बसला. थोड्याच दिवसांत त्यानें झोंपडी मोडून तेथें एक राजवाडा बांधिला व आंत अनेक विलासाचें व चैनीचे पदार्थ आणून ठेविलें. तशेंच एक मोठा विलायती बिलोरी आरसाहि होता. बापानें मरतेवेळीं जी इच्छा प्रदर्शित केली तिच्या विरुद्ध प्रत्यक्ष त्याच्या मुलाचें व असें आचरण पाहून एकदां हा जयसिंग भाट उमरावाच्या महालांत गेला. तेथें त्यास राण्याच्या विलासाचे पदार्थ दिसले. ते त्याला सहन न होऊन त्यानें एकदम त्या आरशावर आपल्या हातांतलि काठीचा ठोसा मारून तो फोडून टाकिला आणि राण्याजवळ जाऊन त्याचा हात धरून त्याला सिंहासनावरून खालीं ओढिलें व इतर

सरदारांस ह्मणाला—" सरदार हो बघतां काय ? घोड्यावर स्वार व्हा व प्रतापसिंहाच्या या मुलाची जी अपकीर्ति होत आहे तिजपासून याचें रक्षण करा. " त्या भाटाचें हें अचाट कृत्य पाहून सर्वांस मोठी भीति वाटली. पण उमराव कांहीं एक न बोलतां स्वस्थपणें उभा राहिला. उघडच आहे. ह्यांत जयसिंग भाटाचा कांहीं स्वार्थ नव्हता. तर उलट, आपला परम प्रिय मित्र व स्वामी जो प्रतापसिंह राणा, ज्याला आपली वाणी वचनबद्ध झाली होती, तिची सत्यता त्याचे पश्चात् लोकांच्या अनुभवास आणावयाची असा त्याचा संकल्प असल्यामुळें व प्रत्यक्ष त्याचा मुलगाच वचनभ्रष्ट होत असल्यामुळें या स्वामिनिष्ठ भाटानें त्यास सिंहासनावरून खालीं ओढिलें. व ह्या कृत्यास सर्व सरदारांचें साह्य असल्यामुळें राण्यानें हा सर्व अपमान मुकाट्यानें सहन केला; त्याच्या डोळ्यांतून एकसारखे अश्रु चालले आणि तसाच तो घोड्यावर स्वार होऊन सर्व सरदार मंडळीबरोबर अकबराशीं लढण्याकरितां राजवाड्या बाहेर पडला. त्यानें आपले डोळे पुसले व मिशांवर हात फिरवून ह्मणाला " ठाकूरसाहेब, मला ह्याबद्दल मुळींच वाईट वाटत नाहीं. मला आपण विलासांतून, मोहांतून व इतर मनोविकारांपासून मुक्त केलें, ह्याबद्दल मी आपला सदैव आभारीच राहीन. आपला उपदेश मला सर्वस्वी मान्य आहे. " ह्याप्रमाणें बोलून तो वीरसमाज निघाला. त्यांनीं मोठ्या उत्साहानें व आवेशानें दिवेरा व राणपूर अशा दोन ठिकाणीं औरंगजेबाशीं फार मोठ्या व भयंकर रक्तपाताच्या दोन लढाया केल्या त्यांत उमरावास जय मिळाला. आणि सर्व गोदवाड प्रांतांत राण्याचें किरमिजी निशाण फडकूं लागलें.

तेव्हांपासून रजपुतांस ह्या भाटानें " खोरासन-मुलतानकी अग्गळ " असें अभिमानास्पद शब्द लाविले. याला ह्मणावें स्वामिभक्ति ! वाचकहो, अशा प्रकारचीं भाटांच्या कर्तृत्वाचीं शेकडों उदाहरणें रजपुतांच्या इतिहासांत आहेत. अग्गळ ह्मणजे दाराचा अडसर. हा अडसर दरवाजा उघडण्यास प्रतिबंध करितो. तेव्हां रजपूत हे काबूल व मुलतान इकडून येणाऱ्या मुसलमानांस प्रतिबंध करणारे अर्थात् अग्गळ ह्मणजे अडसर आहेत, असा त्या पदाचा अर्थ आहे.

——×——

## ८ जैतसिंग भाट.

हा मेवाडचा राणा राजसिंग ह्याचे पदरीं होता. ( जसवंतसिंग ह्मणून आणखी एक दुसरा भाट ह्याचे पदरीं होता. त्याचेंहि थोडें चरित्र ह्यापुढें दिलेलें आहे. ) हा फार स्पष्टवक्ता होता. औरंगजेबानें झीजिया कर बसवून एकंदर हिंदु लोकांस धर्म-वेडामुळें अगदीं त्रासवून सोडिलें, ह्याबद्दल ह्यास वाईट वाटून राणा राजसिंग ह्यांच्या परवानगीनें जैतसिंगानें औरंगजेबास एक पत्र लिहिलें. त्यांतील कांहीं भाग ह्या खालीं वाचकांच्या माहितीकरितां देतों:—

" महाराज ! आपले पूर्वज जलालुद्दीन महंमद अकबर ह्यानीं सर्व धर्मांतील लोकांस समतेनें वागवून त्यांस अत्यंत खुष ठेविलें अशी त्यांची कीर्ति हल्लीं जगांत कायम राहून ते अक्षयसुखाचे स्थानीं जाऊन बसले आहेत ! त्याचप्रमाणें आपले आजे नूरउद्दीन

महंमद जहांगीर ह्यांनीं सुद्धां त्यांच्या परमपूज्यवडिलांप्रमाणेंच बावीस वर्षे राज्य करून तेहि आनंदानें स्वर्गसुख भोगण्यास गेले आहेत ! अशा त्यांच्या समाचरणामुळें ते जिकडे जात तिकडे विजय आणि वैभव हीं त्यांच्या पुढें येऊन त्यांचे स्वागत करीत! ”

“ आणि महाराज! आपल्या कारकीर्दीकडे पहावें तर आपल्या रयतेचें मन बादशाही सिंहासनासंबंधानें उदासीन झालें आहे ! जणूं काय आपल्या रयतेस आपण पायाखालीं तुडवीत आहांत! सर्व लोक दारिद्र्यानें व्याप्त झाले आहेत; सर्व सरदार लोक सुद्धां मदांध झाल्यामुळें तेहि आपणास योग्य सल्ला देत नाहींत; पराक्रमाच्या नांवानें पूज्य, व्यापार धंदे बुडाले, फार काय ज्या लोकांचा आपणास इतका अभिमान वाटतो, ते मुसलमान लोक सुद्धां आपणांस चांगलें ह्मणत नाहींत ! सारांश हिंदु लोकांचा रोष, मुसलमान लोक नाखुष, व्यापाऱ्यांची कुरकूर, सरदारांची शौर्यहीनता, हेंच का आपल्या राज्य–कर्तृत्वाचें फळ ? हिंदुलोकांस सायंकाळचें भोजन करण्यास देखील स्थिरता व उत्साह भासूं नये, यापेक्षां राजाकडून प्रजेला आणखी जास्त त्रास कोणता असूं शकेल ? ”

“ महाराज ! आपल्या अशा मनस्वी व जुलमी वर्तनानें आपली बादशाही कायम कशी राखिली जाईल ? आपण अशा दारिद्र्यव्याप्त प्रजेपासून पैसा पिळून काढण्याचा सपाटा चालविला आहे ! गरीब, ब्राह्मण, संन्याशी, गोसावी, बैरागी व जोगी ह्यांच्या पासूनहि कराच्या रूपानें पैसा उकळतां. तैमूरलंगाच्या शूर, परा-

क्रमी व उदार वंशांत जन्मास येऊन अशा निरुपद्रवी लोकांपासून द्रव्य पिळून काढण्यांत आपण भूषण मानावें ह्यापेक्षां आपल्या मनाची हलकटपणाची आणि नीचपणाची वृत्ति दुसरी कोणती असेल ? ज्या धर्म पुस्तकास आपण ईश्वरदत्त धर्म पुस्तक ह्मणतां त्यांत जर आपण बघाल तर आपणांस असं आढळून येईल कीं, ईश्वर हा मुसलमानांचाच देव नसून तो सर्व प्राणिमात्राचा देव आहे. देवाला मुसलमान व इतर सर्व सारखे ! तुमच्या मूर्तिशून्य–मंदिरांत केलेली प्रार्थना तो ऐकतो आणि हिंदूंच्या मूर्तींच्या मंदिरांतील प्रार्थना ऐकूनहि तो असतुष्ट होत नाहीं ! एकाद्या चितार्यानें काढिलेलें चित्र, त्याच्या समक्षच फाडून तोडून टाकिलें तर त्याच्या मनाची जी अवस्था होईल त्याचप्रमाणें, आपले हें धर्म–वेड ईश्वरी क्षोभाला कारण होणार आहे. कारण ईश्वर हा एक अद्वितीय व अप्रतिम चितारी आहे. त्यानें काढिलेलीं चित्रें तुडवून नाहींशीं करण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे त्या विश्वपट रंगविणाऱ्या सृष्टिकर्त्याचा अपमान करण्यासारखं आहे! ”

“ महाराज ! वास्तविक पाहिलें असतां आपण हिंदू लोकांवर झीजिया कर बसवून पैसे उकळतां, हा अगदीं अन्याय आहे ! हें अगदीं जुलमी कृत्य आहे ! याच्या योगानें सर्व हिंदु–समाज, मग तो आपल्या राज्यांत असो किंवा राज्याच्या बाहेर असो, नाखूष झाल्याशिवाय राहणार नाहीं ! ह्याच्या योगानें पूर्वीच्या बादशाहीचा लौकिक आपण साफ बुडविण्याचा प्रयत्न करित आहां ! आतां ह्यापुढें आपण आपले जे कोणी हितकर्ते

असतील त्यांच्या सल्ल्यानें वागा ! त्यांस बरोबर घेऊन चला ! ह्मणजे कांहीं संकटें आलीं तर तीं आपल्या एकट्यासच भोगावीं लागणार नाहींत. महाराज ! शूरांनीं माशा आणि मुंग्यांना त्रास देण्यांत पुरुषार्थ नाहीं ! ”

ह्या पत्राची भाषा, त्यांतील खुब्या, टोंचून लिहिण्याचें कौशल्य, कडक व स्पष्ट लेखन—पद्धति, लोकोपकारार्थ पत्र लिहिण्याची आवश्यकता, इत्यादि गोष्टी मनांत आल्या ह्मणजे कसाही दुरभिमानी मनुष्य असला तरी तो सुद्धां जैतासिंग भाटासंबंधानें आदर व पूज्यभाव दाखविल्याशिवाय राहणार नाहीं ! ! ! हा भाट मेवाडचा राणा जयसिंग ह्याचे पदरीं होता. ह्याच्याकडून बादशहास हें पत्र जाणें ह्मणजे लहान तोंडीं मोठा घास घेण्यासारखेंच आहे ह्या पत्राचा परिणामहि तसाच विपरीत होऊन राजसिंग हा औरंगजेबाचा कायमचा शत्रु झाला ! त्यानें आपला मुलगा अकबर व अजीम ह्यांच्या बरोबर सैन्य देऊन त्यांस मेवाडचें राज्य जिंकण्यास पाठविलें. परंतु त्यांस यश न येतां उलट ते मार खाऊन व आपलें सर्व सामान सुमान व युद्धसामुग्री घालवून जीव घेऊन परत आले; तेव्हां स्वतां औरंगजेब राजसिंगावर चालून आला. त्यालाहि मोठेंसें यश न मिळतां त्यानें “ [ १ ] रजपुतांचा मोंगलांनीं घेतलेला मुलूख परत द्यावा. [ २ ] हिंदूंचीं देवालयें व पवित्र जागा असतील त्या मोडून तेथें मुसलमानांनीं मशीद बांधूं नये. ” वगैरे प्रकारचा तह करून युद्ध संपविलें. त्यानंतर राजसिंगहि लौकरच मरण पावला ! ( इ० स० १६८१ )

---

## ९. जसवंतसिंग भाट.

हा मेवाडचा राणा राजसिंग ह्याचे पदरीं होता. ह्याच्या कारकिर्दीवर जसवंतसिंगानें 'राजविलास' ह्या नांवाचा एक सुरस पद्यग्रंथ लिहिला आहे. तो हल्लीं उपलब्ध आहे. ह्या राण्याच्या कारकीर्दींत एकदां मेवाडांत भयंकर दुष्काळ पडला होता. त्याचें हृदयद्रावक व करुणोत्पादक वर्णन ह्या ग्रंथांत पुढें लिहिल्याप्रमाणें केलें आहे:—

"आषाढाचा महिना संपून गेला, पर्जन्याचा एकही थेंब पडला नाहीं, श्रावण व भाद्रपद हे दोन महिनेही कोरडे गेले! तेव्हां राणा राजसिंग हा आपली कुलस्वामिनी चतुर्भुजा देवी हिचे देवळांत जाऊन तिची प्रार्थना करूं लागला कीं, हे जगदंबे! सर्व लोक अन्नान्नगत झाले. प्रत्येकास आपलें पोट जड झालें, हजारों लोक मृत्युमुखीं पडले; चार ही वर्ण एकाकार झाले! जो तो पोटाच्या विवंचनेंत पडला! श्रीमंत व दरिद्री दोन्ही ही सारखेच झाले! कोठें झाड–झुडूप दिसेना; तीं सर्व मनुष्याच्या भक्ष्यस्थानीं पडलीं! लोकांनीं झाडाच्या सालीं दग्वोळ खाल्ल्या! मनुष्याला मनुष्यानें खाण्याचा प्रसंग आला!!! पुष्कळ शहरें व गांवें उध्वस्त झालीं! पुष्कळांनीं आत्महत्या करून घेतल्या! मोठमोठीं घराणीं देशोधडीस लागलीं! मनुष्यावांचून पशुपक्षी वगैरे प्राणी दिसेनासे झाले!" इ० इ०

अशा प्रकारचें जसवंतसिंग भाटाच्या तोंडून कवित्वामध्यें त्या दुष्काळाचें वर्णन राणा राजसिंग ह्यानें ऐकिलें. तो फार

[stamp]

प्रजावत्सल असल्यामुळें त्यानें तेव्हांच ज्योतिष्याला बोलावून विक्रम संवत १७१७ पौष शु० ८ मंगळवारीं मुहूर्तावर एक मोठा तलाव बांधण्यास आरंभ केला व थोड्याच दिवसांत काम पूर्ण करून त्यास 'राजसमुद्र' असें नांव दिलें. हा तलाव बांधण्याचा हेतु असा कीं, हल्लीं लोकांस काम मिळावें व पुढेंहि असा प्रसंग आल्यास ह्या तळ्यांतील पाण्याचा लोकांस उपयोग व्हावा. ह्या कामाकडे एकंदर ९६ लक्ष रु. खर्च झाले !

ह्याप्रमाणें भाटांनीं अलौकिक कामें बजावून आपलें नांव भारतवर्षाच्या इतिहासांत अजरामर करून ठेविलें. ह्यावरून वाचकांची खात्री होईल कीं, ह्या भाट ( सूत ) समाजानें पौराणिक कालीं वाङ्मय सेवा करून जगाला उपकारबद्ध करून ठेविलें व पुढें त्यांच्याच वंशजांनीं इतिहासकाळांत देशसेवाकरून तोच लौकिक कायम ठेविला आहे. " इतकें महत्कृत्य भारतवर्षांत इतर कोणत्याही जातीनें केलें नाहीं ! "

---

## १० दुर्गादास भाट.

हा लुनी नदीच्या कांठीं द्रुनेरा नांवाचा एक प्रांत आहे तेथील राहणारा होता. हा उदेपूरचा महाराणा राजसिंग ह्याच्या

पूर्ण विश्वासांतला असल्यामुळें त्याला त्यानें मारवाडचा अज्ञान अजितसिंह राठोड आणि त्याची मातुःश्री यांचा संरक्षक नेमिलें. हें काम त्यानें फार विश्वासानें व इमानानें बजाविलें. एकदां औरंगजेबानें ह्यास फितूर होण्याकरितां चाळीस हजार मोहोरांचा नजराणा ह्याजकडे पाठविला. “ ह्या नजराण्याचा अर्थ आपण फितूर व्हावें ” असा असल्यामुळें तो त्यानें बादशहाकडे साभार परत केला व सोबत एक पत्र देऊन त्यांत लिहिलें कीं: —

“ महाराज आपण थोर आहांत ! राजनीतिज्ञ आहांत ! राजकारस्थानाकरितां आपलें हें कृत्य आपणांस कदाचित् योग्य असेल, परंतु ह्या क्षुल्लक आमिषाला भुलून व आपणांस फितूर होऊन अक्षय्य नरकाची जोड करून देणारा हा दुर्गादास भाट स्वामिद्रोही खास नाहीं ! जोंपर्यंत ह्या शरिरांत प्राण आहे व जोंपर्यंत ह्या अजितसिंहाच्या अन्नाचें रक्त माझ्या शरिरांत खेळत आहे तोंपर्यंत त्याचा मला कधीं विसर पडणार नाहीं व मी त्या अन्नाशीं निमकहराम होऊन स्वामिद्रोह करणार नाहीं; हें आपण पक्कें समजा. व ह्मणून आपण पाठविलेला नजराणा किंवा लांच मी साभार परत करीत आहे. ” असें पत्र देउन त्यानें आपल्या मनाचा थोरपणा, इमानीपणा व स्वामिनिष्ठा कायम टेविली ह्या बद्दल इतर भाट व मुसलमान इतिहास लेखक देखील दुर्गादासाची फार स्तुति करितात. भाटांच्या विश्वासूपणाची, नीतीची, बाणेदार स्वभावाचीं व स्वामिनिष्टेची अशी अनेक उदाहरणें रजपुतांच्या इतिहासांत आहेत. असले स्वामिनिष्ठ सेवक ज्या धन्याच्या पदरीं असतात ते खरोखरी धन्य होत !

—-×—

शहाजी राजे भोसले ह्यांच्या दरबारांत ३५ मुत्सद्दी आणि ३५ कवि असत. ह्या कवि-समुदायांत मोरू नाना भाट, चत्रू ठाकूर, दुर्गादास ठाकूर, विश्वंभर ठाकूर व शिवदास ठाकूर असे पांच भाट कवि होते. त्यांची माहिती व काव्याचे नमुने मिळाले तेवढे ह्या खालीं देत आहें.

---

## [ ११ ] मोरूनाना भाट

ह्या भाट—कवि शहाजी राजे भोसले ह्यांच्या दरबारांत तंजावरास होता. हा मूळचा बागलाणांतील राहणारा. नाशिक जिल्ह्यांत हल्लीं बागलाण तालुका आहे, त्याच्या आजूबाजूच्या थोड्या ज्यास्त प्रदेशास त्यावेळीं बागलाण असेंच नांव होतें. त्या भागावर एक लहानसें राज्य त्यावेळीं असावें असें ह्याच्या कवित्वा-वरून दिसून येतें. त्या प्रांतांतील भाषा हल्लींच्या 'अहिराणी' भाषेशीं पुष्कळ जुळते. ही भाषा हल्लीं एरंडोल, अंमळनेर, नंदुरबार, चोपडें, पाचोरे, चाळिसगांव ह्या भागांत बोलतात. ह्या भागास जोडून बागलाणची हद्द असावी. हीच भषा शहाजी राजांच्या वेळीं ह्या भागांत चालत असावी. ह्या भाट कवीनें ह्या बागलाणी भाषेंत शहाजी राजांची स्तुति केली आहे. हा शहाजी राजाबरोबर कर्नाटकाच्या स्वारीवर गेला होता. ह्यानें एका पद्यांत ह्मटलें आहे कीं

"शहाजी ज्यांच्या पासून चाकरी घेतो त्याला नगारा देतो व ज्यांची चाकरी घेत नाहीं त्यांला नागवा करून सोडून देतो; शहाजीच्या स्वारीचा व कर्ण्याचा आवाज ऐकून बागलाणची राणी घाबरली. ती आपल्या पतीस ह्मणते कीं, तूं दाढी मिशी काढून, डोळ्यांत काजळ घालून बायकोचा वेष घे व शहाजी राजांच्या गोटांत बटकी सारखा डोईवर मडकें घेऊन पाणी भर." अशा अर्थाच्या त्याच्या कवितांचा नमुना पुढें देतों:—

( १ )

महाराज आइक आह्मा शास ठाकुर ।
आह्मना राउळ तुह्मना चाकुर ॥
निजाम साऊ बहिरी हाते धर्वा ।
बागुल ह्मणिका बगला कर्वा ॥
जो तुम् धार्के डोंगर धर्तेस ।
त्यावरि चाल कशा तुम् कर्तेस ॥
आम् काय कर्निल पाशीं फिर्जेस ।
तुम् आम् सोयरा अस कुठे कर्जेस ॥
आन हि पारधी रत्रि बा ह्मणि ।
विनंति कर्तेस आह्मना धणी ॥ १ ॥

( २ )

आम् शाउ तुम्हना तुम् धणि आम्हना ह्मणि ह्मणि मुडि हो जागा॥
ज्यान्ही चाकरी लगिजेस नौबत देइजेस नाहितर कर्तेस नागा ॥

जठे जठे धाडतेस तठे तठे ज्ञायतेस कोन्ही नही कर्जेत हेवा ।
महाराज आइक महादेव साइक भारिंवसि कर्जेस सेवा ॥ २ ॥

( ३ )

.शा तुन्हा कर्णान् धुधकार आयाकिनि, बागुलानी रानी ह्मणे आते काय कर्वे ।
दादलाले सांगे आते नांद्वान गइ गोटि बाधि लपि जाति अरे ह्मणि जाय गर्वे ॥
दाढि मिशि बोडि डोये येनि घालि पाडि डोले काजल काटी रूप बायकोन धर्वे ।
जन्हल कान्हीं हटकी ते ह्मणस् आम् बटकी लेइ घट साहें गोट पानी भर्वे ॥ ३ ॥

———×———

## १२ चत्रू ठाकूर.

शहाजी राजांच्या पदरीं चत्रू ठाकूर ह्या नांवाचा दुसरा एक भाट होता. हा 'सवाई' वृत्तांत कविता करण्यांत फार चतुर होता. शहाजीनें हातीं फिरंग ह्मणजे तरवार धरिली कीं, फिरंग्यांच्या चेहेऱ्याचा रंग उतरतो अशा अर्थाची ह्याची एक सवाई पुढें दिली आहे:—

( १ )

साहेब तों सम कोन अहैं । सूरजु सूरज उपर ताप तो है ॥
कोन कहूं अब तोर मुकाबल । काबल ते करभार लयो है ॥
बांधि जमदार, साँह तें माजकु । माहे तमाजकूं भेजु भयो है॥
साहजि ही कर लेत फिरंग । फिरंगनको फिर रंग गयो है ॥ १ ॥

——×——

## १३ दुर्गादास ठाकूर.

हा तिसरा एक भाट कवि शहाजी राजांच्या पदरीं होता. हा विशेष प्रेमांतला होता. ह्यास शहाजी राजाकडून दरमहा एक होन पगार मिळत असे. ह्यानें दरबारांत एकदां साहजिकपणें खालीं लिहिलेली कविता म्हणून दाखविली तेव्हां राजानें त्याला एक घोडा व एक पालखी इनाम दिली. ह्याची सर्व कविता मराठी भाषेंत वृत्तात्मक आहे. " शहाजीच्या मागें तिलक किंवा टिक्याचा मालक शिवाजी आहे. शिवाजीनें विजापुरादि बादशहांस लढाईच्या रंगणावर घोड्यासारखें जर्जर केलें. व शत्रूच्या गळ्यांत कमानी घालून त्यास नम्र करून सोडून दिलें " अशा अर्थाची कविता म्हटली ती ऐकून राजांस फार आनंद झाला. व कवींस पालखीचा मान देऊन पालखी व एक घोडा इनाम दिला. ह्यावरून हल्लीं शालोपयोगी इतिहासांत

शहाजी व शिवाजी ह्यांचे पटत नव्हते, किंवा शिवाजीचा उद्योग शहाजीस मान्य नव्हता असें लिहिलेलें साफ खोटें आहे. असें म्हणावें लागतें. उलट शिवाजीच्या राज्यस्थापनेच्या कार्यास शहाजीचें अनुमोदन असून पाठबळच होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ती कविता ही:—

टिकेचा धणी लेक ज्याचा शिवाजी ।
करी तो चहूं बादशाहाशि बाजी
तयांला रणामाजि हें एक माने ।
अरी जें गळा घालुनी ये कृपाणें ॥ १ ॥

तसेंच राजमाता श्री जिजाबाई संबंधानें त्यानें स्तुतिपर अशी पुढील कविता ह्मटली आहे:—

( २ )

जशी चंपकेशीं फुलें फुल्ल जाई ।
भली शोभली ज्यास जाया जिजाई ॥
जिच्या कीर्तिचा चंबु जंबु द्विपाला ।
करी साउली माउलीशी मुलाला ॥ २ ॥

त्याच्या आणखी कविता आहेत—

महाराष्ट्र भाषेंत माझ्या सवाया ।
मला देवबा लोक उल्लासवाया ॥
मनातील हा अर्ज आभासवाया ।

कवी हा सवाया करी हासवाया ॥ ३ ॥
महिवर्जी मज देवविले प्रति मासिक पावेक होन हा मासें ।
ते पडताहेत सोठेक त्यारि ते फार परंतु महत्व न दीसे ॥
दे मज एक नवा जिन वाजि नवाजिलसे खडकांत दिसे ।
जंबुद्विपाधिप अवूदसा निजनंबुपुढे जो दणाणित हिंसे ॥ ४ ॥

तयानंतरें पालखी आणि बाजी ।
तयालागिं देऊन राजा नवाजी ॥
ह्मणे तो मला एक आणीक द्यावें ।
जयानें जगीं कल्पपर्यंत ज्यावें ॥ ५ ॥
कवीलागिं त्या प्रार्थिलें तें नृपानें ।
स्वहस्तें पटी टोपली खास पानें ॥
प्रसंगीं पुढें जें जसें होत गेलें ।
महाराष्ट्र भाषा सवायेंच केलें ॥ ६ ॥

सवाइ

वैरिवधू पळतां मिळी पूसात कां वो तुह्मांस पराभव झाला ।
एरि ह्मणे नृप शाहाजिनें फरमाविलिया पतिवरि वो हल्ला ॥
याकरितां पळतें जिव घेउन बाई तुह्मी उदरीं मज घाला ।
वीरभटीं तुंगभद्रतटीं तगटीध्वज तो तगटींतच आला ॥ ७ ॥
भिल्लिहि त्या भयभीत ह्मणेत वनीं वस वो भिलडीचेनि वेशें ।
स्वर्ण तुझें अवघें त्यज काढुन आहेस कालिपतिचें अपयेशें ॥
राजस लाज तजीं अण जी बरि वर्तवो आमचिया उपदेशें ।
सिंधुतटीं करि पर्णकुटी तगटीं तजुनी रगटीं जुनिं नेसें ॥ ८ ॥

## ( १४ ) विश्वंभर ठाकूर.

शहाजी राजे भोसल्यांच्या पदरीं हा चौथा एक भाट कवि होता. हा कोठला होता वगैरे माहिती मिळत नाहीं. ह्यानें कर्नाटक व तेलंगण-येथील राजांवर शहाजीनें स्वारी केली व त्यांचा पराभव केला. ह्याबद्दलची सविस्तर हकीगत पद्यांत गायिली आहे. ह्या सर्व कविता हिंदी भाषेंत आहेत, त्यापैकीं एक कविता नमुन्या-करितां पुढें दिली आहे:—

दोहा.

अंत सृज्यो नृप साहि जग कल्यान हित ठाट ।
उपजत नित सिरिराग तह भयो बिसंभर भाट ॥
अद्र चनापर कोटि गज लिखते कौन विशेष ।
दसबीस कागज साहजी दये तिलक पर देख ॥

———×——

## १५. शिवदास ठाकूर.

हा पांचवा एक भाट—कवि शहाजी राजांच्या पदरीं होता. हा दरबारांतील कवींस व नवीन येणाऱ्या कवींस समस्या पूर्ण

करावयास सांगत असे. ह्या समस्येच्या समाधानांत दरबारांत असलेला एक जयराम कवि ह्मणतो कीं, हे शहाजी राजा तुझ्या शत्रूंच्या स्त्रिया रानांत वानरांच्या हातीं सापडल्या; त्या स्त्रियांचे स्तन त्या वानरांना ताडफळें वाटली; त्यांचे ओंठ पिकलेलीं तोंडलीं भासलीं; व दांत डाळिंबाचे दाणे वाटले. ती कविता अशी:—

( १ )

माल मकरंद सुत साहे तेरे वैरनकी बंदरके वंद परी—
कंदरिमें सुंदरी ॥
कोमल कमलहुत कुम्हलिनि भाज भाज साज पर—
सोय गई रोय गेय के घरीं ॥
वनचर आय सुंगे तालफळ जानि कुच विंबफळ भ्रमसों—
ओंठ मूठमों धरी ॥
दारिके बीज जानि दांत गहे दांतनिसों और और भात—
भात कीं विपत्ति गात को करी ॥ १ ॥

—-×——

## १९ राजकवि भूषण भाट.

यमुना नदीच्या तीरीं कानपुराजवळ त्रिविक्रमपूर नांवाचें एक लहानसें गांव आहे. तेथें भूषणभाटाचा जन्म झाला. ह्याच्या

बापाचें नांव रत्नाकर. हे देवीभक्त होते. देवीच्या वरप्रसादानें रत्नाकर ह्यास चिंतामणि, भूषण, मतिराम व जटाशंकर असे क्रमानें चार पुत्र झाले. चिंतामणि हा पुष्कळ दिवस नागपूरकर भोसल्यांच्या दरबारीं होता. त्यानंतर १६२७ ते १६५८ पर्यंत तो दिल्लीच्या दरबारांत राहून बादशहाकडून उत्कृष्ट सन्मान पावला. ह्यानें ' छंदविचार, ' 'काव्यविवेक' ' कविकुलकल्पतरु ' व 'रामायण' असे चार ग्रंथ हिंदी भाषेंत लिहिलेले उपलब्ध आहेत. ह्यानें पद्यांत आपलें नांव मणिलाल असें धारण केलेलें दिसतें.

मतिराम हा कमाऊनचा राजा उदितचंद्र ह्याच्या पदरीं होता. त्यानंतर तो बुंदेलखंडच्या छत्रसालाकडे राहिला व नंतर छत्रपति संभाजी महाराजांच्या पदरीं १६८० ते १६८९ पर्यंत होता. ह्याचे ' ललित ललाम, ' ' छंदःसार ' व ' रसराज ' हे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

भूषण ह्याचा जन्म इ. स. १६३७ ह्या वर्षी झाला. त्याच्या घराण्यांत विद्वत्ता वंशपरंपरा चालत आल्यामुळें ह्यास बापापासून विद्या प्राप्त झाली होती. एकदां असें झालें कीं, " चिंतामणि हे औरंगजेबाच्या दरबारांत राजकवि असतां त्यांचा धाकटा भाऊ भूषण हा घरांतच पडून असतो, कांहीं उद्योग करीत नाहीं. " असें ज्येष्ठबंधुभार्येच्या तोंडून निघालेले उद्गार कर्णोपकर्णीं भूषणच्या कानावर गेल्यामुळें त्यास कोप येऊन तो घरांतून निघाला व कमाऊनच्या राजाच्या आश्रयास गेला. तेथें त्यानीं आपल्या अंगच्या काव्य–गुणानीं राजास प्रसन्न करून घेतलें. तेव्हां राजानें त्यास

एक लक्ष मुद्रा इनाम देऊन ह्मटलें, “ तुला असा दाता पृथ्वीवर आजपर्यंत मिळाला नसेल. ” हें गर्वाचें भाषण, भूषण यास न आवडल्यामुळें तो लागलीच ह्मणाला, “ असे दाते ह्या पृथ्वीवर शतंभीष्म पडले आहेत. परंतु आपणच असा याचक आजपर्यंत पाहिला नसेल व ऐकिलाहि नसेल कीं, जो असें गर्वानें दिलेल्या एक लक्ष मुद्रांना तृणवत् समजून निघून जातो. ” असें ह्मणून तेथून निघाला तो आपल्या घरीं बंधूकडे दिल्लीस आला. [ शिवाजीचें सप्तप्रकरणात्मक चरित्रांत असें लिहिलें आहे कीं ही गोष्ट भूषण कवि शिवाजी महाराजांच्या पदरीं राहिल्यानंतर तो कांहीं दिवसांनीं बंधूस भेटण्याकरितां दिल्लीस गेला त्यानंतरची घडलेली आहे. )

एकदां औरंगजेब बादशहा मयूरासनावर विराजमान झाला असतां, तेथें दरबारांत निरनिराळे भाट-कवि त्याची प्रशंसा करूं लागले. तें ऐकून बादशहा ह्मणाला, “ मी पुष्कळ दिवसांपासून पहातों कीं, तुह्मी नेहमी माझी स्तुतिच करितां हें मोठें आश्चर्य आहे! माझ्यामध्यें कांहीं दोषच नाहीं कीं काय? कविजनाचें कर्तव्य हें आहे कीं त्यांनीं उत्तम उत्तम शिकवणीच्या गोष्टी सांगून मनुष्यास सन्मार्गास लावावें; असें असून तुह्मी नेहमी माझी स्तुति करून मला बेवकूब बनवितां ह्यास काय ह्मणावें ! तुमच्यांत कोणी खरी गोष्ट सांगणारा नाहींच कीं काय ! ” हें भाषण ऐकून सर्व कवि भीतिग्रस्त झाले ! कोणाच्या तोंडून एक शब्दहि निघाला नाहीं ! सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें ! त्या कवि मंडळींत भूषण होता. तो उभा राहून ह्मणाला, अली जनाब ! खऱ्या गोष्टी सांगणारे कवि

पुष्कळ आहेत त्यांची कमताई नाहीं; मात्र खरी गोष्ट सांगितली असतां ती ऐकणारे मात्र कमी आहेत; तरी हुजूर ! असा कोणी मर्द असेल तर त्यानें पुढें यावें मी सांगण्यास तयार आहें ! ”

हें निर्भीड भाषण ऐकून बादशहा किंचित् प्रसन्न तर झालाच. पण न जाणों हा काय बोलेल याचा नियम नाहीं असाहि त्यास विचार पडला. तरि पण आतां ह्यास बोलण्यास सांगणें भाग आहे असा विचार करून ह्मणाला, “ तूं माझें खरें वर्णन कर, मी ऐकण्याच तयार आहे ” ह्यावर भूषण ह्मणाला महाराज ! मी खरी गोष्ट सांगितली तर आपण कदाचित मला देहान्त शिक्षा कराल ह्मणून अभय असेल तर बोलतों. ह्या बोलण्यावर बादशहाकडून अभय मिळालें व मग भूषण शांतचित्तानें बादशहाचें वर्णन करूं लागला तें पुढें लिहिल्याप्रमाणें:—

( १ )

देवके समान बाप बादशहा शहाजान,
वाको कैद कियो मानो मक्के आग लगाई है ॥
बडो भाई दारा वाको पकडके कैद कियो,
मेहेर हुर नाहि माको जानो सगो भाई है ॥
बंधु तो मुरादबक्श बाद चूक करवेको,
बीचमें कुरान खुदाकी कसम खायी है ॥
कहत भूषण भाट सुन हुं औरंगजेब,
एते पाप कियो फेर बादशाही पाई है ॥१॥

—×—

[ २ ]

हाथो तसवीन लियो प्रात ऊठ बंदगीको,
आपही कपटरूप कपट जप जपके ॥
आगरे मे जाय दारा, चौकमे चुनाय लिन्हो,
छत्रही छिनायो मानो बुढे मेरे बापके ॥
कीन्हो है गोत्रघात सोतो मै नही कहूं,
पीलपे तुराये चार चुगलनके चटके ॥
भूषण भनत शठ छंदी मतीमंत भयो,
सौ सौ चुहे खायके बिलाडी बैठी तपके ॥

---

ह्याप्रमाणें भूषण भाटानें यथातथ्य वर्णन केल्यावर बादशहा अत्यंत संतप्त झाला ! तरवार उपसून भूषण भाटावर वार करणार, इतक्यांत दरबारांतील मंडळीनें त्याचें निवारण केलें; तेव्हां भूषण दरबारांतून निघून गेला; तो आपल्या केसरी घोड्यावर स्वार होऊन खालीं दक्षिणेंत शिवाजी महाराजांकडे आला. ह्यापूर्वीं शिवाजी महाराजांचा प्रताप त्यानें ऐकिला होता. दरबारांत जाऊन महाराजांस मुजरा करून पुढील कवीत ह्मणण्यास त्यानें आरंभ केला:—

( ३ )

इंद्र जिमि जंभपर, वाडव सुअंभपर, रावण सुदंभपर रघुकुलराज है ॥
पौन वारिवाहपर, शंभु रतिनाहपर, त्यों सहस्त्रबाहपर रामद्विजराज है॥

दावा द्रुमदंडपर, चित्तामृग झुंडपर, भूषण वितुंडपर, जैसे मृगराजहै॥
तेज तिमिरंसपर, कान्हा जिमि कंसपर, त्यों म्लेच्छ वंशपर शेर शिवराज
है ॥ ३

दा. क. 3491

उंचे घोर मंदिरके अंदर रहनेवाली, उंचे घोर मंदिरके अंदर रहाती है॥
कंदमूल भोगकरे, कंदमूल भोगकरे तीन बेर खाती। सो तीन बेर
खाती है ॥
भूखनसी तल अंग भूखन सीतल अंग, व्यंजन डुलाती ते
व्यंजन डुलाती है ॥
भूषण भनत शिवराज बीर तेरे त्राश, नगन जनाती ते बे
नगन जनाती है ॥ ४ ॥

( ५ )

सोंधे को अधार किसमिस जिनको अहार, चारकोस अंक लख
चंद सरसाती है ॥
ऐसि नारि आरि शिवराज बीर तेरे त्राश, पायनमे छाले—
पडे कंद मूल खाती है ॥

ग्रीष्मकी तपन अति तप्ती न सुनि कान, कंज कैसी—
कली बिन पानी मुरजाती है ॥
तोरि तोरि आछे पच्छरासेसे निचोर मुख तुम तो—
कहत कंत मुकता मे पानी है ॥ ५ ॥

(६)

सांच कर माने देवी देवता न जाने अरु, ।
ऐसी उर आनेमें कहत बात तबकी ॥
और बादशाहनके चाह हती हिंदुनकी ।
सहाजाद अकब्बर सुनत साख जबकी ॥
बब्बरके तिब्बर हुमायूं हद बांध गये ।
दोनो एक करीना कुरान बेद मतकी ॥
काशीकी कलाहु जाती मथुरा मशीद होती ।
शिवाजी न होते तो सुनत होत सबकी ॥ ६ ॥

हें सर्व कवित्व ऐकून महाराज फार खुष झाले व त्यांनीं कवीस पालखीचा मान, वस्त्रालंकार व बावन्न गांवची जहागीर देऊन दरबारांत श्रेष्ठ ठिकाणीं बसण्यास जागा दिली. ह्याप्रमाणें महाराजांनीं कवीचा गौरव केला! अशा प्रकारें महाराजांच्या पुण्य-पवित्र समागमाचा लाभ घेतल्यावर पुष्कळ दिवसांनीं कवीस

आपला बंधु चिंतामणि ह्यास भेटण्याची इच्छा झाली. महाराजांच्या आज्ञेनें भूषण कवि तेथून निघाले, ते प्रथम थोडे दिवस बुंदेलखंडाच्या छत्रसालाकडे राहून नंतर दिल्लीस गेले.

भूषण ह्यानें आपल्या विद्वत्तेनें शिवाजी महाराजांकडून जहागीर मिळविल्याचें वर्तमान ऐकून त्याच्या, बंधू वगैरे सर्व मंडळीस अत्यंत आनंद झाला! भूषण आल्याची वातमी दिल्लीस बादशहाचे कानावर ही गेली. तेव्हां त्यास बादशहाकडून दरबारांत येण्याचें निमंत्रण गेलें. तेव्हां भूषण ह्यानें बादशहास असा निरोप पाठविला कीं, " मी शिवाजी महाराजांचा आश्रित आहें. ह्यामुळें दरबारांत मी त्यांची स्तुति करीन; ती ऐकावयाची असेल तर मी दरबारांत येतों." बादशहानें हें कबूल केल्यावर आपला बंधु चिंतामणी याजबरोबर तो दरबारांत गेला. तेथें त्यास योग्य ठिकाणीं बसण्यास बादशहानें जागा दिली; कुशल प्रश्न झाले; मग हळूच बादशहानें आज्ञा केली कीं, "मी सार्वभौम राजा आहे, आणि बाकीचे राजे मांडलिक आहेत ते सर्व मला खंडणी देतात; त्यांच्या प्रमाणें शिवाजी हाहि एक मांडलिक आहे. अशा अर्थाची कविता करून ह्मणा. " तेव्हां लागलीच भूषण ह्यानें पुढील कविता ह्मटली:—

( ७ )

राना भो चमेली और बेला सब राजा भये ।
ठौर ठौर रस लेत नित यह काज है ॥
सिगरे अमीर आनि कुंद होत घर घर ।
भ्रमत भ्रमत जैसे फूलनकी साज है ।

भूषण भनत शिवराज बीर तेहि देश ।

देशनकी राखी सब दख्खनमें लाज है ॥

त्यागे सदा षट्पद पद अनुमान जैसे ।

अलि अवरंगजेब चंपा शिवराज है ॥ ७ ॥

( ८ )

कुरम कमल कलद्दिज कलीन्दबर ।

मुगळ गुलाब राना केतकी समाज है ॥

तोंबर कन्हेर जाई जुई पुनि चंद्रावल ।

पाडरी पवार गौर केवरे दराज है ॥

भूषण भनत मुच कुंद बडे गुजर है ।

बघेले बसंत सदा सुखद निवास है ॥

लेई रस एतनको बैठो न सकत भृंगः ।

अलि अवरंगजेब चंपा शिवराज है ॥ ८ ॥

पुढें इतर विषयावर आणखी कांहीं कविता ह्मणावयास सांगितल्या त्या पुढें दिल्या आहेत.

[ ९ ]

माळवा उज्जेन भन भूषण भेळसा ऐन ।

शहर सिरोंजको परायने परत हे ॥

गोंडवानो तिलगानो फिरगानो कर्नाटक ।
हिंदुवानो हिंदनको हिय्यो हहरत है ॥
साहूके सपूत शिवराज तेरी धाक सुनी ।
गढपति वीर तेऊ धीर न धरत है ॥
बीजापूर गोल्कुंडा आगरे दिल्लीके कोट ।
बाजे बाजे दीन दरवाजे उघरत है ॥ ९ ॥

हें सर्व ऐकून बादशाह कवीच्या अलौकिक काव्यगुणावर व समयसूचकतेवर खुष होऊन त्यास पुष्कळ इनाम देऊन रवाना केलें ! ही सर्व हाकिकत वकिलामार्फत शिवाजी महाराजांस समजली. तेव्हां महाराज अत्यंत खुष होऊन त्यांनीं भूषण कवीस तावडतोब परत येण्याबद्दल निरोप पाठविला.

ह्या कवीनें हिंदी भाषेंत शिवराज भूषण, भूषण हजारा, भूषण उल्लास व दूषण उल्लास असे चार ग्रंथ लिहिले आहेत. ते सर्व हल्लीं उपलब्ध आहेत. ह्यांचा शेवट कधीं झाला हें समजत नाहीं.

## [ १७ ] मोहोनलाल भाट.

हा मोहोनलाल भाट उत्तम प्रकारचा कवि संभाजी महाराजांच्या पदरीं होता. गंगाधर नांवाचा एक ब्राह्मण मोंगलांच्या अत्यंत त्रासामुळें बाटून मुसलमान झाला होता. त्यास

पश्चात्ताप होऊन त्यानें परत हिंदुधर्मांत येण्याची इच्छा प्रदर्शित केल्यावर त्यांच्या पात्रनविधीबद्दल शास्त्रार्थ काढण्याचें काम महाराजांनीं ह्याजकडे सोंपविलें होतें. त्याप्रमाणें कवीनें शास्त्रार्थ काढून कविकुलेश ( कलुशा ) यांस दाखविला. तेव्हां कलुशानें त्यास महाराजांच्या परवानगीनें योग्य तें प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेतलें. हा विधि शके १७०८ क्षय नाम संवत्सरीं चैत्र शु० द्वितीया सोमवारीं झाला व लागलींच महाराजांनीं आज्ञापत्र काढिलें कीं, "आतां हा ब्राह्मण शुद्ध जाहला, या उपरि जो कोणी याच्या ब्राह्मण्याविषयीं संदेह मानील तो देव ब्रह्मद्रोही, महापातकी जाणिजे." ह्या आज्ञापत्रावर मोहोनलालाची मही असून आणखी बावीस सह्या आहेत ! ह्यावरून विद्वत्तेमुळें ह्यास संभाजी महाराजांच्या दरबारीं फार मोठा मान होता असें दिसतें.

——×——

## १८ मतिराम भाट.

हा दुसरा एक भाट–कवि संभाजीच्या पदरीं होता हा भूषण भाटाचा कनिष्ठ बंधु. हा बुंदेलखंडच्या छत्रसालाकडे प्रथम कांहीं दिवस राहिला व मग तो संभाजीकडे इ. स. १६८० पासून १६८९ पर्यंत होता. ह्याच्याही अगदीं प्रथम तो कमाऊनचा राजा उदितचंद्र ह्याचे पदरीं होता. संभाजीकडे असतांना ह्यानें ' ललितललाम ', ' छंदःसार ' व ' रसराज ' हे तीन प्रसिद्ध ग्रंथ लिहिले. ह्यापेक्षां ह्याची जास्त माहिती मिळत नाहीं.

## १९ कविराज शामलदास भाट.

हे चारण जातीचे भाट होते. चारण हे रजपुतांचे गुरु आहेत. रजपूत लोक ह्यांस पुष्कळ दानें देतात, गांवें, जमिनी, पैसा वगैरे पुष्कळ असतें ह्या चारण वंशांत कविराज शामलदास ह्यांचा जन्म इ. स. १८३७ मध्यें झाला. पुढें हे आपल्या अंगच्या विद्वत्तेमुळें उदेपूरचे महाराणा स्वरुपसिंह ह्यांच्या दरबारांत आले. शामलदासाचे वडील वारले तेव्हां स्वरुप-सिंहाचे चिरंजीव महाराणा शंभूसिंह हे त्यांच्या घरीं समाचारास आले होते. त्यानंतर त्यांनीं शामलदासास उदेपूर येथें एक उत्तम प्रकारचें घर बांधून दिलें आणि दरबारात तिसऱ्या नंबरावर बसण्याचा मान दिला. इ. स. १८७७ मध्यें श्री. सज्जनसिंह साहेब ( महाराज श्री. शंभुसिंह ) ह्यांनीं शामळदासजीचे घरीं येऊन त्यास चांदीची छडी दिली. पुढें आणखी कांहीं दिव-सांनीं पायांत घालण्यास सोन्याचा तोडा दिला ! आपल्या कवित्व--गुणामुळें शामळदास ह्यास दरबारांत 'कविराज' हा पदवी मिळाली. पुढें काशीस मोठमोठ्या विद्वन् मंडळांत ह्यांनीं आपली विद्वत्ता दाखविल्यावर त्यांस तेथील शास्त्री मंडळींनीं "महामहो-पाध्याय" अशी पदवी दिली. हे कलकत्याच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे मेंबर होते. ह्यांनीं पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. ह्यांनीं "पृथ्वीराज रासा" ह्या ग्रंथावर सन १८८७ सालीं बंगालच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या जर्नलच्या पांचव्या भागांत एक मोठा विद्वत्ता प्रचूर असा निबंध लिहिला. ह्यांस औरस संतति नसल्यामुळें त्यांनीं आपला पुतण्या गोपाळदास ह्यांचा मुलगा यश-कर्ण ह्यास दत्तक घेतलें आहे.

शुभं भवतु ।

संपलें. येथपर्यंत ' भाट व त्यांची कर्तबगारी ' ह्या विषयावर भारत-भागवत-रामायणादि पुराणग्रंथावरून व अलिकडच्या इतिहासांवरून मिळाली तेवढी माहिती घेऊन ती एकत्र केली आहे. पहिल्या भागांत भाट ह्मणजे काय ? पूर्वी त्यांची लायकी व त्यांचा मानमरातब कसा होता ? आतां त्यांची काय अवस्था आहे ? पूर्वींच्या त्यांच्या उन्नतीचीं व हल्लींच्या अवनतीचीं कारणें कोणतीं ? इत्यादि अनेक गोष्टींची माहिती आली आहे व दुसऱ्या भागांत कांहीं सुप्रसिद्ध भाटाची मिळाली तेवढी माहिती व त्यांचें थोडेंसें काव्य देऊन त्याचाहि वाचकांस परिचय करून दिला आहे. ह्यापुढें आतां उत्तर हिंदुस्थानांत पत्रव्यवहार करून आणखी कांहीं माहिती मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. ही माहिती पुढील आवृत्ति निघाल्यास त्यावेळीं विचारात घेऊं.

ह्या पुस्तकांत जी माहिती दिली आहे ती उगीच बडबड किंवा कल्पनातरंग नसून तिला आधार आहेत तेव्हां ह्या माहिती विषयीं, आधाराविषयीं किंवा आणखी इतर कांहीं प्रश्नाबद्दल कोणास कांहीं शंका आल्यास त्यांनीं कृपेनें ग्रंथकर्त्याशीं पत्रव्यवहार करून शंकांचें निरसन करून घ्यावें किंवा नवीन कांहीं माहिती द्यावयाची असल्यास कळवावी ह्मणजे पुढील आवृत्तीच्या वेळीं तिचा व त्या सद्गृहस्थांचा आभारपूर्वक निर्देश करीन. कोणीही एकाद्या व्यक्तीसंबंधानें किंवा समाजासंबंधानें पूर्वग्रह निश्चित ठेवून कायमचें मत बनवून ठेवणें युक्त होणार नाहीं. अशा दृष्टीनें वाचकांनीं हें पुस्तक वाचिल्यास त्यांस भाटांची योग्यता कळून त्यांच्या संबंधानें कोणासही आदरच वाटूं लागेल. शेवटीं जातां जातां ह्या पुस्त-

काच्या उपसंहाराच्या निमित्तानें आमच्या भाट समाजास दोन उपदेशाच्या गोष्टी सांगून मग मी सर्व वाचकांची परम नम्रतेनें परवानगी घ्यावी, हें शिष्टाचारास धरूनच असल्यामुळें व मी शिक्षक ह्या नात्यानें उपदेश करण्याचा मला 'राजमान्य' अधिकार असल्यामुळें माझ्या भाट बांधवांनीं माझ्या बोलण्याचा शांतपणें विचार करावा अशी माझी त्यांस अत्यंत नम्रतेची सूचना आहे.

बांधवहो ! तुह्मीं इतर समाजाकडे बघा व त्यावरून तुमच्या समाजाची कल्पना करा. तुमचा जन्म आजपर्यंत निर्जीव व निस्तेज असें भिक्षान्न खाण्यात गेला, त्यामुळें तुह्मी हांजीहांजी खोर बनलां ! तुमच्या ठिकाणचे अनेक बहुमोल सद्गुण माती-मोल झाले ! तुह्मीं निर्बल, नेभळट, भेषगात्र, भित्रे, तोंडपुजे, मत्सरी, लोभी, कर्तव्यशून्य असे बनलां व ह्मणूनच तुमच्या संबंधानें कोणालाहि आदर वाटेनासा होऊन तुमच्यामुळें ' भाट ' किंवा ' ठाकूर ' हा वंद्य व तेजस्वी शब्द निंद्य व निस्तेज झाला ! ! असो जें झालें त्यास उपाय नाहीं, मात्र ती चूक आतां दुरुस्त केली पाहिजे. अशा विपन्नावस्थेंतूनच आपणांस आपल्या उन्नतीचा मार्ग चोखाळला पाहिजे. तो मार्ग हाच की आतां ह्यापुढें आपण आपल्या पुढच्या पिढीस शिक्षण देऊन सुशिक्षित करावें. ह्मणजे ती स्वत: स्वावलंबी बनून आपला चरितार्थ सुखानें व अब्रूनें करूं शकेल, ह्या बाबतींत समाजांतील पुढाऱ्यांनीं, ज्यांची शिकण्याची सोय नसेल त्यांची सोय करून द्यावी व ज्यांस असेल त्यांस शिकण्यास भाग पाडावें हें कर्तव्य पुढाऱ्यांनीं न बजा-विल्यास असल्या नामधारी पुढाऱ्यांस समाजहत्त्येचें घोर पातक लागेल व त्या पापाचें प्रायश्चित्त हीं त्यास भोंवल्यावांचून राहणार नाहीं. हा पुढाऱ्यांच्या संबंधानें विचार झाला.

आपला माट--समाज अत्यंत निर्बळ आहे. ही चिखलांत फसलेली गाय आहे! तेव्हां ह्या गायीच्या उद्धाराकरितां पुढारी मनापासून प्रयत्न करित असतां त्यांच्या मार्गांत समाजांतीलच इतर लोकांनीं कांटे पसरून त्यांचा मार्ग अधिक कंटकावृत व दुष्कर करणें हें वरील समाजहत्येच्या पातकाइतकेंच भयंकर कर्म आहे. अशा विघ्नसंतोषी लोकांस शेवटीं परमेश्वर निःसंशय भयंकर शिक्षा करील!!! ह्मणून कोणीही असलें नीचतम कर्म न करितां यथाशक्ति ह्या पंकपतित धेनूच्या उद्धाराच्या कामीं हातभार लावावा. प्रत्येक मनुष्य हा पुढारीच आहे. पुढाऱ्यांस कांहीं शिंगें नसतात किंवा बाशिंगें ही बांधलेलीं नसतात व पुढारीपणाबद्दल कोणी त्यांस पगार ही देत नाहीं. उलट, प्रसंगविशेषीं अवहेलना व द्रव्यदंड हीं मात्र त्यांच्या वांट्यास येऊन " यदि कार्यविपत्तिः-स्यात् मुखरस्तत्र हन्यते। " अशी ही स्थिति होते. यशाचे वांटेकरी सर्वच असतात, पण अपयशाचें खापर एकट्याच पुढाऱ्याच्या शिरावर फुटतें! वास्तविक यश मिळण्याचे कामीं पुढाऱ्यापेक्षां इतर लोकच जास्त उपयोगी पडतात. युद्धांत जय मिळविण्याचे कामीं सेनापतीच्या मेहनतीचा भाग फारच थोडा असतो. सर्वांत जास्त मेहनत इतरांचीच असते. ह्या न्यायानें प्रत्येकानें ह्या सत्कार्यास यथा-शक्ति हातभार लावावा. ह्याचे उलट, औदासिन्य दाखवून, पाताळयंत्री-पणा करून, प्रतिबंधक किंवा विध्वंसक उपाय कराल तर समा--जाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडून नाश होण्याची वेळ खास जवळ येईल, हें खूप समजा. तेव्हां असें न करितां शुद्ध अंतःकरणानें व शुद्ध भावनेनें प्रेरित होऊन, संघटित प्रयत्न करून कार्यारंभ केल्यास तो पतितपावन व परम दयाळू परमेश्वर आपणांस खात्रीनें यश देईल. इतरांस स्वतांच्या उन्नतीकरिता ३० वर्षे लागत असलीं तर

आपण ती दहा वर्षांत करूं कारण आपण सरस्वतीचीं लाडकीं व आवडतीं मुलें असून शिवाय आपल्या स्वर्गीय पितरांचे पवित्र व पुण्यवान् आत्मे ह्या कामीं आपणांस आशीर्वाद ही देतील !

सर्वारंभास्तंडुलाःप्रस्थमूलाः । ह्या न्यायानें पाहिलें असतां कोणतें ही महत्कृत्य करण्यास पैसा पाहिजे, शिक्षणाची व्यवस्था लावण्यास पैसा पाहिजे, आपल्या पूर्वजांचे अनेक हस्तलिखित ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्यास पैसा पाहिजे, पैशावांचून कांहींच करितां येत नाहीं त्याच्या अभावी ' उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः ! " अशी स्थिति होते आपला समाज गरीब आहे. पण आस्थवाईक आहे. पुढाऱ्यांच्या मागोमाग जाणारा आहे. तेव्हां ' दसकी लकडी एकका बोजा ' ह्या म्हणीप्रमाणें पंचाइतीनें ठरविल्याप्रमाणें वर्गणी जमविल्यास विना श्रमानें कमींत कमी सालीना पांच हजार रुपये खास जमूं शकतील असा अंदाज आहे. दरसाल एवढी रकम कांहीं थोडी नाहीं. दरसाल अशी रकम जमली तर आह्मी स्वर्ग जिंकूं ! मात्र ही रकम दरसाल नियमितपणें जमली मात्र पाहिजे, ह्मणजे आपणांस शिक्षणव्यवस्था लावितां येईल, हरएक गोष्ट करितां येईल. ह्मणून आपल्याजवळ द्रव्यनिधि असणें फारच फार जरूर आहे.

ह्याप्रमाणें विचाराची सुधारणा सुरू असतां त्याबरोबर अंतर्गत आचाराची ही सुधारणा होणें इष्ट आहे. आपणांस उपनयनादि संस्कारांचा अधिकार आहे! तेव्हां कालमानाप्रमाणें बंद झालेले हे संस्कार पुन्हां सुरू केल्यास प्रथम जनतेंत हें हास्यास्पद होईल ! पण तिकडे लक्ष न देतां ते यथाविधि करावेच. हें झाल्यावर मग इतर आचारविचार ही निर्मल ठेवणें अगत्याचें

होणार आहे प्रत्येक घरीं सडासंमार्जन, वेणी फणी व आंघोळ हें ही रोज झालेंच पाहिजे. पुरुषांनीं रोज स्नानसंध्या, देवपुजा, नैवेद्य वैश्वदेव वगैरे केल्यावांचून अन्नग्रहण करूं नये आतां ह्या गोष्टी एकदम साधणार नाहींत, पण ज्यांस साधणें शक्य आहे, त्यांनीं अवश्य करून त्यांचा इतरांस धडा घालून द्यावा.

पुण्याचें फळ सुख व पापाचें फळ दुःख असा परमेश्वराच्या दरबारांत न्याय आहे. आपण अत्यंत पापी ह्मणून अशा दुःखांत व हालांत दिवस कंठित आहोंत. त्यांत आतां आणखी समजून उमजून शहाण्यानें जास्त पापाची भरती करूं नये. आपल्या शास्त्रांत ब्रह्महत्या, सुरापान, कन्याविक्रय, गुरुपत्नी-गमन व असत्यभाषण हीं पंचमहापातकें समजलीं जातात. पैकीं सुरापान, कन्याविक्रय व असत्यभाषण ह्यांचें पुष्कळांस कांहींच वाटत नाहीं. पण ह्यापुढें ह्या तीन महापातकांबद्दल सुद्धां अत्यंत भीति वाटली पाहिजे. ह्याप्रमाणें आचारविचाराची शुद्धता झाली ह्मणजे सर्व ठिकाणीं आपला आदर वाढून आपणांस आपलें पूर्वीचें स्थान आपोआप मिळेल.

झालें. सांगावयाचें तें सांगितलें, ह्याचा आपण सर्वांनीं विचार करून त्याप्रमाणें आचरण करा ह्यांत आपला सर्वांचा तरणोपाय आहे. आतां ह्या व्याख्यानाची श्रीव्यासनारायणाच्या पवित्र शद्बांनीं समाप्ति करून आपली परवानगी घेतों.

ग्रा. क. ३४१८ सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु जीवन्तु शरदां शतम् ॥ १ ॥

शाखा

**ॐ शांतिः शांतिः शांतिः ।**

REFBK-0003419
REFBK-0003419